

# आधी बीज एकले...

महिला किसान अधिकार मंच (मकाम)

# आधी बीज एकले...



महिला किसान अधिकार मंच (मकाम)

# आधी बीज एकले...



प्रकाशक
**Society for Promoting Participative Ecosystem Management**
(SOPPECOM)

लेखन
**प्रशांत खुंटे**

संकल्पना / साहाय्य
**सीमा कुलकर्णी, पल्लवी हर्षे,**
**स्नेहा भट, स्वाती सातपुते**

मुखपृष्ठ
**राजू देशपांडे**

अंकमांडणी
**स्वप्नदीप क्रिएटिव्ह्ज**

संपर्कासाठी पत्ता
सोपेकॉम, १६, काळे पार्क,
सोमेश्वरवाडी रोड, पाषाण,
पुणे – ४११००८

खाजगी वितरणासाठी

प्रकाशन : १२ ऑक्टोबर २०२२

# ऋणनिर्देश

▶ महिला किसान अधिकार मंच २०१७ पासून महाराष्ट्रात महिला शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर काम करत आहे. मकाम व इतर संघटनांच्या प्रयत्नांमुळे आत्महत्याग्रस्त महिला शेतकरी तसेच महिला ऊसतोड कामगारांच्या दृष्टीने काही महत्वाचे शासन निर्णय पारित झाले. परंतु त्यांची योग्य अंमलबजावणी व्हायची असेल तर महिला शेतकऱ्यांची संघटना बांधणी होऊन त्यांच्याकडून त्यासाठी रेटा येणे गरजेचे आहे हे लक्षात घेऊन मागील दोन वर्षांपासून सोपेकॉमच्या माध्यमातून मकाम संलग्नित विविध संस्थांशी जोडलेल्या महिला नेत्यांचा क्षमता विकास करण्याचे प्रयत्न चालू आहेत. या प्रक्रियेत ४८ महिला नेत्या सक्रीय पणे सहभागी झाल्या आणि त्यांनी मागील दोन वर्षात अनेक कृती कार्यक्रम घेऊन त्यांच्या नेतृत्व क्षमता दाखवून दिल्या. या पुस्तिकेत त्यापैकी १३ निवडक महिला नेत्यांच्या जडणघडणीबाबतच्या कहाण्या विस्ताराने मांडल्या आहेत. या पुस्तिकेच्या निमित्ताने आम्ही या प्रक्रियेत सहभागी सर्व महिला नेत्यांचे आभार मानतो. तसेच या महिला नेत्या ज्या संस्थांशी जोडलेल्या होत्या, त्या संस्थांनी महिला नेत्यांच्या जडण घडणीला महत्वाचे योगदान दिले, तसेच संस्थेतील मेंटोर्स नी महिला नेत्यांशी सातत्याने संवादात राहून वेळोवेळी त्यांना मार्गदर्शन केले व त्यांच्या अडचणी सोडवल्या त्यासाठी ह्या प्रक्रियेमध्ये सहभागी असणाऱ्या संस्थांच्या सर्व प्रतिनिधींचेही मनःपूर्वक आभार (संस्था, मेंटोर व

महिला नेत्यांची यादी परिशिष्ट ३ मध्ये दिलेली आहे).

या प्रक्रियेत विविध ऑनलाईन प्रशिक्षणे घेण्यात आली व त्याला अनुसरून विविध कृती कार्यक्रम देण्यात आले. ही प्रशिक्षणे घेऊन महिला नेत्यांना मार्गदर्शन केल्याबद्दल अलका पावनगडकर, अश्विनी कुलकर्णी, उल्का महाजन, मुक्ता श्रीवास्तव, जयाजी पाईकराव, सीमा कुलकर्णी, शुभदा देशमुख, कुमारी जमकातन, मनीषा तोकले, माधुरी खडसे, केशव गुरनुले, छाया पडघन, स्वाती सातपुते, स्नेहा भट, पल्लवी हर्षे यांचे आभार.

तसेच महिला किसान अधिकार मंचाचे फेसिलीटेटर्स ज्यांनी वेळोवेळी या प्रक्रियेत मार्गदर्शन करून अडचणी सोडवण्यात मदत केली त्यासाठी त्यांचे आभार. महिला किसान अधिकार मंचातील सर्व सदस्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळेच हे सर्व शक्य होत आहे.

सोपेकॉम संस्थेच्या सदस्यांचे पण आभार ज्यांनी या सर्व प्रक्रियेच्या समन्वयाचे काम पार पाडले. महिला नेत्यांच्या क्षमता विकासाची ही प्रक्रिया "Association for India's Development (AID)' यांच्या आर्थिक सहाय्याशिवाय शक्य झाली नसती. तरी त्यांचे ही विशेष आभार.

महिला नेत्यांचा प्रवास समजून घेणे, त्याला शब्दांकित करणे व पुस्तिका स्वरुपात आणण्याचे महत्वपूर्ण काम प्रशांत खुंटे यांनी केल्याबद्दल त्यांचेही आभार.

पुस्तिका पूर्ण करण्यामध्ये संदीप साळुंके (मांडणी), राजू देशपांडे (मुखपृष्ठ), शारदा महल्ले (प्रुफ रीडिंग) ह्यांचे महत्वाचे योगदान राहिले, त्या तिघांचे आभार.

**मकाम महाराष्ट्र समन्वय समिती**

शुभदा देशमुख, डॉ. वैशाली पाटील, प्रभा यादव, जयाजी पाईकराव, रंजना कान्हेरे, मनीषा तोकले, माधुरी खडसे, सीमा कुलकर्णी, छाया पडघन, सुवर्णा दामले



# आधी बीज एकले...

ग्रामीण महिलांमधील
नेतृत्त्वाच्या अंकुर कथा



चित्रकला वैदे | १८


वनिता शेंडे | २३


खंजिरा कराडे | २९


कलावती सवंडकर | ३३


गीता काळे | ३९


अनिता मेश्राम | ४३


अर्चना केचे | ४८


सुनीता अलोने | ५३


निलिमा रेंघे | ५९


लक्ष्मी गजभीये | ६४


मनीषा उईके | ६९


द्वारका वाघमारे | ७५


जिजा दरवडा | ८२

**परिशिष्ट –१** | ८७
२०२०–२१ नंतर ‘मकाम’मध्ये सक्रिय झालेल्या ग्रामीण महिला नेतृत्त्वानं काय मिळवलं?

**परिशिष्ट –२** | ८८
‘मकाम’च्या महिला नेतृत्त्व विकास कार्यक्रमाचं फलित

**परिशिष्ट – ३** | ८९
‘मकाम’ अंतर्गत संस्थानिहाय महिला नेतृत्वाची माहिती

**परिशिष्ट –४** | ९१
‘मकाम’ : महिला नेतृत्त्वाचा जिल्हानिहाय विस्तार – नकाशा

# ‘मकाम’ बाबत...

▶ ‘महिला किसान अधिकार मंच’ म्हणजेच ‘मकाम’. हा शेतकरी-शेतमजूर महिलांचा मंच. कष्टकरी, ग्रामीण आदिवासी महिलांचा आवाज बुलंद करणं, या घटकांचे प्रश्न पटलावर आणणं नि ते सोडवणं यासाठी हा मंच कार्यरत आहे. २०१४ साली या राष्ट्रीय मंचाची स्थापना झाली. देशभरातील २४ राज्यात ‘मकाम’चा विस्तार आहे. महाराष्ट्रात २०१७ पासून ‘मकाम’ काम करत आहे. ग्रामीण भागात कार्यरत स्वयंसेवी संस्था, कार्यकर्ते-अभ्यासक, शेतकरी महिला असे विविध घटक या मंचाशी सलग्न आहेत.

महिलांचा घरातील व कामाच्या ठिकाणांवरील छळ-हिंसा याबाबत समाजात आता थोडीफार चर्चा होऊ लागली आहे. पण या प्रश्नांची मांडणी अजूनही शहरांपुरती मर्यादित दिसते. ग्रामीण भागातील महिलांवर होणारी हिंसा, त्यांचे शिक्षण, पाणी, जमीन, रोजगार व आरोग्याचे प्रश्न तीव्र असूनही मुख्य प्रवाहात क्वचितच चर्चेला येतात. शेतकरी आत्महत्यांसारखा प्रश्न राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पटलावर येतो, पण या आत्महत्याग्रस्त कुटुंबातील स्त्रियांच्या प्रश्नांकडे समाज व शासनाचं लक्ष जाताना दिसत नाही. या पार्श्वभूमीवर ‘मकाम’चं देशभरातील संस्था व कार्यकर्त्यांचं जाळं कार्यरत आहे. हे नेटवर्क महाराष्ट्रातही विस्तारत आहे. ‘मकाम’मार्फत ग्रामीण महिलांमधील नेतृत्त्वाची उभारणी केली जाते. त्याकरता गावपातळीवर नेतृत्वक्षमता असलेल्या महिलांपर्यंत विविध सरकारी योजना व कायद्यांची माहिती पोहोचवली जाते. वेळोवेळी प्रशिक्षण व संवाद सत्रांचं आयोजन केलं जातं. या माध्यमातून ग्रामीण महिलांना कार्यप्रवृत्त केलं जातं. महिलांच्या नेतृत्वाला चालना दिली जाते.

केवळ योजनांचा लाभ पदरात पाडून घेणं एवढंच ‘मकाम’चं मर्यादित

उद्दिष्ट नाही. ग्रामीण महिलांच्या प्रश्नांना राजकीय प्रक्रियेत महत्त्वाचं स्थान मिळावं, हे प्रश्न सोडवताना गावागावातून धडाडीचं स्त्री नेतृत्त्व तयार व्हावं यासाठी 'मकाम' प्रयत्न करत आहे.

आतापर्यंत महिलांचा नैसर्गिक संसाधनांवरील अधिकार, आरोग्य, रोजगार याबाबतच्या प्रश्नांना 'मकाम'नं प्राधान्य दिलं असलं तरी सर्वप्रथम कौटुंबिक पातळीवर महिलांचा निर्णयप्रक्रियेत सहभाग वाढवण्यासाठीही 'मकाम' प्रयत्न करत आहे.

'मकाम'ने आत्महत्याग्रस्त कुटुंबातील महिलांचे प्रश्न पटलावर आणण्यात कळीची भूमिका निभावली आहे. महाराष्ट्रातील आत्महत्याग्रस्त कुटुंबातील स्त्रियांचा अभ्यास 'मकाम'मार्फत झाला असून, या संशोधकीय संवादातून एक गोष्ट प्रकर्षाने पुढे आली, ती म्हणजे महिलांना वारसा हक्क द्यायला समाजाची तयारी नाही. नवऱ्याच्या आत्महत्येनंतर विधवा बाईचं जीवन परावलंबी होतं, तिचे मूलभूत अधिकारही नाकारले जातात. 'मकाम'ने केलेला अभ्यास व या प्रश्नावरील हस्तक्षेपामुळे महाराष्ट्र शासनाने आत्महत्याग्रस्त कुटुंबातील महिलांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे याकरता एक विशेष शासन निर्णय (GR) लागू केला. या शासन निर्णयाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी स्थानिक पातळीवर महिला नेतृत्व घडवणे व संघठन बांधणीची गरज लक्षात घेऊन विविध जिल्ह्यांमध्ये महिला नेत्यांच्या क्षमताबांधणीसाठी 'मकाम' प्रयत्नरत आहे. याशिवाय ऊसतोड कामगार महिलांच्या प्रश्नांचीही अभ्यासपूर्ण मांडणी 'मकाम'नं केली आहे. असंघटित क्षेत्रातील ऊसतोड कामगार महिलांना कामाच्या ठिकाणी सुविधा मिळाव्यात, त्यांच्या आरोग्याशी निगडित प्रश्नांची सोडवणूक व्हावी याकरता 'मकाम' प्रयत्न करत आहे. 'कोविड महामारीचा

ग्रामीण महिलांवरील परिणाम' याबाबतही 'मकाम'मार्फत अभ्यास करण्यात आला आहे. अशा अभ्यासातून पुढे आलेले प्रश्न सार्वजनिक चर्चाविश्वात आणणं, विविध पातळ्यांवरून या समस्या सोडवण्यासाठी हस्तक्षेप करणं यासाठी 'मकाम'च्या मंचावरून प्रयत्न होत आहेत.

विशेषत: आदिवासी पट्ट्यात वन व नैसर्गिक संसाधनांवर महिलांचा हक्क प्रस्थापित करणं हे देखील 'मकाम'साठी एक अग्रक्रमाचं कार्यक्षेत्रं आहे. गडचिरोली, गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, अमरावती व यवतमाळ या जिल्ह्यातील काही भाग वनव्याप्त आहे. या भागातील महिला उपजीविकेसाठी मुख्यत: जंगलावर अवलंबून आहेत. कोविडमुळं उद्भवलेली परिस्थिती व लॉकडाऊन काळात नैसर्गिक संसाधनातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा ग्रामीण महिलांना खूप आधार झाला. मोह, टोळी, तेंदू फळे – टेंभुर विविध हंगामातील रानभाज्या महिला जंगलातून गोळा करतात. पण या वनोपजांना योग्य बाजारभाव मिळत नाही. तो मिळावा यासाठी 'मकाम' विविध प्रकारे प्रयत्नशील आहे.

आदिवासी पट्ट्यात कार्यरत असणाऱ्या काही संस्था स्थापनेपासूनच 'मकाम'शी सलग्न आहेत. या संस्थांच्या माध्यमातून 'वन हक्क कायदा–२००६' च्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न होत आहेत. हे प्रयत्न मुख्यत: स्थानिक लोकसमुदायांचा परिसरातील संसाधनांवर हक्क प्रस्थापित करण्यासाठी सुरू होते. २०१८ मध्ये 'मकाम'नं नागपूर येथे 'राष्ट्रीय विचार मंथन' कार्यशाळा आयोजित केली. या कार्यशाळेनंतर वनहक्कांना स्त्रियांच्या उपजीविकेचा प्रश्न म्हणून पाहण्याचा कंगोरा प्रकर्षाने पुढे आला. त्यानंतर महाराष्ट्रभर वन व नैसर्गिक संसाधनांवर महिलांच्या हक्कांचा विचार करण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. या प्रयत्नांना कृतीची जोड देऊन सर्वप्रथम गडचिरोलीतील तेंदूपत्ता विक्रीच्या मजुरीची रक्कम ग्रामसभेत ठराव होऊन महिलांच्या बँक खात्यात जमा झाली. अशा प्रकारचे हस्तक्षेप कोकण, उत्तर महाराष्ट्र व मराठवाड्यातही 'मकाम' मार्फत सुरू आहेत. या माध्यमातून अनुसूचित जमातीतील स्त्रियांचं नेतृत्त्व विकसित करण्याच्या प्रक्रियेत 'मकाम' आघाडीवर आहे.

ग्रामीण महिलांचे प्रश्न जटील व गुंतागुंतीचे आहेत. या महिलांमध्ये नेतृत्त्वाची उभारणी करणंही आव्हानात्मक ध्येय आहे. असं असलं तरीही 'मकाम'च्या माध्यमातून महिला नेतृत्त्व मूळ धरत आहे. पाणी, रेशन यांसारख्या प्रश्नांसोबतच या नेतृत्त्वाने एकल महिलांचे प्रश्न ऐरणीवर आणण्यासाठी प्रयत्न सुरू केलेत. विधवा पेन्शनच्या रकमेत व पात्रतेच्या

निकषात बदल घडवणं यासाठी ‘मकाम’चे प्रयत्न सुरू आहे. ‘रोजगार हमी योजने’त खास महिलांसाठी कामं काढली जावीत याकरता पुढाकार घेतला जात आहे. अशाप्रकारे ‘मकाम’ एकाच वेळी गाव ते राज्यपातळीपर्यंत विविध टप्प्यांवर हस्तक्षेप करत आहे. ग्रामीण महिलांचं प्रबळ नेतृत्त्व, महिलांचे हक्क नि सन्मान प्रस्थापित करू शकेल असा ‘मकाम’चा विश्वास आहे. यातून समाजात समता व सहकार्याची दिशा सापडेल असा ‘मकाम’चा विश्वास आहे. ●

# प्रस्तावना

▶ 'महिला किसान अधिकार मंच' (मकाम)च्या माध्यमातून ग्रामीण-कष्टकरी महिलांचे प्रश्न मांडण्यासाठी विविध संस्था, संघटना व कार्यकर्त्यांचं जाळं देशभर विस्तारत आहे. पण कोविडमुळं या सशक्त विस्ताराला खीळ बसेल काय, अशी परिस्थिती निर्माण झाली. तसंच, कोविड व लॉकडाऊनमुळे कष्टकऱ्यांच्या उदरनिर्वाहाचे गंभीर प्रश्न समोर येऊ लागले. या पार्श्वभूमीवर 'मकाम'मार्फत महाराष्ट्रातील ग्रामीण-कष्टकरी महिलांपर्यंत मदत साहित्य पोचवलं जाऊ लागलं. या निमित्तानं विविध संस्था व एकल महिला, मकामच्या संपर्कात आल्या. आधीचं नातं अधिक दृढ झालं. त्यातूनच लॉकडाऊन काळात नव्याने संपर्कात आलेल्या नि संघटनेशी जोडलेल्या महिलांमध्ये नेतृत्त्व उभारणीचे प्रयत्नही नव्या दमानं सुरू झाले. त्यासाठी ऑनलाईन कार्यशाळा व संवाद शिबिरं झाली. या शिबिरातील चर्चा व कृती कार्यक्रमांनुसार महिलांनी गावपातळीवर विविध पावलं उचलली. या कृती गावपातळीवर महिला नेतृत्त्वाला बळकटी देण्यासाठी होत्या. कृती कार्यक्रमांनुसार गावातील महिलांच्या भेटीगाठी, सर्व्हेक्षण नि प्रत्यक्ष समस्या सोडवणुकीच्या प्रक्रियेतून महिलांमध्ये नवं भान कसं येत गेलं याची कहाणी ही पुस्तिका मांडते.

लॉकडाऊनमुळं जनजीवन ठप्प झालेलं असताना 'मकाम'द्वारे कष्टकरी महिलांनी मात्र आपापल्या मनातील उंबरे पहिल्यांदाच ओलांडले. खेड्यापाड्यात विविध प्रश्नांवर हस्तक्षेप झाले. दुर्गम खेड्यातील महिलांची नवी फळी उभी राहिली. ही पुस्तिका अशा घडामोडींचं संकलन आहेच, शिवाय या प्रक्रियेतून घडणाऱ्या नेतृत्त्वाचा नि कष्टकरी महिलांच्या प्रश्नांचा पट मांडण्याचाही एक प्रयत्न आहे.

विशेषत: २०२० नंतर १९ संस्थांच्या माध्यमातून विदर्भ व मराठवाड्यातील ४८ गावांमध्ये झालेल्या कामांचा आढावा घेतानाच या कार्यात पुढाकार

घेणाऱ्या कार्यकर्त्यांची उमेद वाढवण्याचाही हा एक प्रयत्न आहे. या पुस्तिकेत सर्व कार्यकर्त्यांचं काम, त्यांची पार्श्वभूमी मांडणं शक्य झालेलं नाही, पण गावपातळीवरील महिला नेतृत्त्वाचा पोत या लेखातून दिसू शकेल. अलीकडील काळात 'मकाम'च्या माध्यमातून गावपातळीवर घडवलेल्या आशादायी वृत्तांताची एक झलक या कार्यकर्त्यांची ओळख करून घेताना होईल. एकूण अठ्ठेचाळीस कार्यकर्त्यांपैकी (परिशिष्ट ४) तेरा जणींचा प्रातिनिधिक प्रवास या पुस्तिकेतून आम्ही मांडत आहोत. कष्टकरी महिलांच्या संघटनांसमोरची आव्हानं यातून दृष्टीपथात येऊ शकतील. ग्रामीण-कष्टकरी महिलांच्या जीवनजाणिवांचं प्रतिबिंबही पाहायला मिळेल.

कष्टकरी महिला ग्रामीण अर्थव्यवस्थेची जीवनरेषा आहे. पण ही सुप्त लाईफलाईन कायमच बेदखल राहिलीय. जगभरात कमी अधिक फरकानं हेच वास्तव दिसतं. 'आंतरराष्ट्रीय श्रम संघटना (आयएलओ)'च्या आकडेवारीप्रमाणे जगभरात ४१ % स्त्रिया कृषी क्षेत्रात राबतात. पण या श्रमशक्तीला तिच्या कष्टांचा मोबदला पुरुषांच्या तुलनेत ४० टक्क्यांनी कमी मिळतो. जगातल्या २० टक्क्यांहूनही कमी महिलांकडे जमिनीची मालकी आहे. जगभर महिला शेतीसोबतच कुटुंबात बहुमूल्य श्रम करतात, पण या कष्टांची दखलही घेतली जात नाही. मोबदला तर दूरची गोष्ट. शिवाय पुरुषांच्या तुलनेत या कष्टकरी स्त्रिया हिंसा व लैंगिक शोषणाला जास्त बळी पडतात. भारतात हे वास्तव अधिकच गडद आहे. दर तीन मिनिटाला भारतीय महिलेवर कुठला ना कुठला अत्याचार होतो, असं 'नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्यूरो ऑफ इंडिया'ची आकडेवारी सांगते. २०११ मध्ये 'मेन अँड जेंडर इक्वॅलिटी' ही पाहणी आंतरराष्ट्रीय स्तरावर झाली. या सर्व्हेक्षणात ६५% भारतीय पुरुषांनी एक मत नोंदवलंय, ते असं - 'कुटुंब टिकून राहावं यासाठी बायका मारझोड सहन करतात', यापुढं जाऊन

बहुसंख्य पुरुष असंही मानतात – ‘अनेकदा बायकांना चोप दिल्याशिवाय पर्यायच नसतो.’ या सर्व्हेक्षणात सहभागी २४ % पुरुषांनी आपण आयुष्यात कधी ना कधी कुठल्या ना कुठल्या स्वरूपात महिलेचा लैंगिक छळ केल्याची कबुली दिलीय. या वास्तवाचा संदर्भ लक्षात घेऊन या पुस्तिकेतील कथां पाहायला हव्यात.

या पार्श्वभूमीवर ‘मकाम’ ग्रामीण महिलांच्या नेतृत्त्वाला सशक्त करू पाहत आहे. कोविडनंतरच्या काळात हे आव्हान अधिक तीव्र झाल्याचं दिसतं. २०२० मध्ये पहिलं लॉकडाऊन सुरू झालं. या घटनेमुळं देशभरातील कोट्यवधी महिलांचा रोजगार गेला. या काळात महिलांवरील अत्याचारात वाढ झाल्याचंही दिसलं. अशा आणीबाणीच्या काळात ‘मकाम’नं ग्रामीण महिलांशी ऑनलाईन संवाद साधला. ही संवाद सत्रं महिलांना उपयोगी वाटू लागली. केवळ ऑनलाईन मीटिंगना हजर राहता यावं यासाठी या कष्टकरी महिलांनी आयुष्यात पहिल्यांदाच स्मार्टफोन हाताळले. कुणी नात्यातील कुणाकडून फोन घेऊन मीटिंग केल्यात तर कुणी अगदी बकरी विकून मोबाईल विकत घेतला. यातून या महिलांमधील जिज्ञासेची लालसा व परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठीची तगमग लक्षात येते. या ऑनलाईन सत्रातून मिळालेल्या माहितीचा महिलांनी आपापल्या गावात कसा वापर केला, त्यातून काय बदल घडले, बदलांच्या किती शक्यता निर्माण झाल्या याचा आलेखही या पुस्तिकेत पाहायला मिळेल.

कोविडनं उद्ध्वलेलं जनजीवन हळूहळू पूर्वपदावर येत आहे. पण अर्थव्यवस्थेची अवस्था दयनीय आहे. परिणामी महिलांचा रोजगारातील टक्का तर वाढताना दिसेल, पण कामांचे तास वाढणं नि उत्पन्नं घटण्याचं प्रमाणही वाढणार आहे. ग्रामीण महिलांवरही या परिस्थितीचा ताण येणार आहे. त्यामुळेही ग्रामीण महिलांच्या संघटनेची गरज अधिक तीव्र बनते. या पुस्तिकेतील महिला नेतृत्त्वाचा संघर्ष या पार्श्वभूमीवर पाहायला हवा. अशा नेतृत्त्व उभारणीची नितांत गरज ही पुस्तिका अधोरेखित करत आहे.

२०११ च्या राष्ट्रीय नमुना पाहणीनुसार भारतातील ६८.८४% लोकसंख्या खेड्यात राहते. या लोकसंख्येत अर्थातच स्त्रियाही आहेत. युनायटेड नेशन्सच्या ‘रिव्हिजन ऑफ वर्ल्ड अर्बनायझेशन प्रोस्पेक्टस (२०१८) या अहवालानुसार २०५० सालातही भारत हा जगात सर्वाधिक लोकसंख्या खेड्यात असणारा देश असेल. म्हणजेच खेड्यातील प्रश्नांची, त्यातही स्त्रियांच्या समस्यांची तीव्रता यापुढेही असणारच आहे. पण अजूनही ग्रामीण विकासाची धोरणं

ठरवली जाताना त्यात स्त्रियांचा स्वतंत्र व सर्वंकष विचार होताना दिसत नाही. म्हणूनही या पुस्तिकेतील कहाण्या खेड्यातील स्त्रियांचं जगणं मांडतात. ते बदलण्याची निकडही सांगतात.

अलीकडे माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) सारख्या क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढल्याचं दिसतं. या श्रमशक्तीचा विचार करून २०१७ मध्ये 'मातृत्त्व लाभ कायदा'(मॅटर्निटी बेनिफीट ॲक्ट) पारित झाला. या कायद्यामुळं स्त्रियांना गरोदरपणात १२ ते २६ आठवड्यांची पगारी रजा मिळणं शक्य झालं. ५० हून अधिक कामगार असलेल्या आस्थापनांमध्ये 'बाल संगोपन सुविधा' असणं कायद्यानं अनिवार्य ठरलं. पांढरपेशात असलेल्या महिलांसाठी अशा सुधारणा व कायदे आशादायक आहेत, पण खेड्यातील कामकरी महिलांचे श्रम नि त्यास अनुसरून बदलांकडे अजूनही सरकार व धोरणकर्त्यांचं लक्ष नाही. ते वेधावं यासाठी ही पुस्तिका महिलांच्या संघर्ष कथा नोंदवण्याची गरज अधोरेखित करते. बदल घडवू पाहणाऱ्या तळागाळातील महिलांना समजून घेण्यासाठी खरंतर अशा प्रकारचं काम विद्यापीठातील 'स्त्री अभ्यास केंद्रां'नी सातत्यानं करावं असंही या संकलनाच्या निमित्तानं आम्हाला वाटतं.

शेतकरी आत्महत्या हे ग्रामीण अर्थव्यवस्था मोडकळीला आल्याचं एक लक्षण. या समस्येचा ऊहापोह नि उपाययोजना व्हायलाच हव्यात, पण आत्महत्यांनी पीडित कुटुंबातील स्त्रियांचाही विचार व्हायला हवा. या पुस्तिकेतील काही कहाण्या आत्महत्यांनी पीडित विधवांचा संघर्ष समजून घ्यायला मदत करू शकतील. महिलांना वारसा हक्क नाकारणं-मालमत्तेतून बेदखल करणं, घर नाकारणं या समस्या केवळ त्या त्या महिलांची समस्या म्हणून न पाहता, त्या कृषी अर्थव्यवस्थेतील अरिष्टाचंच एक रूप आहेत, हे लक्षात घ्यायला हवं. आत्महत्या पीडित विधवांच्या नावे एक-रकमी मदत सरकारकडून मिळाल्याचं या पुस्तिकेतील काही कथांमधून दिसेल. पण या मदतीतून त्या महिलेचे प्रश्न संपत नाहीत, उलट नव्या संघर्षाला ती एकाकीपणे तोंड देऊ लागते. या संघर्षांची तीव्रता काही कथांमधून दिसेल.

सरकारकडून मिळणारं स्वस्त धान्य ही ग्रामीण महिलांसाठी एक अत्यावश्यक गरज आहे. रेशन कार्ड, वारस नोंद, निराधार पेन्शन योजनेतून मदत मिळणं हे या महिलांसाठी बुडत्याला काडीचा आधार असण्यासारखं आहे. पण या साध्या साध्या योजनांचा लाभ मिळवण्यासाठी महिलांना गावातील पुरुषांची मदत घ्यावी लागते. हा लाभ मिळवून देण्याच्या मोबदल्यात काही वेळा थेट लैंगिक संबंधांची मागणी केली जाते. पण 'मकाम'नं पुरवलेल्या माहितीच्या

आधारे महिलांनी धाडस करून या योजनांचा लाभ मिळवून घेतला नि इतर गरजूंनाही मिळवून दिला. वरकरणी ही साधी गोष्ट वाटेल, पण त्यासाठी गावपातळीवरील सत्ता संबंधांना हिसके देण्याचं काम या कार्यकर्त्यांनी केलं. त्यासाठी घरातून नि समाजातून अबोला, टोमणे सहन केले. चारित्र्यावर लांछन लावणं ही महिलांची उमेद दडपून टाकण्याची हुकमी क्लृप्ती या महिलांवरही अवलंबली गेलीय. पण गावपातळीच्या या अल्पशिक्षित महिलांनी किती धीरानं व नेटानं धैर्य दाखवलं, त्याची उदाहरणं या पुस्तिकेत जागोजागी दिसतील.

'महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजने'तून महिलांसाठी रोजगारांची उपलब्धता हा एक कळीचा मुद्दा आहे. बहुसंख्य भारतीय स्त्रियांची उत्पादन साधनांवर मालकी नाही. हे वास्तव असूनही 'महिलांमधील दारिद्र्य' हा प्रश्न स्वतंत्रपणे हवा तितक्या जोरकसपणे पुढे आलेला नाही. खरेतर महिलांच्या दारिद्र्याचं मूळ त्यांच्यातील 'माहितीच्या दारिद्र्यात'ही आहे. त्यामुळंच 'मकाम'नं 'रोजगार हमी योजने'ची माहिती संवाद सत्रातून दिली. त्या माहितीच्या आधारे कार्यकर्त्यांनी गावात रोहयोचं जॉब कार्ड व कामांची मागणी केली. महिलांकडून रोहयोसाठी अशा स्वरूपाचा पुढाकार काही गावात प्रथमच घेतला गेलाय. ग्रामीण महिलांना रोजगाराचा हक्क आहे, त्यांना पुरुषांच्या तुलनेत समान कामाचा समान मोबदला मिळायला हवा, महिलांच्या गरजा लक्षात घेऊन रोहयो अंतर्गत गावपातळीवर कामांची आखणी व्हायला हवी, गावपातळीवरील निर्णयप्रक्रियेत गावातील महिलांचा विचार प्राधान्याने घ्यायला हवा, असे विविध प्रश्न पटलावर आणण्यासाठी रोहयो अंतर्गत कामांची महिलांमार्फत मागणी वाढणं गरजेचं आहे. 'मकाम'नं या आघाडीवर विविध गावात हस्तक्षेप केलाय. पण महिला हक्कांची मागणी करतात, तेव्हा कशा प्रकारे अडसर निर्माण केले जातात, आडमुठेपणा करून कसा रोजगार नाकारला जातो, याची काही उदाहरणं या पुस्तिकेतील कहाण्यांतून सापडतील.

एक आणखी मुद्दा येथे नोंदवायला हवा. पुरुषप्रधान मानसिकतेचं जोखड दूर सारणं ही लांब पल्ल्याची नि संथ प्रक्रिया आहे. त्यामुळं काही कहाण्यात महिला आपल्या वैयक्तिक प्रश्नांवर मार्ग काढताना इतर महिलांचे हक्क डावलतायत की काय अशी शंका येऊ शकते. विशेषत: जमिनीवरील वारसा हक्कांच्या बाबत हा प्रश्न कळीचा ठरतो. पतीच्या पश्चात आपल्याला जमिनीवर हक्क मिळावा यासाठी एखादी महिला तिच्या जावा-नणंदांचा हक्क कितपत जपू शकतात हा तो प्रश्न आहे. या प्रश्नाकडे एकूणच कृषी अर्थव्यवस्थेतील गुंतागुंतीला समजावून घेऊन सहिष्णूपणे पाहायला हवं. अत्यल्प जमीनधारणा

हा कृषी व्यवस्थेतील अरिष्टाचा एक महत्त्वाचा पैलू आहे. सातत्यानं होणाऱ्या खाते वाटपामुळं जमिनीची हिस्सेवाटणी होत राहते, नि थोड्याशा तुकड्यावर अधिकाधिक कुटुंबांचा भार पडत राहतो. महिलांनीही वारसा हक्कांची मागणी व स्वतंत्र शेती कसायला सुरुवात केल्यानं उत्पादन साधनांवर मालकी मिळेल, त्यातून आत्मविश्वास वाढेल, पण आर्थिक स्वातंत्र्य मिळण्यास मात्र मर्यादा राहतील. हे वास्तव लक्षात घेऊन 'मकाम' महिलांचे गट स्थापन करून सामूहिक शेतीला प्रोत्साहन देत आहे.

एकुणात ग्रामीण भागातील महिलांमध्ये आत्मविश्वास, आर्थिक स्वावलंबन, निर्णयप्रक्रियेत सहभाग-पुढाकार नि हे सर्व घडवताना रूढ राजकीय प्रक्रियेपासून हटके अशी महिलांची दबावशक्ती वाढवणं हे काम बहुपेडी आहे. गुंतागुतीचंही आहे. म्हटलं तर आधी हा एक 'आयडेंटीटी'चा संघर्ष आहे. समाजात महिलांप्रती कमालीचा तुच्छता भाव आहे. उच्च-नीचतेच्या कल्पना ठासून भरलेल्या आपल्या समाजात ग्रामीण बाईचं पदर खोचून उभं राहणं ही प्रक्रिया या पुस्तिकेच्या झरोक्यातून दिसू शकेल. तिला सापडलेल्या आयडेंटीटीचं प्रतिबिंब पाहण्याचा ही पुस्तिका एक छोटासा प्रयत्न आहे.

जगात निम्मी लोकसंख्या स्त्रियांची. पण कुठल्याही देशाच्या संसदेत, नोकरशाहीत, शैक्षणिक संस्थात, सैन्यात, पोलीस दलात व न्यायव्यवस्थेत ५० टक्के स्त्रिया नाहीत. शेती क्षेत्रात मात्र निम्म्याहून अधिकच स्त्रियांचं योगदान आहे, पण त्याची दखलच नाही. आपल्या समाजातील हा असमतोल दूर करताना विविध प्रकारचं अस्थैर्य येणारच आहे. तणाव निर्माण होणार आहेत. हे ताण समाजात नि महिलांच्या वैयक्तिक जीवनातही प्रकर्षाने येत आहेत. महिला स्वतंत्रपणे शेती कसू लागते, तेव्हा नांगरटीसाठी ट्रॅक्टर मिळवण्यापासून शेतमाल पोचवेपर्यंत विविध टप्प्यांवर तिला एकटीनं लढावं लागतं. साधा घरातील बल्ब बदलायचा असला तर खेड्यातील महिलेला शेजारच्या पुरुषाची मदत घ्यावी की घेऊ नये असा प्रश्न पडतो. कारण तिची कुठलीही कृती सतत चारित्र्य राखणीच्या नावाखाली पाहाऱ्यात असते. या पुस्तिकेतील कहाण्यात महिलांचं हे विशिष्ट एकाकीपण फारसं खोलात नोंदवलेलं नसलं तरी तो एक सुप्त प्रवाहच त्यांच्या संघर्षाची प्रेरणा असल्याचं जाणवेल. 'तीचं' पायरी सोडून पुढच्या प्रवासास सज्ज होतानाचं अंतर्बाह्य अभिसरण नोंदवण्याचा ही पुस्तिका एक प्रयत्न आहे. आशा आहे, या नोंदींमधून प्रेरणांचा प्रवाह वाहता राहील. ●

**– मकाम**



# चित्रकला वैदे

▶ बारटोला हे गोंदिया जिल्ह्यातील ३०० लोकवस्तीचं खेडं. चित्रकलाताईंच्या पुढाकारामुळं या गावातल्या महिला संघटित झाल्या. 'मकाम'च्या ऑनलाईन संत्रांमधून चित्रकलाताईंना आपल्या हक्कांची जाणीव झाली. या महितीचा उपयोग करून त्यांनी रेशन दुकानदाराला रेशनची पावती द्यायला भाग पाडलं. गावातल्या महिलांना रोहयोची मागणी करायला चित्रकलाताईंनी प्रवृत्त केलं. त्यासाठी त्यांना घरातून व गावातून विरोध सहन करावा लागला. आपल्या छोट्या मुलींच्या वाट्याला हेळसांड येऊ नये यासाठी चित्रकलाताईंना हे सर्व करावसं वाटलं.

माझ्या नवऱ्याने माझ्याशी बोलणं बंद केलेलं. सासू-सासरेही रागावलेले. मी गावातल्या बायकांना भडकवतेय असं गावातले लोक बोलायचे. त्यामुळं घरातलंही वातावरण बिघडलं होतं. चित्रकला सांगतात, मी माझं काम शांतपणे केलं. सासू-सासऱ्यांना व नवऱ्याला नंतर कळलं की मी काहीही चुकीचं

करत नाही. मग त्यांचा राग गेला... एक दिवस गावातील एका दारुड्यानं चित्रकलाताईंना रस्त्यात शिव्या दिल्या. ही बाई जास्त बोलते. बायकांना घेऊन ग्रामपंचायतीत जाते. हे त्या माणसानं शिव्या द्यायचं कारण. या घटनेमुळं नवरा सुरेंद्रही चित्रकलाताईंवर खवळला. त्यांना वाटलं बायकोमुळं आपली बदनामी होतेय. पण चित्रकलाताईंनी नवऱ्याला समजावलं, त्या म्हणाल्या, माझ्या दोन लहान पोरी आहेत. आज मी गप्प बसले, तर उद्या माझ्या पोरींनाही गप्प बसवतील. त्यांचं नाव रेशनकार्डावर आलं तर फायदा आपलाच आहे. आपल्या मुलींची नावं रेशनकार्डावर नाहीत, त्यामुळं कमी धान्य मिळतंय. पत्नी मुलींची नावं रेशनकार्डावर यावीत यासाठी प्रयत्न करतेय, हे सुरेंद्रनाही नंतर पटलं. त्यामुळं घरच्यांचा विरोध हळूहळू कमी झाला.

बारटोलामधील महिलांना घराबाहेर पडण्याची संधी क्वचितच मिळते. कारण हे दुर्गम खेडं आहे. गावातील महिला केवळ शेतमजुरीसाठीच घराबाहेर पडतात. नवेगावबांध हे आठवडी बाजाराचं गाव बारटोलापासून १५ कि.मी. अंतरावर आहे. चित्रकलाताई सांगतात, गावातले पुरुषच बाजारहाट करायला जातात. कारण नवेगावबांधला पैदल जावं लागतं. बारटोलात दिवसातून एकदाच एक बस येते. गावाचा बाह्य जगाशी संपर्क या बसपुरताच. अशा परिसरात 'फाउंडेशन फॉर इकोनॉमिक अँड इकोलॉजिकल डेव्हलपमेंट' (फिड) या संस्थेमार्फत विविध विकास उपक्रमांसाठी प्रयत्न केले जातात. संस्थेच्या सरिता मेश्राम बारटोला गावात महिलांच्या बैठका घेऊन विकास योजनांची माहिती देत. अशाच एका बैठकीत चित्रकलाताई सहभागी झाल्या. या मीटिंगमध्ये रोहयोची माहिती दिली जात होती. पण चित्रकलाताईंच्या मनात वेगळीच समस्या घोळत होती. 'आपल्या मुलींच्या नावे रेशन का मिळत नाही?' या समस्येवर काय उपाय आहे, हे समजून घेण्यासाठी चित्रकलाताईंनी या बैठकीत प्रश्न विचारला. त्यावर थोडीशी चर्चा झाली.

इतरही महिलांना रेशनशी संबंधित समस्या होत्या. सरितताईंनी या महिलांना सांगितलं, एकट्या चित्रकलाची ही समस्या नाही. सगळ्याजणींनी एकत्र येऊन दुकानदाराला प्रश्न विचारले तर समस्या सुटेल. महिला बैठक संपवून आपापल्या घरी गेल्या. पण चित्रकलाताई त्यानंतरही महिलांशी याच प्रश्नावर बोलत राहिल्या. दरम्यान सरितताईंनी चित्रकलाताईंना 'मकाम'मध्ये सहभागी व्हायचा सल्ला दिला. 'मकाम'च्या सत्रांमधून मिळालेली माहिती चित्रकलाताईंना अधिकच अस्वस्थ करत होती. कारण मूळ योजना-कायदे व वास्तवातील तफावत त्यांना समजू लागली. त्यामुळे त्यांनी गावातल्या महिलांसोबत रेशनिंग व रोजगार हमी योजनेतील समस्यांबाबात बोलायला सुरुवात केली.

चित्रकलाताई सांगतात, प्रमिलाबाईनं नवीन राशन कार्ड काढलं होतं. पण तिला राशन मिळत नव्हतं. दुकानदार तिला सांगायचा तुमच्या खात्यावर राशनच आलेलं नाही. विद्याबाईला दुकानदाराने उरलेले चिल्लर पैशे दिले नाहीत. पैशे मागितल्यावर साबणाची वडी दिली. निरूबाई विधवा. तिचं बीपीएलचं कार्ड आहे. बीपीएल कार्डावर धान्य स्वस्तात मिळतं. पण दुकानदारानं तिच्याकडून डाळीचे पैशे जास्त घेतले. गावातल्या वेगवेगळ्या महिलेकडून चित्रकलाताईंना वेगवेगळी समस्या लक्षात आली. पण एक समस्या सामाईक होती. ती म्हणजे दुकानदार कुणालाच रेशनची पावती देत नव्हता. त्यामुळे कोणाला, कोणत्या दराने, किती रेशन दिले याची माहिती कुणालाच कळत नव्हती. म्हणून 'दुकानदाराकडे पावती मागायची!' असं चित्रकलाताईंनी ठरवलं. त्यांनी दुकानदाराकडे पावती मागितलीही. पण तो म्हणाला, कशाला पायजे पावती? तुझ्या काय कामाची पावती? चारजणींनी एकत्र येऊन विचारल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही याची जाणीव 'मकाम'मुळे चित्रकलाताईंना झाली होती.

दरम्यान चित्रकलाताईंनी रोजगार हमीच्या प्रश्नांबाबतही महिलांशी बोलायला सुरुवात केली होती. 'आपण ग्रामपंचायतीकडे नमुना पाचची मागणी करायला पाहिजे. नमुना पाचची पावती मिळाली तर आपली नोंद सरकारकडे आहे याचा पुरावा तयार होतो. आपण कामाची मागणी केलीय, काम मिळणं आपला हक्क आहे, असं आपण सांगू शकतो' असं त्या महिलांना सांगू लागल्या. पण महिला म्हणत – 'आम्हाला काय करायचीय पावती? आम्ही कधी ग्रामपंचायतीत गेलोच नाही. आमचं कोण तिथं ऐकणार?' चित्रकलाताईंनी या विषयावर अनेकींशी चर्चा केली, त्यातल्या एकीला 'नमुना पाचची पावती मागायला पाहिजे' हे पटलं, ती पावती मागण्यासाठी ग्रामपंचायतीत यायलाही तयार झाली. मग चित्रकलाताईंनी पुन्हा इतरजणींना सांगायला सुरुवात केली, 'ती अमुक बाई पावती मागायला येणार आहे, तुम्ही पण चला...'एकीपासून दुसरीला चित्रकलाताईंनी प्रेरणा दिली नि हळूहळू गावातल्या महिला ग्रामपंचायतीत यायला तयार झाल्या.

रेशन दुकानदार व ग्रामपंचायत दोन्ही ठिकाणांहून पावतीची मागणी करायला चित्रकलांताईंनी महिलांना तयार केलं. महिला ग्रामपंचायत कार्यालयात गेल्या. पण ग्रामसेवकाने त्यांना नमुना पाचच्या पावतीबद्दल आधी सांगितलं – 'अशी काही पावतीच नसते.' नंतर म्हणाला, 'तुम्हाला ती देण्याचा नियमच नाही.' ग्रामसेवक व ग्रामपंचायतीचे पदाधिकारी पावती द्यायला तयार नव्हते. पण चित्रकलांताईंनी पाठपुरावा सुरू ठेवला. चार-पाच वेळा महिलांना जमवून त्या ग्रामपंचायतीत गेल्या. त्यामुळं गावात महिलांनी नवीनच काहीतरी सुरू केलंय, याबाबत चर्चा

**चित्रकलाताई सांगतात, प्रमिलाबाईनं नवीन राशन कार्ड काढलं होतं. पण तिला राशन मिळत नव्हतं. दुकानदार तिला सांगायचा तुमच्या खात्यावर राशनच आलेलं नाही. विद्याबाईला दुकानदाराने उरलेले चिल्लर पैशे दिले नाहीत. पैशे मागितल्यावर साबणाची वडी दिली. निरूबाई विधवा. तिचं बीपीएलचं कार्ड आहे. बीपीएल कार्डावर धान्य स्वस्तात मिळतं. पण दुकानदारानं तिच्याकडून डाळीचे पैशे जास्त घेतले. गावातल्या वेगवेगळ्या महिलेकडून चित्रकलाताईंना वेगवेगळी समस्या लक्षात आली. पण एक समस्या सामाईक होती.**

सुरू झाली. यापूर्वी जे कधीही घडलं नाही, ते चित्रकलाताईमुळं घडू लागलंय हे काहींना आवडलं नाही. चित्रकलाताईंना त्यामुळं टोमणेही ऐकावे लागले.

दरम्यान चित्रकलाताई महिलांसह रेशन दुकानात गेल्या. दुकानदार म्हणाला, 'मला वरच्या साहेबाला पावती द्यावी लागते. ती तुम्हाला देता येणार नाही.' तो खोटं बोलत होता. हा माणूस सहज पावती देणार नाही, याचा महिलांना अंदाज होता. त्यामुळे घोळक्यातील एकजणीने तिथेच उभ्या असलेल्या एका मुलाचा मोबाईल घेतला. आणि ती दुकानदाराला म्हणाली, तुम्ही पावती का देत नाही ते सांगा, मी रेकॉर्ड करते. आम्ही हे रेकॉर्डिंग तालुक्याच्या अधिकाऱ्यांना दाखवतो. दुकानदाराचं म्हणणं मोबाईलवर रेकॉर्ड करायचं असं महिलांनी आधीच ठरवलं होतं. पण ती वेळ आली नाही. हे सर्व घडताना दुकानाजवळ जमलेल्या पुरुषांपैकी एकजण या महिलांशी भांडू लागला. 'या बायका विनाकारणच दुकानदाराला त्रास देतायत', असं त्याला वाटत होतं. यामुळं दुकानापुढे गोंधळ वाढू लागला. पण महिलांही मागे हटत नव्हत्या. गोंधळ आणखी वाढला, तर आपली चूक उघडकीस येईल याचा दुकानदाराला अंदाज आला असावा, त्यामुळे त्याने पावती द्यायचं मान्य केलं.

महिलांना हुरूप आला. आता ग्रामपंचायतीमधून नमुना पाचची पावती मिळवणंही अवघड नाही हा आत्मविश्वास आला. त्यामुळं चित्रकलाताई महिलांना घेऊन पुन्हा ग्रामपंचायतीत गेल्या. चित्रकलाताई सांगतात, आम्ही सगळ्याजणी जमून ग्रामपंचायतीत चाललो होतो, तर गावातला एकजण आमच्याकडं पाहून शिव्या द्यायला लागला. मी सोबतच्या बायकांना म्हणाले, ''देऊ दे शिव्या, आपल्याला काय फरक पडतो?

या घडामोडींमुळं गावातील महिला अधिक जोमाने एकत्र येऊ लागल्या.

पूर्वी मीटिंगला ५-१० महिलाच जमत. हळूहळू ही संख्या वाढून २५-३० वर पोहोचली. महिलांच्या या एकजुटीचा परिणाम होऊन २०२१च्या एप्रिल महिन्यात बारटोलामध्ये ९० दिवसांसाठी रोहयोचं काम मंजूर झालं. या कामात ५० महिलांना रोजगार मिळाला. चित्रकलाताईंनी महिलांना सोबत घेऊन केलेल्या पाठपुराव्यामुळंच हे शक्य झालं. चित्रकलाताईंच्या मुलींची नावं दुकानदाराने कार्डावर नोंदवली. त्यामुळे त्यांना योग्य प्रमाणात रेशन मिळू लागलं. गावातल्या सर्वच कार्डधारकांना नियमानुसार रेशन मिळू लागलं. कारण पावतीवर असलेली नोंद व प्रत्यक्ष मिळालेलं धान्य यात तफावत नाही याची पडताळणी आता लोक करू शकतात. हे बदल छोटे नाहीत. प्रश्न विचारणं, पावतीची मागणी करणं, चारचौघींनी एकत्र येणं हे यापूर्वी बारटोलात घडलं नव्हतं. चित्रकलाताईंमुळे हे शक्य झालं. 'मकाम'नं चित्रलाताईंसारख्या महिलांपर्यंत पोचवलेली माहिती व दिलेल्या आत्मविश्वासाचं हे यश म्हणता येईल.

चित्रकलाताईंचं शिक्षण दहावीपर्यंतच झालंय. त्यांचे आई-वडील वीटभट्टीवर काम करत. चित्रकलाही बालपणी मोलमजुरी करत असे. तिला शिकण्याची प्रबळ इच्छा होती. पण शाळा गावापासून ४-५ कि.मी. दूर. शाळेत जायला सायकल घेणंही या मुलीला शक्य नव्हतं. म्हणून तिने एका मैत्रिणीशी करार केलेला. या मुलीची सायकल तिने शिकण्यासाठी विनंती करून मिळवली. त्या बदल्यात चित्रकलाने त्या मैत्रिणीला रोज डबलसीट शाळेत पोचवलं. पुढे लग्नामुळे चित्रकलाचं शिक्षण थांबलं. चित्रकलाताई 'मकाम'मध्ये सामील झाल्या नसत्या तर कदाचित त्यांच्यातील शिकण्याची उर्मी नि नेतृत्त्वगुणांना कधीच व्यासपीठ मिळालं नसतं.

गावातील रोजगार हमी व रेशनच्या समस्यांपासून सुरू झालेली घुसळण अन्य प्रश्नांकडे वळवण्यातही चित्रकलाताई प्रयत्न करत आहेत. एका बाईला तिचा नवरा रस्त्यातच शिव्या देत होता. चित्रकलाताईंना ही घटना समजली. त्यांनी याबाबत महिलांमध्ये चर्चा घडवली. 'तो माणूस नेहमीच बायकोला मारतो.' असं समजल्यावर 'त्याच्यावर दबाव आणायला हवा', असं चित्रकलाताईंनी महिलांना सुचवलं. त्यानंतर त्या काही महिलांना घेऊन त्या माणसाकडे गेल्या. त्याला समजावणीच्या सुरात सांगितलं - 'दारू पेत नका जावू दाजी! काहून बायला मारता जी!!' हा सूर समजावणीचा होता, पण गावातल्या चार महिला जमून आल्यानं त्या माणसावर दडपण आलं असावं. तेव्हापासून त्यानं मारहाण थांबवली. 'मकाम'मधून मिळालेल्या माहितीचा बारटोला गावातील प्रभाव हा असा आहे. ●



# वनिता शेंडे

▶ 'तुम्ही खरोखरच रोजगार हमीचं काम करणार का?' ग्रामसेवकानं हा प्रश्न वनितातार्इंना विचारला. त्या ठामपणे 'हो!' म्हणाल्या. वनितातार्इंसोबतच्या तेरा महिलांनी हेच सांगितलं. तरीही पंधरा दिवस पाठपुरावा करूनही या महिलांना काम मिळालं नाही. पण गावातील विधवांनी पहिल्यांदाच गावाकडे हक्काची मागणी केली. हे अपूर्व.

यापूर्वी तिरझडा गावातील कुणाही महिलेनं कधीच रोहयोतून कामाची मागणी केली नव्हती. मार्च,२०२१ मध्ये पहिल्यांदाच हे घडलं. गावातल्या विधवा-परित्यक्ता महिला एकत्र आल्या. ग्रामपंचायतीत गेल्या. जॉबकार्डची मागणी केली. 'तीन महिन्यांसाठी रोहयोचं काम मिळावं' असं निवेदन सरपंच व ग्रामसेवकाला दिलं. या महिलांमध्ये पुढाकारात वनिता शेंडे होत्या.

'मकाम'च्या ऑनलाईन शिबिरात मला रोजगार हमी योजनेची माहिती

मिळाली., वनिताताई सांगतात, ती माहिती मी बायांना सांगितली. आम्ही एकत्र आलो आणि कामाची मागणी केली. रोहयो कायद्याप्रमाणे मागेल त्यांना काम मिळायला हवं. पण महिलांनी काम मागणं ग्रामसेवकाला अगदीच अनपेक्षित होतं. आधी त्यानं टाळाटाळ केली. पण वनिताताई दोघी-चौघींना सोबत घेऊन ग्रामपंचायतीत गेल्या. पाठपुरावा केला. ग्रामसेवकाला महिलांचं हे धाडस रुचलं नसावं. या महिलांना नाउमेद करण्यासाठी त्यानं चालबाजी केली. दहा फूट विहीर खोदाई व खड्ड्यातून मलबा-दगड काढणं. हे काम सुचवलं गेलं. अशी कामं पुरुष मजुरांना दिली जातात. त्यामुळं महिलांनी ते काम केलं नाही. महिलांनी कामाची मागणी केली, पण काम केलं नाही, म्हणून ग्रामसेवकाने नोटीसही पाठवली. महिला त्यामुळे थोड्या घाबरल्या. पण नंतर हे प्रकरण निवळलं. न झेपणारं काम देणं ही ग्रामसेवकाचीच चूक होती हे वनिताताईंनीच महिलांना समजावून सांगितलं. वनिताताई म्हणतात, कामाची मागणी केल्यामुळं रोजगार हमी योजनेत कोणकोणती कामं काढली जातात, हे आम्हाला कळलं. पुढच्या वेळी कामाची मागणी करताना आम्ही कामंही सुचवू.

या घडामोडीतून काय साधलं? या प्रश्नाचं उत्तर आहे – आत्महत्यांनी पीडित शेतकरी-शेतमजूर विधवा महिलांमध्ये आलेला आत्मविश्वास व बळ!

महाराष्ट्रात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या यवतमाळमध्ये झाल्यात. या जिल्ह्यातील कळंब तालुक्यातलं तिरझडा हे वनिता शेंडेंचं गाव. २०२१ पर्यंत तिरझडा गावात तीसहून अधिक शेतकरी आत्महत्यांची नोंद आहे. वनिताताईंच्या पतीनंही २०१३ साली आत्महत्या केली. त्या सांगतात, आमच्या सोयऱ्यातल्याच तेरा जणांनी आत्महत्या केलीय. गावातील एकूण आत्महत्यांपैकी जवळपास निम्म्या आत्महत्या वनिताताईंच्या नात्यातील आहेत.

बाईचं निराधार असणं वनिताताईंनी हयातभर अनुभवलंय. नवरा हयात असताना नि त्याच्या मृत्यूनंतरही त्या एकट्याच जगत आल्यात. वनितांताईंनी एकल महिलांची माहिती घ्यायला सुरुवात केली, तेव्हा त्यांना एकेकीची व्यथा आपल्यासारखीच आहे, हे समजलं. त्यांच्या गावातील नलुबाईचा नवरा शेतकरी होता. कारण सातबारावर त्याचं नाव होतं, नलुबाई मात्र नवऱ्याच्या आत्महत्येनंतर तिच्याच जमिनीत केवळ शेतमजूर आहे. कारण जमिनीची मालकी नलुबाईच्या मोठ्या दिराकडे आहे. तिला वारसा हक्क नाकारला गेलाय. कोर्टकचेरी-कज्जे करण्याचं बळ नलुबाईत नाही. दुसरी शारदा, हिच्या

पतीनं शेती विकली. त्यानंतर आलेल्या नादारीनं तो खचला. या नैराश्यात शारदाच्या नवऱ्यानं आत्महत्या केली. आता तिला जगण्याचं साधनच नाही. आत्महत्या पीडित ग्रामीण महिलांची कहाणी अशी निराधार होण्यापर्यंत येऊन ठेपते. वनिता तर बालपणापासून निराधार असणंच अनुभवतेय.

वनिता चौथीपर्यंतच शाळेत गेली. दोन भावांनंतर ही कुटुंबातली सर्वात धाकटी. आई-वडील भूमिहीन. ते मोलमजुरी करत. मुलांचं शिक्षण या कुटुंबाला पेलवणारं नव्हतं. थोरला भाऊ हुशार होता. त्यामुळं त्याचं शिक्षण सुरू ठेवलं गेलं. मधव्यानं डोकं चालत नाही म्हणून शाळा सोडली. वनिताला शिकवून उपयोग नाही, असं आईवडलांना वाटलं, त्यामुळं तिची शाळा सुटली. शिक्षण थांबणं हा वनिताच्या निराधार होण्यातला पहिला टप्पा.

दुसरा टप्पा लग्नानंतर सुरू झाला. वनिताताई सांगतात, १९८९ मध्ये वनितांचं यादवराव शेंडेंशी लग्न झालं. यादवरावांना जुगार व गांजाच्या नशेचा नाद होता. नोकरी व कष्ट करण्यात त्यांना फारसा रस नव्हता. थोरली सून असल्याने शेती व कुटुंबातल्या सगळ्या कामांचा ताण वनितावर पडू लागला. शिवाय नवरा एवढ्या तेवढ्या कारणाने मारझोडही करायचा.'' या त्रासाला कंटाळून वनिता माहेरी आली.

भांडणं-मारझोड व तडजोड असाच वनिताचा संसार सुरू होता. त्यातून वनिताला दोन मुलं झाली.

पहिल्या मुलीनंतर पाच वर्षांनी मुलगा झाला. मुलाला जन्म दिल्याने वनिताला थोडीशी सहानुभूती मिळू लागली. पण नंतरच्या काळात अचानक तिच्या अंगावर पांढरे डाग उमटू लागले. हे कोडाचे डाग होते. त्यामुळे वनिताला दोष देण्याचं नवं कारण सासरच्या लोकांना मिळालं. नात्यातील माणसंही वनिताचा स्पर्श टाळू लागली. तिच्याकडे पाहणंही लोकांना अपशकुनासारखं वाटू लागलं. या काळात वनिता जास्त खचली. मुळात कष्टाळू असलेल्या वनिताला काम करणंही मुश्कील झालं. कारण उन्हात गेल्यावर कातडीवर फोड यायचे. अंगाची आग व्हायची. तरीही तिनं पूर्ण बाह्यांचे शर्ट घालून काम सुरू केलं. पण अनेकदा कोडाचे डाग पाहून काही शेतकरी तिला मोलमजुरीचं कामही नाकारत. नवऱ्यानेही संबंध तोडले. मग ती परत एकदा माहेरी येऊन राहायला लागली.

भावाची आर्थिक परिस्थिती बेताची होती. त्यामुळे वनिताताईंना मोलमजुरी करणं भाग होतं. आपल्या लहान मुलांना त्यांनीच कष्ट करून वाढवलं. पण मुलगी अठरा वर्षांची झाल्यावर त्या पुन्हा सासरी आल्या. 'मुलीचं लग्नाचं

वय झालेलं. ती बापाच्या घरी असली तरच लग्न जुळणार' या कारणानं बरीच वर्ष निराधार राहिलेल्या वनितार्ताई पुन्हा नवऱ्याकडे आल्या. यादवरावांनीही मुलीच्या लग्नाची जबाबदारी स्वीकारली. लग्न जुळवलं. लग्नासाठी कर्ज काढलं. पण नंतर कर्जाचा भार सहन न झाल्यानं यादवरावांनी गळफास घेतला. वनिता पुन्हा निराधार झाली.

वनितार्ताई सांगतात, नवऱ्याची बॉडी पोस्टमॉर्टमला दवाखान्यात नेली. तिथून बॉडी प्लास्टिकमध्ये गुंडाळून देतात. त्यासाठी पैसे द्यावे लागतात. मयतीलाही खर्च आला. सासरच्या लोकांनी तो सगळा खर्च माझ्याकडून घेतला. ही शेतकरी आत्महत्या असल्याने सरकारकडून एक लाख रुपयांचं अर्थसाह्य मिळालं. वनितार्ताई म्हणतात, तीस हजार रुपये रोख मिळाले. आणि सत्तर हजार रुपये पोस्टात डिपॉझिट झाले. मिळालेल्या रोख रकमेत आणखी भर घालून वनितार्ताईंनी नवऱ्याचं कर्ज फेडलं. हे कर्ज फेडण्यासाठीही सासरच्या लोकांची मदत मिळाली नाही. सरकारी मदत वनितार्ताईंच्या नावावर जमा झाल्याचाही राग सासरच्या लोकांना असावा. त्यामुळे इथून वेगळा दुस्वास त्यांच्या पाठी लागला.

मुलगा लहान होता. सासरच्या मंडळींना जमिनीत या मायलेकांची हिस्सेदारी नको होती. त्यामुळे वरचेवर भांडणं सुरू झाली. दीर व जाऊ अंगावर धावून येत. गलिच्छ शिव्या दिल्या जात. दुसरीकडं विधवा म्हणून समाजात मिसळण्यावर बंधनं आली. नात्यातली लग्नकार्य, बारसं, सण-समारंभातून डावलनं सुरू झालं. वारंवार अपमान होऊ लागले. या सर्व अवहेलनेचा हेतू होता वारसा हक्कातनं बेदखल करणं. आधीच कोड असलेली बाई त्यात विधवा त्यामुळे गैरसमजुती व कुपरंपरांचा दुहेरी जाच सुरू झाला. या काळात वनितार्ताई 'प्रेरणा ग्रामविकास संस्थे'च्या माधुरी खडसेंच्या संपर्कात आल्या. प्रेरणा संस्था एकल महिलांना मदतीसाठी कार्यरत आहे. संस्थेनं वनितार्ताईंना धीर दिला. त्यांची मुलेही आता मोठी झाली होती, आणि आईला पाठिंबा देत होती. त्यामुळे वनितार्ताईंनी नवऱ्या पश्चात वारशाची जमीन नावे करून घेण्यासाठी प्रयत्न सुरू केले.

कुटुंबाकडे एकूण सात एकर जमीन होती. त्यापैकी वनितार्ताईंचा नवरा आणि त्यांचा दीर ह्यांच्यात मिळून साडेतीन एकर आणि त्यांच्या तीन सावत्र नणंदांमध्ये मिळून साडेतीन एकर अशी विभागणी झाली होती. नवऱ्याच्या पश्चात वारसनोंद करून आपले व मुलांचे नाव सात-बारा उताऱ्यावर कसे लावायचे ह्याची त्यांना नीट माहिती नव्हती, त्यामध्ये अधिकारी विनाकारण

**वनिताताई सांगतात, नवऱ्याची बॉडी पोस्टमॉर्टमला दवाखान्यात नेली. तिथून बॉडी प्लास्टिकमध्ये गुंडाळून देतात. त्यासाठी पैसे द्यावे लागतात. मयतीलाही खर्च आला. सासरच्या लोकांनी तो सगळा खर्च माझ्याकडून घेतला. ही शेतकरी आत्महत्या असल्याने सरकारकडून एक लाख रुपयांचं अर्थसाह्य मिळालं. वनिताताई म्हणतात, तीस हजार रुपये रोख मिळाले. आणि सत्तर हजार रुपये पोस्टात डिपॉझिट झाले. मिळालेल्या रोख रकमेत आणखी भर घालून वनिताताईंनी नवऱ्याचं कर्ज फेडलं. हे कर्ज फेडण्यासाठीही सासरच्या लोकांची मदत मिळाली नाही.**

अडवणूक करत होते. सरकारी कार्यालयामध्ये वारंवार फेऱ्या माराव्या लागल्या. पण अखेर पाठपुरावा करून वनिताताईंनी पावणेदोन एकर जमीन आपल्या नावावर करून घेतली. पावणेदोन एकरमध्ये शेती ती काय होणार? निदान आपली उपजीविका भागावी ह्यासाठी आपल्याकडे थोडी अधिक जमीन असावी आणि परंपरेप्रमाणे नणंदांनी जमिनीवरील आपला हक्क सोडून द्यावा अशी त्यांची अपेक्षा होती. त्यासाठी वनिताताईंनी नणंदांना आपली परिस्थिती सांगितली, त्यांना साडी-चोळी केली, घरी बोलवून मानपान दिला. नणंदांनी आधी अडवणूक केली, पण नंतर जमिनीवरील हक्क सोडला. आता वनिताताईंच्या वाट्याला आलेली साडेतीन एकर जमीन त्या कसत आहेत.

वनिताताईंना आपला अधिकार मिळाला पण नणंदांचा जमिनीवरील हक्क मात्र गेला. ही काही एकट्या वनिताताईंची गोष्ट नाही. कायद्याने माहेरच्या संपत्तीमध्ये महिलांना हक्क दिलेला असला तरी प्रत्यक्षात मात्र तो मिळताना बहुतेक ठिकाणी दिसत नाही. बहुतेक महिला आपल्या माहेरच्या जमिनीवरील अधिकार सोडून देतात, आणि आपल्या नणंदांकडूनही तशीच अपेक्षा ठेवतात. ज्या पितृसत्ताक व्यवस्थेमध्ये त्या वाढल्या आहेत त्या व्यवस्थेने घडवलेली ही विचारसरणी आहे. ही व्यवस्था महिला-महिलांमध्ये कशा प्रकारे तेढ निर्माण करते हे समजून घेऊन त्यामधून बाहेर पडणे लगेच होणार नाही. त्या दृष्टीने प्रयत्न करत राहणे हा 'मकाम'च्या प्रशिक्षण उपक्रमाचा एक भाग आहे.

खेड्यातील महिला काही खास सणांना उत्साहानं एकत्र येतात. पण हे सण साजरे करताना केवळ सवाष्ण महिलांनाच बोलवलं जातं. संक्रातीला होणारं तिळगूळ वाटप किंवा हळदी-कुंकू समारंभात विधवांना मज्जाव केला जातो. त्यामुळे 'प्रेरणा संस्थे'ने खास एकल महिलांचा तिळगूळ समारंभ आयोजित

केला. या कार्यक्रमासाठी गावातल्या एकट्या महिलांना संघटित करण्यात वनितातार्ईंनी पुढाकार घेतला. विधवा तसंच पाळी आलेल्या महिलांनी हळदीच्या रोपाला स्पर्श करू नये असा एक गैरसमज आहे. ही समजूत मोडीत काढण्यासाठी वनितातार्ईंनी आपल्या अंगणात हळद पेरून दाखवली. ही हळदीची रोपं त्या आल्यागेल्यांना आवर्जून दाखवू लागल्या.

वनितातार्ईंनी एकल महिलांचा बचत गट स्थापन केला. 'मकाम'च्या प्रशिक्षणामध्ये सहभागी झाल्यानंतर गावातील १० एकल महिलांच्या मुलाखती घेतल्या. त्यांची तपशीलवार माहिती नोंदवली. कोरोना काळात गावात जनजागृतीच्या कार्यातही पुढाकार घेतला. रोहयोतून एकल महिलांसाठी कामाची मागणी केली. गावात यापूर्वी न घडलेली गोष्ट त्यांनी घडवली.

अलीकडे एक ग्रामपंचायत सदस्य वनितातार्ईंच्या शेताजवळून जात होता. शेतातला कापूस पाहून तो कौतुक करू लागला. त्याचं बोलणं ऐकून वनिता धावत तिथे आल्या नि त्याला अभिमानानं सांगू लागल्या, हे बाईचं शेत आहे! बाईचं शेत आहे!! एका महिलेनं हे बहारदार पीक घेतलंय हे त्या ठासून सांगत होत्या. त्यांचा आनंद पाहून या ग्रामपंचायत सदस्यानं 'महिला शेतकरी' अशी नोंद करून देण्याची ग्वाही दिली. वनितातार्ई अभिमानानं सांगतात, माझ्या तीन एकर वावरात मी पहिल्यांदा सोळा क्विंटल कापूस काढला. मग २५ क्विंटल. यंदा २६ ते २७ क्विंटल कापूस काढणार आहे. म्हणजे मागच्या वर्षीपेक्षा दोन क्विंटल जास्त... 'मकाम' ला आपल्या सदस्यांकडून हाच आत्मविश्वास अपेक्षित आहे! ●



# खंजिरा कराडे

▶ मकानने माझी महिला लिडर म्हणून निवड केली. खंजिराताई म्हणाल्या.

'त्यानंतर काय घडलं?' असं विचारल्यावर खंजिराताईंचा चेहरा फुलला. त्या हसून म्हणाल्या, मग मी मोबाईल विकत घेतला.

कुरखेडा तालुक्यातील खडकी हे १५० कुटुंबांचं गाव खंजिराताईंचं माहेर. बारावीनंतर त्यांचं शिक्षण थांबलं. कारण मुलीला होस्टेलवर ठेवून शिकवणं त्यांच्या पालकांना धोक्याचं वाटलं. छोट्या गावातील मुलींचं शिक्षण थांबण्यामागे ही भीती अनेकदा असते. खंजिराताईंना किमान शिवणक्लास तरी लावण्याची इच्छा होती. पण तेही शक्य झालं नाही. लग्नानंतर त्या चिचेवाडा गावात आल्या. त्या म्हणतात, सासरी आल्यावर मी घरातच राहायचे. कमी बोलायचे. मला लोकांशी बोलायची भीती वाटायची. बचत गटात सामील झाल्यानंतर माझी भीती गेली.

खंजिराताईंचे यजमान पुंडलीकरावांचं ग्रॅज्युएशनपर्यंत शिक्षण झालंय. खंजिराताई

म्हणतात, माझे मिस्टर मला मीटींगला जायला सपोर्ट करतात. 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी संस्थे'चे विविध विकास उपक्रम चिचेवाडा गावात सुरू आहेत. या गावात ग्रामसभा सशक्त करण्यात संस्थेनं लक्षणीय काम केलंय. त्याचप्रमाणे महिलांचे बचत गट व शेतकरी गटांचीही स्थापना झालीय. खंजिराताई शेतकरी गटाच्या अध्यक्ष आहेत. गावातली शिकलेली महिला म्हणून त्यांची या पदावर निवड झाली. २०१५ पासून खंजिराताई 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी' संस्थेसोबत काही ना काही निमित्ताने जोडलेल्या होत्या. संस्थेच्या पाठिंब्यामुळं खंजिराताईंमध्ये धीटपणा आला. २०२० पासून ''मकाम''शी जोडल्या गेल्यानंतर त्या अधिकच खुलल्या.

लॉकडाऊन काळात 'मकाम'ची ऑनलाईन सत्रं सुरू झाली. खंजिराताईंच्या गावात मोबाईलचं नेटवर्क येत नाही. ऑनलाईन बैठकांना येण्यासाठी त्यांना १४ कि.मी. गावाबाहेर येणं भाग होतं. वाहनं बंद होती. पण तरीही त्या नवऱ्याच्या मदतीनं या सत्रांसाठी आवर्जून उपस्थित राहू लागल्या. यांची मीटिंग संपेपर्यंत पुंडलीकराव बाहेर कुठेतरी थांबून यांची वाट पाहत.

''मकाम''च्या मीटिंगमध्ये सामील होता यावं यासाठी त्यांनी सेकंडहँड मोबाईल विकत घेतला. पहिल्यांदाच त्या ऑनलाईन मीटिंग करत होत्या. त्या म्हणतात, मला भीती वाटत होती. आपण ऑनलाईन कसं बोलायचं? समोरच्यांना आपण दिसतोय का? याचं दडपण यायचं. ''मकाम''च्या सत्रांमुळं खंजिराताईंची मोबाईल वापरण्याची भीती गेली. ''मकाम''मुळेच त्यांना गावातील एकल महिलांचे प्रश्न समजले. हा त्यांच्या व्यक्तिमत्त्व घडलेला त्याही पुढचा बदल.

खंजिराताईंनी 'मकाम'च्या कार्याचा भाग म्हणून गावातील एकट्या महिलांच्या मुलाखती घेतल्या. या मुलाखतींबद्दल त्या सांगतात, गावातली एक ६५ वर्षांची बाई. तेरा वर्ष झाली तिचा नवरा वारला. त्यानंतर तिचं नाव नवऱ्याच्या हिश्शाच्या शेतीवर लागायला पाहिजे होतं. पण तिला कुणी हे सांगितलंच नव्हतं. दिरानं तिला थोडीशी जमीन कसायला दिली होती. पण सातबारावर तिचं नाव नव्हतं. दुसरी ४५ वर्षांची बाई. पाच वर्षांपूर्वी तिचा नवरा साप चावून वारला. हिचं नावही सातबाऱ्यावर लागलं नव्हतं. एक ३० वर्षांची विधवा. तिला मूलबाळ नाही. त्यामुळं सासरच्या लोकांनी तिला शेतीतला हिस्सा नाही दिला. अशा दहा एकल महिलांच्या मुलाखती खंजिराताईंनी घेतल्या. सगळींची व्यथा सारखीच. शेतीवर गुजराण करणाऱ्या या स्त्रिया. पण त्यांचं नाव सातबारावर नोंदवलेलं नाही. शेतकऱ्यांना हल्ली केंद्र सरकारच्या 'किसान सन्मान योजने'तून वर्षाला सहा हजार रुपये मिळतात. या महिलांना त्या योजनेची माहिती नव्हती. योजनेचा लाभ तर दूरच. एकटी शेतकरी बाई असल्यामुळं ट्रॅक्टरची सोय पाहणं, बियाणं

**''मकाम''च्या मीटिंगमध्ये सामील होता यावं यासाठी त्यांनी सेकंडहँड मोबाईल विकत घेतला. पहिल्यांदाच त्या ऑनलाईन मीटिंग करत होत्या. त्या म्हणतात, मला भीती वाटत होती. आपण ऑनलाईन कसं बोलायचं? समोरच्यांना आपण दिसतोय का? याचं दडपण यायचं. ''मकाम''च्या सत्रांमुळं खंजिराताईंची मोबाईल वापरण्याची भीती गेली. ''मकाम''मुळेच त्यांना गावातील एकल महिलांचे प्रश्न समजले. हा त्यांच्या व्यक्तिमत्त्व घडलेला त्याही पुढचा बदल.**

घेणं ही कामं करण्यात त्यांना अडचणी येत होत्या. ट्रॅक्टरवाल्याला या बायका कमी महत्त्वाच्या वाटतात. त्यामुळं तो पुरुष शेतकऱ्यांच्या कामांना प्राधान्य देतो.

खंजिराताई सांगतात, विधवा-परित्यक्ता बाईबद्दल वाईटसाईट चर्चा करायला लोक टपलेलेच असतात. काहीही अफवा पसरवतात. एक बाई तिच्या ओळखीच्या पुरुषाबरोबर मोटरसायकलवर बसून तलाठी ऑफिसला गेली. सातबाऱ्यावर नाव नोंदवण्यासाठी तिनं त्याची मदत घेतलेली. त्या मदतीसाठी तिनं त्याला हॉटेलात चहा पाजला. तर ही बाई हॉटेलात पुरुषाबरोबर बसली म्हणून गावात तिची बदनामी झाली. एखादीला बल्ब बसवायचा असला, गॅस सिलेंडरचा पाईप बसवायचा असला, त्यासाठी ओळखीच्या पुरुषाला सांगितलं तर शेजारीपाजारी त्या बाईबद्दल वाईट बोलायला लागतात. अशा समस्यांवर गावात बोलणार तरी कुणाशी? मुलाखतींच्या निमित्ताने या महिला खंजिराताईंशी मनमोकळं बोलल्या. खंजिराताईंनी त्यांना तलाठी कार्यालयात जाऊन सातबारावर नोंदणी करायला प्रवृत्त केलं. खंजिराताईंच्या मते गावात २५ ते ३० विधवा-एकल महिला आहेत. त्यातल्या दहाजणींना आतापर्यंत खंजिराताईंची मदत मिळालीय.

महिलांनी गावात रोहयोची कामं सुचवावीत यासाठी खंजिराताईंनी २०-२५ महिलांना सोबत घेऊन शिवार फेरी काढली. या फेरीमुळं एरवी रोहयो अंतर्गत कधीच सुचवली गेली नसती अशी कामं महिलांनी सुचवली. गावातल्या अंगणवाडीजवळ एक डबकं साचलेलं. या डबक्यामुळं डास वाढतात, अंगणवाडीतल्या लहान मुलांना डबक्याचा धोका आहे. हे हेरून महिलांनी हा खड्डा रोहयोतून बुजवण्याचं ग्रामपंचायतीला सुचवलंय. तसंच गावातल्या तळ्याजवळ धुणं धुवायला घाट बांधावा. ही सूचनाही महिलांच्या शिवार फेरीतून पुढे आली. त्याचप्रमाणे ग्रामपंचायतीने नळ योजनेतून पाणी पोचवावं. ते जमत नसेल तर किमान गावातल्या चौकाचौकात विहिरी बांधाव्यात म्हणजे महिलांचे

पाणी आणायचे कष्ट वाचतील. ही सूचनाही शिवार फेरीमुळेच महिलांनी केली. 'मकाम'मधून मिळालेल्या माहितीचा असा उपयोग खंजिराताईंच्या पुढाकारामुळे गावातील महिलांना होऊ लागलाय.

गावातील इतर प्रश्नातही खंजिराताई हस्तक्षेप करतात. गडचिरोलीमध्ये कोविडचे पहिले रुग्ण त्यांच्या गावातच आढळले. हे शहरातून गावी आलेले तीन मजूर होते. गावकऱ्यांनी त्यांना क्वारंटाईन केलं. पण गावातल्या काही लोकांनी या मजुरांच्या कुटुंबांशीही संपर्क-संवाद बंद केला. कारण हे लोक रुग्णांना जेवण पुरवत होते. या कुटुंबांमुळं आपल्याला कोरोना होईल या भीतीमुळे लोकांनी जवळपास त्यांच्यावर बहिष्कारच टाकलेला. हा पेच सोडवण्यासाठी खंजिराताई पुढे आल्या. त्यांनी या कुटुंबांची विचारपूस केली. त्यांना धीर दिला. यांच्याशी संबंध तोडणाऱ्यांशीही जाऊन त्या बोलल्या. गावात कोविडविरोधी लस घ्यायलाही अनेकजण घाबरत होते. खंजिराताईंनी पहिल्यांदा लस घेऊन इतरांची भीती घालवायला मदत केली.

खंजिराताई बोलक्या आहेत. पण त्यांना सुरक्षित वाटतं, अशाच लोकांशी त्या अधिक खुलतात. 'मकाम'शी संपर्कात आल्यावर तुमच्यात कोणता बदल झाला, असं विचारल्यावर त्या म्हणतात, मी आता सरकारी अधिकाऱ्यांशी बोलायला लागले. आधी भीती वाटायची. आता मी बायकांना घेऊन तलाठी ऑफिसात जायला लागले. वारसा हक्क नोंदवण्यासाठी कोणती कागदपत्रं लागतात, ती कुठून, कशी काढायची हे मला समजलं. त्यामुळे सरकारी ऑफिसची भीती गेली.

यापूर्वी बचत गट, शेळीपालन यासारख्या कामात असलेल्या खंजिराताई, आता 'मकाम'मुळे एकल महिलांचे प्रश्नही मांडू लागल्यात. गावातील वंचित महिलांना कायदेशीर हक्क मिळावेत यासाठी त्या बोलू लागल्यात. मी गावातील महिलांची लिडर आहे., असं त्या सांगतात. 'लिडर म्हणजे कोण?' असं विचारल्यावर त्या म्हणाल्या, बायकांची मदत करणारी! लोकांना वाटतं हिला काहीतरी भेटत असेल म्हणून ही लिडरकी करायला लागली. पण बायकांना मदत केल्यावर मला बरं वाटतं. बाकी काही मिळत नाही. हीच माझी लिडरकी!

'तुम्ही इतर बायकांना सातबाऱ्यावर नाव नोंदवायला मदत करता. तुमचं नाव आहे का तुमच्या सातबारावर?' असं विचारल्यावर खंजिराताई आधी हसल्या. मग 'नाही!' असं सांगून म्हणाल्या, अजून आमची जमीन सासऱ्यांच्याच नावावर आहे. नवराच वारसदार आहे. पण मी हसत हसत त्यांना माझं नाव नोंदवा म्हणून सांगितलं तर ते नाही म्हणणार नाहीत. माझे मिस्टर समजूतदार आहेत. ते मला सपोर्ट करतील. ●



# कलावती सवंडकर

▶ कलावती सवंडकरांचं शिक्षण फक्त सातवीपर्यंतच झालंय. पण आपल्या गावातील एकल व विधवा महिलांची आकडेवारी त्यांना तोंडपाठ आहे. त्या सांगतात, आमच्या गावची लोकसंख्या सा हजार नवशे तीस, त्यात तीनशे बावीस विधवा बाया हायती न् एकोणीसजणी एकल महिला हायेत. ही आकडेवारी कलावतीताईंनी मतदार यादीतून मिळवलीय. प्रश्न सोडवण्यासाठी हवं असं सर्व कसब कलावतीताईंनी गेल्या दोन वर्षात 'मकाम'च्या सोबतीनं अर्जित केलंय.

२०१६ मध्ये कलावतीताईंच्या पतीनं आत्महत्या केली. एका मुलीचं लग्न, दुसऱ्या मुलीचं आजारपण नि शेतीसाठी घेतलेल्या कर्जाचा ताण पतीवर आला. पण शासकीय यंत्रणेनं या मृत्यूला 'शेतकरी आत्महत्या' मानलेलं नाही. 'सह्याद्री' या संस्थेनं आत्महत्याग्रस्त कुटुंबांचं सर्व्हेक्षण सुरू केलं. त्या

प्रक्रियेत कलावतीताईंना आपल्या प्रश्नांची जाणीव झाली. त्यामुळे आपल्या पतीचा मृत्यू 'शेतकरी आत्महत्या' होती हे सिद्ध करण्यासाठी त्या प्रयत्न करू लागल्या. पाच वर्षे झाली कलावतीताई सरकारी कचेऱ्यात चकरा मारताहेत. त्या म्हणतात, आत्महत्या झाली हे सरकारनी मानलं तर आम्हाला एक लाख रुपयाची मदत मिळलं. त्यातून मी कर्ज तरी फेडू शकलं.

स्वत:चे प्रश्न सोडवताना कलावतीताईंना विधवा महिलांचे प्रश्न प्रकर्षानं जाणवले. पेन्शन व इतर योजनांसाठी किती यातायात करावी लागते याची जाणीव झाली. कोणकोणती कागदपत्रं लागतात, ऑनलाईन अर्ज कसा, कुठे करायचा याची माहिती झाली. २०१८ पासून त्या 'मकाम'सोबत जोडल्या गेल्या. त्यामुळे त्यांनी गावातील विधवा-परित्यक्ता महिलांची माहिती जमवायला सुरुवात केली. या महिलांशी त्यांचं मैत्रीचं नातं जुळलं. गावातील विधवा कलावतीताईंना विश्वासानं आपल्या अडचणी सांगू लागल्या. या अडचणींतून मार्ग काढता काढता कलावतीताईंमध्ये नेतृत्त्व क्षमताही विकसित झाली.

एकट्या-विधवांना साधं रेशन कार्डही सहज मिळत नाही. अशा छोट्याशा कामांतही कलावतीताईंसारख्या बाईचं नेतृत्त्व कळीची भूमिका पार पाडतं. अलीकडचीच एक घटना आहे.

काकू समद्याला राशन मिळतंय. मलाच मिळंना झालंय. एकजनानी तीन हजार रुपय लागत्यातं म्हून सांगितलंय. मजजवळ तेवढं पैसं न्हाईत. तुम्ही राशन सुरू करायला मदत करता म्हणं... गावातील शोभाबाईंनी कलावतीताईंना विनंती केली. शोभाबाईंच्या पतीचं २०१६ मध्ये निधन झालं. दोन छोट्या मुलांची जबाबदारी शोभाबाईंवर आली. शेतीचा कारभार या बाईनं खंबीरपणे सावरला. सरकारकडून स्वस्त धान्य मिळालं तर ती अधिक समर्थपणे आपल्या मुलांचा सांभाळ करू शकते. पण रेशनकार्ड काढण्यासाठी काय करावं लागतं हे तिला माहीत नव्हतं. गावातील एकजण रेशनकार्ड काढून देतो. त्याच्याकडे शोभाबाई गेल्या. त्यानं सांगितलेला खर्च शोभाबाईंना पेलवणारा नव्हता. म्हणून त्या कलावतीताईंकडे आल्या. कलावतीताई त्यांना म्हणाल्या, आपण वसमतला जाऊ. तुम्ही माझं तिकीट काढा. बघू काय होतंय. शोभाबाईंनी गाडीभाड्याचा खर्च केला. दोघी तालुक्याला गेल्या. तलाठी कार्यालयातून अर्ज घेतला गेला. आवश्यक कागदपत्रं जमवली. त्यावर नंतर गावातील सरपंचाची सहीदेखील मिळवली.

आता फक्त रेशन दुकानदाराची सही हवी होती. पण दुकानदार टाळाटाळ

करू लागला. कदाचित रेशनकार्ड काढून देणाऱ्या इसमाशी दुकानदाराचं संधान असावं. अनेकदा पाठपुरावा करूनही तो सही देत नव्हता. अखेर एकदा कलावतीताईंनी त्याला फोन लावला. दुकानदार म्हणाला मी तालुक्याला आलोय. तिथं अर्ज घेऊन या तालुक्याला पोहोचून यांनी पुन्हा फोन केला. तर दुकानदार म्हणाला मी भाजी मंडईत आहे, तिथं या. या दोघी तिथे गेल्या. तर दुकानदार तिथे नव्हता. पुन्हा फोन लावल्यावर त्यानं तहसील कार्यालयात यायला सांगितलं. तिथे पोहोचल्या तर तिथेही हा नाही. मग यांनी तिथल्या एका पुरुषाला फोनवर बोलायची विनंती केली. मग दुकानदारानं तिथेच वाट पाहत थांबायला सांगितलं. दीड तासानं तो आला. सही झाली. कलावतीताई सोबत नसत्या तर शोभाबाईंचा अर्जच दाखल झाला नसता.

आणखीही अशीच एक घटना आहे.

सिताबाईचा नवरा २०१४ मध्ये वारला. तिला वारस नोंदणी करायची होती. कलावतीताईंच्या मदतीनं ती तहसील कार्यालयात आली. कागदपत्रं जमा केली. सिताबाईच्या नवऱ्यानं जिल्हा सहकारी बँकेतून काही कर्ज घेतलं होतं. ते कर्ज फेडण्यात आलं होतं. पण कर्जफेडीचा दाखला मिळाल्याशिवाय सिताबाईला जमिनीवर नवं कर्ज मिळू शकत नाही. त्यामुळे 'तालुक्यात आलोच आहोत, तर हा दाखलाही मिळवू' म्हणून सिताबाई कलावतीताईंसोबत बँकेत आल्या. तिथल्या अधिकाऱ्यानं त्यांना दुसऱ्या दिवशी यायला सांगितलं. त्या गेल्या. अधिकाऱ्यानं त्यांच्याकडे पाहिलं. पुन्हा 'उद्या या' म्हणाला. त्या दोघी तिसऱ्यांदाही गेल्या. यावेळी कलावतीताई अधिकाऱ्याला म्हणाल्या, आम्ही तीन दिवस रोज मजुरी बुडवून चकरा मारतोय. गाडीभाड्याला रोज शंभर रुपय खर्च होत्यात. आम्हाला फक्त पावती पायजे. ती द्या. मग आम्ही जातो. तर अधिकारी म्हणाला, काय ह्या गावंढळ बायांचा त्रास! आज तुमचं काम होत नसतंय! अधिकाऱ्यानं केलेला अपमान कलावतीताईंनी तिथे सहन केला. पण त्या सिताबाईंना घेऊन तहसील कार्यालयात आल्या. वसमतमध्ये एक नवीनच महिला तहसीलदार आलेल्या. त्यांना कलावतीताईंनी सगळी हकीगत ऐकवली. या अधिकारी बाई संवेदनशील होत्या. त्या म्हणाल्या, तुम्ही गावात जा. तुमच्या घरी पावती येईल. दोन दिवसांनी बँकेचा माणूस दाखला घेऊन सिताबाईंच्या घरी आला. पण कलावतीताईंनी सिताबाईंना आधीच सांगितलं होतं, – बुडालेल्या रोजमजुरीचे पैसे दिले तरच पावती घ्यायची! सिताबाईंनी पावती स्वीकारायला स्पष्ट नकार दिला. बँकेच्या कर्मचाऱ्यानं विनवण्या केल्या. कलावतीताईंनी त्या कर्मचाऱ्याला दुसऱ्या दिवशी यायला

सांगितलं. तो कर्मचारी निमूट दुसऱ्या दिवशी आला. ‘जशास तसं!’ असा कलावतीताईंचा न्याय आहे. विधवा-एकल महिलांना कुणीही सन्मानानं वागवत नाही. कलावतीताईंनी अशा प्रकारे सिताबाईला आत्मसन्मान मिळवून दिला, तर यात गैर काय?

कलावतींचे आई-वडील अशिक्षित. गावात शाळा होती. म्हणून ती सातव्या इयत्तेपर्यंत शिकली. शेतात कष्टाला माणसं हवीत नि शिक्षणावरचा खर्च परवडत नाही म्हणून तिचं शिक्षण थांबलं. वयाच्या सोळाव्या वर्षीच तिचं लग्न तुळशीराम सवंडकरांशी झालं. तुळशीराम अशिक्षित होते. या शेतकऱ्याच्या संसारात कलावती रमल्या. त्यांना तीन मुलं झाली. नंदा, पंढरी व राधा. नंदाचं २०१२ मध्ये लग्नं झालं. या लग्नासाठी त्यांना १ लाख ३० हजार रुपये हुंडा द्यावा लागला. साधारणत: दोन लाख रुपये खर्च आला. त्यासाठी सावकारांकडून कर्ज घेतलेलं. ते फेडत असतानाच धाकटी राधा आजारी पडली. हा मेंदूज्वर होता. बऱ्याच दवाखान्यात नेलं. नांदेडला मोठ्या दवाखान्यातही ठेवलं. पण उपयोग झाला नाही. राधा वारली. या मुलीच्या औषधोपचारांसाठी पुन्हा सावकारांकडून साठ हजारांचं कर्ज घेतलं गेलं. हे कर्ज त्यांना फेडता येईना. त्यात शेतीकडे दुर्लक्ष होऊ लागलं. व्याज वाढतच होतं. अखेर हा ताण असह्य झाल्यानं तुळशीरामरावांनी आत्महत्या केली. ही घटना घडली तेव्हा पंढरी नववीत शिकत होता. वडीलांच्या मृत्यूनंतर पंढरीचंही शिक्षण थांबलं. शेतीची जबाबदारी पंढरी व कलावतींवर आली.

२०१४ पासून ‘सह्याद्री’ ही संस्था शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांची माहिती घेत आहे. २०१६ मध्ये कलावतीताईंकडूनही संस्थेनं माहिती घेतली. या निमित्तानं त्या संस्थेच्या संपर्कात आल्या. विधवा पेन्शन मिळवण्यासाठी किती अडचणी येतात याबाबत कलावतीताईंना अनुभव आलेला. आपल्या अडचणी त्यांनी संस्थेला सांगितल्या. कलावतीताईंमधील नेतृत्त्वगुण हेरून संस्थेनं त्यांना ‘मकाम’ संघटनेत सहभागी व्हायला सुचवलं.

‘मकाम’ सोबत काम करताना कलावतीताईंनी आतापर्यंत २५ विधवांना पेन्शन मिळावी यासाठी अर्ज केलेत. ‘उज्ज्वला योजने’तून गॅस मिळावा यासाठी १३ महिलांचे अर्ज दाखल केलेत. त्या म्हणतात, सहाव्या महिन्यापासून विधवा पेन्शन मिळाली नाही. नवीन अर्ज केलेल्यांना कधीपासून पेन्शन मिळणार हे विचारायला गेले तर तलाठी हाफीसातला माणूस म्हणतो, अजून मीटिंगच झाली नाही. सरकारी यंत्रणा आपल्या गतीनं काम करते. यामुळं कलावतीताई अस्वस्थ होतात. कारण अनेक महिलांशी सातत्यानं संपर्क असल्यानं त्यांना

**‘मकाम’ सोबत काम करताना कलावतीताईंनी आतापर्यंत २५ विधवांना पेन्शन मिळावी यासाठी अर्ज केलेत. ‘उज्ज्वला योजने’तून गॅस मिळावा यासाठी १३ महिलांचे अर्ज दाखल केलेत. त्या म्हणतात, सहाव्या महिन्यापासून विधवा पेन्शन मिळाली नाही. नवीन अर्ज केलेल्यांना कधीपासून पेन्शन मिळणार हे विचारायला गेले तर तलाठी हाफीसातला माणूस म्हणतो, अजून मीटिंगच झाली नाही. सरकारी यंत्रणा आपल्या गतीनं काम करते.**

या महिलांच्या अडचणी ठाऊक आहेत.

एक विधवा सक्षम झाली, तर दुसऱ्या विधवा बाईला तिची कशी मदत होते, अशी मदत करतानाही विधवा महिलांना कोणत्या समस्या येतात, याबाबत कलावतीताईंचा अलीकडे घडलेला एक किस्सा आहे. कलावतीताईंची एक विधवा मुसलमान मैत्रीण आहे. तिच्या मुलीला रात्री बाळंतकळा सुरू झाल्या. त्यामुळे मैत्रिणीच्या बरोबर तिच्या मुलीला घेऊन त्या रात्रीतून तालुक्याच्या ठिकाणी गेल्या. सकाळी त्या गावात दिसल्या नाहीत म्हटल्यावर आजूबाजूच्या महिलांमध्ये कुजबुज चालू झाली. कोणीतरी अफवा पसरवली की कलावतीबाई कोणाबरोबर तरी पळून गेली. घरी आल्यावर त्यांच्या लक्षात आलं की सगळे आपल्याकडे विचित्र नजरेने पाहत आहेत. चौकशी केल्यावर त्यांना झाला प्रकार लक्षात आला. मग त्यांनी आजूबाजूच्या महिलांना बोलावलं आणि त्यांना म्हणाल्या, मी रातच्याला मुसलमानासोबत पळून गेले असं बोलायला लागलेत सगळे, पण ऐका, मी मुसलमानाबरबर न्हाई, मुसलमाननीबरबर गेलेले. ती माझी मैतरीण हाये, तिच्या पोरीच्या डिलिवरीसाठी गेले व्हते. रातभर हास्पिटलात व्हते. आता जाऊ का मी माझ्या घरात, मिटला का तुमचा संशय?

पद्मिनीचं वय एकवीस होतं तवा तिचा नवरा वारला. ती एकली शेती करतीय. तिची पोरगी बिमार होती. पोरीला डॉक्टरकडं दाखवायला तिच्याकडं पैशे नव्हते. काशीबायच्या शेतात ऊस हाय, ऊसाला पाणी द्यायला मोटर लावलीय, मोटरचं लाईट बिल पाच हजार आठशे रुपय आलंय. सिताबायचं शेतावर नाव लागलेलं नाही. तिला कुठल्याच सरकारी योजनेचा फायदा मिळत नाही... शेतकरी महिलांच्या अशा अनेक अडचणी कलावतीताई सांगतात. या अडचणींवर मात करण्यासाठी त्यांनी एक बचत गट स्थापन केला.

या बचत गटाचं एक वेगळेपण आहे. हा विधवा शेतकरी महिलांचा गट आहे. तालुक्याला जाऊन खत-बियाणं आणणं, पीक कर्ज मिळवणं या महिलांना एकेकटीनं शक्य होत नाही. इतर कुणा पुरुषाची मदत घ्यावी तर लोक विधवा बाईवर संशय घेतात. विधवा महिलांना ना धड एकटीने जगता येतं ना कुणाची मदत घेता येतं.

त्यामुळं कलावतीताईंच्या पुढाकारानं दहाजणी एकत्र आल्या. या महिला एकमेकींच्या शेतात आळीपाळीनं काम करू लागल्या. त्यामुळं मजुरीवरचा खर्च वाचू लागला. शेतीसाठी लागणारी अवजारं त्यांनी बचत गटातून सामाईक कर्ज घेऊन विकत घेतली. परिणामी अन्य शेतकऱ्यांच्या विनवण्या करण्याची गरज उरली नाही. बचत गटाद्वारे कर्ज घेऊनच त्यांनी एक बैलजोडीही विकत घेतलीय. ही जनावरं, शेतीची अवजारं आता त्यांच्या सामाईक मालकीची आहेत. त्यांचा वापर करून त्या सेंद्रिय शेती करत आहेत. बचत गटात एकत्र आलेल्या महिला मराठा जातीच्या आहेत. पण त्यांनी कौसाबाई ही कुंभार समाजातील महिला व तिलिस्मा शेख या मुस्लिम भूमिहीन महिलेलाही आपल्या गटात घेतलंय. तिलिस्माला गटातील महिलांच्या शेतात हक्कानं मजुरी मिळते. शिवाय शेतातली जिन्नसही मिळतात. तिलिस्माच्या नावे बचत गटानं घेतलेलं कर्ज गटातील महिलांनीच फेडलंय.

‘तुमच्या बचत गटाचं नाव काय?’ असं विचारल्यावर कलावतीताई म्हणाल्या, सयाबाई बचत गट ह्या सयाबाई कोण? असं विचारल्यावर कलावतीताई म्हणाल्या, शिवाजी म्हाराजांची बायको. तिचं नाव सयाबाई होतं. तिच्या नावानीच आम्ही कष्ट करून जगतोय! ‘मकाम’शी जोडलेल्या महिला आपली अस्मिता-प्रेरणा नि आत्मसन्मान स्वत:च शोधत आहेत. कलावतीताई हे यातलं एक उदाहरण. ●



# गीता काळे

▶ गीताताईंचं वय केवळ २८ होतं, तेव्हा त्यांच्या पतीचं निधन झालं. तीन मुलींना एकटीनं सांभाळण्याची जबाबदारी त्यांच्यावर आली. गीताताई सांगतात, विधवा महिला कशा जगायलेत, याची कुणी विचारपूस करत नाही. त्यायच्या लेकरायचं शिक्षण, त्यायचं खाणंपिणं कुणी इचरत नाय. पण 'मकाम'च्या मीटिंगा सुरू झाल्यावर मला आधार वाटायला लागला. विधवा बायांसाठी कुणीतरी कायतरी करतयं हे मला चांगलं वाटायला लागलं.

गीताताईंना कधीकाळी पोलीस व्हायचं होतं. पण ते स्वप्नं अधूरच राहिलं. शाळेत असताना कब्बडी संघात भाग घेतलेली ही मुलगी. लग्नानंतर घरातच बंदिस्त झाली. कारण मराठवाड्यातील गोषापद्धत. मुस्लिम समाजातील बुरखा पद्धतीसारखीच मराठा समाजात गोषा पाळण्याची रित. महिलांनी वडीलधारे नि सासू-सासऱ्यांसमोर, अपरिचित पुरुषांसमोर यायचं-बोलायचं नाही,

सार्वजनिक ठिकाणी वावरायचं नाही. याला गोषा पाळणं म्हणतात. हे सर्वच गीतातार्इंच्याही वाट्याला आलं. पण 'मकाम'च्या संपर्कात आल्यापासून त्यांचा श्वास मोकळा झाला असं म्हणता येईल.

२०१२ मध्ये गीतातार्इंच्या सासूला कॅन्सर झाला. ह्या खर्चिक आजारावरील उपचारांसाठी काही शेतजमीन विकावी लागली. त्यानंतर त्यांची आर्थिक परिस्थिती ढासळत गेली. २०१३ मध्ये त्यांचे सासरे वारले. त्यानंतरच्याच वर्षात २०१४ ला पतीचंही निधन झालं. एकापोठोपाठ आलेल्या या आपत्तींमुळं जगणं सावरण्याची उसंतच त्यांना मिळाली नसावी. नवऱ्यानंतर शेतजमिनीवर त्यांचं नाव लागायला हवं होतं. पण बोलणार कसं? 'पतीच्या निधनानंतर या बाईला जमिनीच्या मालकीचं पडलंय', असं लोक बोलतील. या भीडेखातर त्या काहीच बोलल्या नाहीत. जमीन मोठ्या दिराच्या नावावर होती. गीताताई कुटुंबाच्या शेतीत व अन्य ठिकाणी मोलमजुरी करत जगू लागल्या. कोविडच्या पहिल्या लाटेत 'मकाम'च्या माध्यमातून विधवा व एकल महिलांना धान्याची मदत पोचवण्यात आली. 'प्रेरणा महिला विकास संस्थे'मार्फत गीतातार्इंच्या गावातही ही मदत पोचवण्यात आली. यानिमित्तानं संस्थेचे संचालक गौतम मोगले यांच्याशी गीतातार्इंचा परिचय झाला. सर माझं बारावी शिक्षण झालंय. मला जॉब बघा गीतातार्इंनी मोगलेंना विनंती केली. गौतम मोगलेंनी गीतातार्इंना 'मकाम'च्या ऑनलाईन मीटिंग करण्याची सूचना दिली. यानंतर गीताताई 'मकाम'शी जोडल्या गेल्या.

पण गीतातार्इंकडे सेलफोन नव्हता. तरीही मोठ्या दिराच्या फोनवरून त्यांनी काही मीटिंगांना हजेरी लावली. या मीटिंग केल्यानंतर 'पुढे कधीतरी रोजगाराची संधी मिळेल' अशी त्यांना आशा वाटली. या आशेवरच त्यांनी बचत गटातून कर्ज काढलं. या पैशातून त्यांनी मोबाईल फोन विकत घेतला. लॉकडाऊन शिथिल झाल्यानंतर गावातील व पंचक्रोषीतील विधवांचा सर्व्हे करण्याची जबाबदारी दिली गेली. गीतातार्इंनी गावातील तीन महिलांची माहिती घेतली. त्याशिवाय आसपासच्या चार गावातील महिलांचाही सर्व्हे केला.

पण गावाबाहेर जायचं तर सोबत हवी होती. 'मकाम'मध्ये सक्रिय झालेल्या त्यांच्याच गावातील सुनीता जाधव व गीतातार्इंनी एकत्रच सर्व्हे करायचं ठरवलं. गीतातार्इंनी भावकीतील एका मुलाला मोटरसायकलसाठी विनंती केली. या मुलानं सुनीता व गीतातार्इंना सर्व्हेसाठी चार गावांमध्ये ट्रिपल सिट नेलं. या निमित्तानं पहिल्यांदाच गीताताई वेगळ्या कामानिमित्त घराबाहेर पडल्या. यापूर्वी शेतमजुरीसाठीच त्या घराबाहेर पडत असत.

**गीताताईंकडे सेलफोन नव्हता. तरीही मोठ्या दिराच्या फोनवरून त्यांनी काही मीटिंगांना हजेरी लावली. या मीटिंग केल्यानंतर 'पुढे कधीतरी रोजगाराची संधी मिळेल' अशी त्यांना आशा वाटली. या आशेवरच त्यांनी बचत गटातून कर्ज काढलं. या पैशातून त्यांनी मोबाईल फोन विकत घेतला. लॉकडाऊन शिथिल झाल्यानंतर गावातील व पंचक्रोषीतील विधवांचा सर्व्हे करण्याची जबाबदारी दिली गेली. गीताताईंनी गावातील तीन महिलांची माहिती घेतली. त्याशिवाय आसपासच्या चार गावातील महिलांचाही सर्व्हे केला.**

सर्व्हेच्या निमित्ताने गीताताईंना आपल्या भवतालातील दहा विधवा महिलांना भेटता आलं. गिऱ्हामवाडी, कळमकोंडा व चाकमत ही गावं तर दुर्गम आहेत. या गावातही सर्व्हेच्या निमित्तानं या दोघीजणी पोहचल्या. बहुतेक विधवांना मदतीची नितांत गरज आहे. पण त्या घराबाहेर पडू शकत नाहीत. त्यामुळे या महिलांच्या तीव्र अजिजीचा अनुभवही या निमित्ताने गीताताईंनी घेतला. गीताताई म्हणतात, ज्यांचा ज्यांचा फॉर्म भरला, त्या मी दिसले की इचारतात, काय झालं आम्हाला मदत आली का नाही? कधी मिळणार मदत? काही महिला सतत फोन करूनही मदत कधी मिळणार असं विचारायच्या... अशा चौकशांना नेमकं काय उत्तर द्यावं हे गीताताईंनाही नीटसं कळत नव्हतं. त्यामुळं वरूनच काही आलेलं नाही. तिकडून काही झालं की सांगते. अशी उत्तरं त्या देतात. पण 'मदत आलेली असेल, फॉर्म भरणाऱ्या या महिलांनीच ती लाटली असेल.' असा संशयही महिलांच्या मनात असेल असं गीताताईंना वाटतं. त्या म्हणतात, या महिला स्वत: काहीही करू शकत नाहीत, कुटुंबाच्या विरोधात जायची त्यांची तयारी नसते. मग आपण तरी काय करणार?

सर्व्हेबाबतचा गीताताईंचा एक नोंदवण्यासारखा अनुभव आहे. एका गावात त्या विधवांचा शोध घेत गेल्या. यांच्याकडून काही मदत मिळेल म्हणून त्या गावातील एका विधवेनं सगळ्या कुटुंबाला जमवलं. त्यात त्या विधवेचा दीरही होता. फॉर्म भरताना जमीन मालकी कुणाकडे आहे, जमीन बाईच्या नावावर होऊ शकते वगैरे मुद्देही आले. तुम्हीच माझ्या नावावर जमीन करून द्या असं ती बाई यांना म्हणाली. पण मुलाखत संपल्यावर बाईच्या दिरानं यांना गाठलं. 'तुम्ही आमच्या घरात फूट पाडायला आला का? आमचं आम्ही बघू. तुम्ही काही करू नका.' असं त्यानं यांना सौम्य भाषेत धमकावलं. त्या विधवा बाईला या घटनेची कल्पनाही नाही. आता फॉर्म भरून नेलाय तर या बायाच

आपली जमीन नावावर करून देतील अशी आशा मात्र ती बाई लावून बसली.

या सर्व घडामोडींतून जाताना गीताताईंमध्ये नवा आत्मविश्वास आला. त्यांच्या गावातील एका विधवा महिलेचं रेशनकार्ड काढायचं होतं. ही बाई यापूर्वी गावातील त्याच पुरुषाकडे मदतीला गेली होती ज्यानं गीताताईंकडे गैरअपेक्षा व्यक्त केलेली. गीताताईंनी त्या बाईची माहिती घेतलीय, हे समजल्यावर तो माणूस यांच्याकडे आला. तुम्ही त्या बाईची माहिती कशासाठी घेतली? माझ्याशिवाय तिचं काम होऊच शकत नाही, ती बाई आमच्या भावकीतली आहे, तुम्ही तिच्याशी बोलायचं नाही. असं तो माणूस म्हणू लागला. गीताताई या माणसाकडे रेशनचं काम करायला गेल्या होत्या, तेव्हा त्यांनी त्याचं निमूट ऐकून घेतलेलं. यावेळी मात्र गीताताईंनी त्याला सुनावलं – विधवा महिलांना आम्हीही मदत करू शकतो. तुम्हीच त्यांचं काम करावं असं काही नाही. विधवा महिलांची कामं करून देण्याचं आमिष दाखवून पुरुष शोषण करतात. फोन करून सतावतात. हा माणूस यापैकीच आहे. गीताताईंनी त्याच्या अरेरावीला जुमानलं नाही. उलट उत्तरं दिली. हा 'मकाम'च्या संपर्कात आल्यानं गीताताईंमध्ये घडलेला सर्वात महत्त्वाचा बदल.

'मकामच्या संपर्कात आल्यानंतरच गीताताईंनी शेतजमीन आपल्या नावे करून घेण्यासाठी जलद प्रयत्न केले. या कामासाठी भावाची मदत घेतली. 'मकाम'च्या बैठकीच्या निमित्ताने गीताताईंनी पहिल्यांदाच गडचिरोलीचा प्रवास केला. स्वत:चा सेलफोन घेऊन गीताताईंनी आपल्या स्वातंत्र्याकडे पहिलं पाऊल उचललं. नंतर त्या आसपासच्या गावातील महिलांपर्यंत पोचल्या. विधवा-एकट्या महिलांची अडवणूक करणाऱ्या, शोषण करू पाहणाऱ्या पुरुषाला हजरजबाबी उत्तरं दिली हे छोटे छोटे पण गीताताईंच्या अलीकडील आयुष्यातील महत्त्वाचे टप्पे आहेत. या प्रत्येक वळणावर त्या 'मकाम'ला सोबत पाहत आहेत. ●

# अनिता मेश्राम



▶ एक दिवस अचानक गावातली चार माणसं अनितातार्इंच्या घरी आली. त्यातला एक सरपंच, दुसरा उपसरपंच, तिसरा रेशन दुकानदाराचा माणूस व चौथा इसम असाच कुणी. अनितातार्इंचं घर म्हणजे दहा बाय पाचची मातीची खोली. वर उन्हात तापणारे पत्रे. या खोपटात अनिता आपल्या दोन मुलींसह राहतात. अशा सामान्य घरी तीन हजार लोकसंख्येच्या गावचे 'मान्यवर' खास अनितातार्इंची भेट घ्यायला आले. नि जाताना धमकीवजा इशारा देऊन गेले. अनितातार्इंनी आतापर्यंत केवळ प्रश्न विचारलेत, योजना व नियमांबाबत चौकशा सुरू केल्यात. एवढ्यातच गावच्या प्रस्थापितांचे कान टवकारलेत.

अनिता मेश्राम ही विधवा बाई. भूमिहीन. रोजंदारी करून पोट भरते. गावच्या पुढाऱ्यांना या बाईच्या उंबऱ्यापर्यंत यावं लागणं ही एक विशेष घटना आहे. या मंडळींनी अनितातार्इंना धान्याचं पोतं मोफत देण्याचं आमिष दाखवलं. बाई बधली

नाही. तिला आपल्यासारख्या अनेकांसाठी नियमानं जे मिळायला हवं, तेवढंच हवंय. हे धैर्य अनितातार्इंनी मिळवलं 'मकाम'च्या माहिती सत्रांमधून.

'मकाम'ची ऑनलाईन सत्रं सुरू झाली, तेव्हा अनिताकडे साधा मोबाईल फोनही नव्हता. अनिता सांगतात, मी दुसऱ्याचा मोबाईल मागून मीटिंग ऐकली. पण नेहमीच कोण मला मोबाईल देणार? मग मी बकरी इकली. शेतमजुरीशिवाय अनितातार्इंकडे दुसरं उत्पन्नाचं साधन नाही. सरकारच्या विधवा पेन्शनमधून मामुली आधार मिळतो. रेशनवर धान्य मिळतं म्हणून त्यांचं कसंबसं निभतं. त्यांच्या आईनं नातीच्या लग्नखर्चाची बेगमी व्हावी म्हणून एक बकरी घेऊन दिली होती. ती अनितातार्इंनी मोबाईल फोनसाठी विकली. त्या म्हणतात, मला माहिती मिळाय लागली. मी दुसऱ्याला मदत कराय लागले. मलाबी कधीतरी पगार मिळंल. म्हणून मी मीटिंग ऐकायला फोन घेतला...

एकल महिलांना संघटित करावं, हे काम करताना काहीतरी उत्पन्नाचं साधन मिळावं, ही अनितातार्इंची अपेक्षा गैरवाजवी नाही. आता मी कुणाची परवा करत नाय. अनिताताई सांगतात, लोकं मला कायबी बोलायचे. एकल्या बाईबद्दल लोकं वाईटसाईट बोलत्यात. ही कुठं गेली, कुणाबरबर गेली. सारखी सगळ्यांची नजर हेच बघती. अशा संशयी नजरांना झुगारण्याइतपतचा प्रवास अनितातार्इंनी 'मकाम'सोबत केलाय. तोच त्यांची पुढील दिशा उजळवणार आहे. याचीही त्यांना जाणीव आहे. 'माझं सगळं आयुष्य दु:खातच गेलंय. पण आता कसली फिकीर नाय वाटत.' हे वाक्य अनिताताई हल्ली पुन्हा पुन्हा उच्चारतात. ते ऐकताना त्यांना नेमकं काय गवसलंय याचा आपण केवळ अंदाज बांधू शकतो.

अनिता आठवीत शिकत होती. तेव्हाच तिचं लग्न लावलं गेलं. माझ्या वडलांना वाटलं, आपली पोरगी काळी. तिचं लवकर लग्न केलेलं बरं. अनिताताई सांगतात, शाळेत त्या दिवशी पेपर होता. पण मी पेपर द्यायला गेले नाय. सगळ्याच पोरींची लग्न होत्यात. आपलंबी लग्न होतंय. असंच मला त्या दिशी वाटलं. केवळ अकरा वर्षाच्या या मुलीला लग्नाचा अर्थ कसा कळणार? भातुकलीचा खेळ असावा तसं अनिता नांदायला गेली. नवऱ्यानं जवळ घेतल्यावर मात्र ती घाबरली. रडायला लागली. लग्नानंतर एका महिन्यानं ती माहेरी आली. नि पुन्हा त्या घरी जाणार नाही म्हणू लागली. अशिक्षित वडलांना मुलीचा हट्ट कळेना. ही मुलगी आपलं नाव खराब करतेय असं त्यांना वाटत होतं. अनितानं आई-वडलांना विनवण्या केल्या. मोलमजुरी करायची तयारी दाखवली. पण सासरी जायला नकार दिला. नाईलाजाने बापानं मुलीला घरीच ठेवलं. भावांनी चार लोकांना बोलवून बहिणीची फारकत घडवली. पण लग्न केल्याशिवाय मुलीचं भाग्य उजळणार नाही, ही त्यांची समजूत

**दुसरं लग्नं झालं तेव्हा अनिताचं वय असेल चौदा. नवरा मुलगा शेळ्या वळायचा. हे कुटुंबही भूमिहीन. 'म्हातारी सासू व नवऱ्याचं ही मुलगी सहज करेल, घर भाड्याचं असलं तरी ठिक. मुलगी कष्ट करून राहील.' असा विचार केला गेला असावा. 'मुलीनं दिल्या घरीच मरावं' असं अनिताच्या वडलांना वाटायचं. त्यामुळे एकप्रकारे अंतिम कर्तव्य करून वडील जबाबदारीतून मुक्त झाले.**

पक्की होती. सारं कुटुंबच मोलमजुरी करून जगणारं. त्यात ही परित्यक्ता बहिण कशी सांभाळायची? या विचारानं पुन्हा अनिताचं दुसरं लग्नं लावून देण्यात आलं.

दुसरं लग्नं झालं तेव्हा अनिताचं वय असेल चौदा. नवरा मुलगा शेळ्या वळायचा. हे कुटुंबही भूमिहीन. 'म्हातारी सासू व नवऱ्याचं ही मुलगी सहज करेल, घर भाड्याचं असलं तरी ठिक. मुलगी कष्ट करून राहील.' असा विचार केला गेला असावा. 'मुलीनं दिल्या घरीच मरावं' असं अनिताच्या वडलांना वाटायचं. त्यामुळे एकप्रकारे अंतिम कर्तव्य करून वडील जबाबदारीतून मुक्त झाले. नवरा शरीराने अशक्त होता. तो महिन्याला मुश्कीलने पाच-सातशे रुपयेच कसेबसे मिळवायचा. सगळी भिस्त शेळ्यांपासून मिळणाऱ्या उत्पन्नावर होती. सासूला सरकारी विधवा पेन्शन मिळायची. पण ते पैसे तिच्याच औषधपाण्यावर खर्च होत.

अनिता माहेरी मोलमजुरी करायची. सासरीही तेच करू लागली. एक दिवस सासूने काहीतरी नड भागवण्यासाठी बकऱ्या विकल्या. अनिताच्या नवऱ्याचा उत्पन्नाचा एकमेव आधार गेला. अनिता म्हणतात, तेव्हापासून ते खचले. मग त्यांनी दारू प्यायला सुरुवात केली. अनिताच्या नवऱ्याने दरम्यान ट्रकवर क्लिनरचं काम सुरू केलं होतं. ट्रक ड्रायव्हरसोबत मोफत दारू प्यायला मिळत असल्याने त्यांना हे व्यसन जडलं असावं. नंतर त्यांनी हे काम सोडलं. ते ढाब्यावर काम करू लागले. ढाब्यावर दिवसाला रोजी मिळायची. या कमाईतला बराचसा भाग दारूवरच खर्च होऊ लागला. नंतर त्यांचं हे व्यसन इतकं वाढलं की सगळीच कमाई दारूवरच जाऊ लागली.

दरम्यान अनितानं वयाचं अठरावंही पूर्ण केलेलं नसताना तीन मुलींना जन्म दिला होता. यातली एक मुलगी केवळ औषधोपचारांसाठी पैसे नसल्यानं न्यूमोनिया होऊन मेली. नवरा पूर्णपणे दारूच्या आहारी गेलेला. दोन मुलींना जगवण्यासाठी अनितालाच मोलमजुरी करणं भाग होतं. आपल्याला एक हक्काचं घर असावं असंही अनिताला या काळात वाटत होतं. त्यामुळे तिनं आपल्या गळ्यातले मणी व मुलींना भेट म्हणून मिळालेल्या बाळ्या-साखळ्या असे डाग विकून पाच हजार

रुपये उभे केले. एक खोली विकत घेतली. खोलीभाडं वाचू लागलं. त्यामुळं अनिताला दिलासा मिळाला.

वर्ष पुढे सरकत होती. मुली वाढत होत्या. सासूचं निधन झालं. तरीही अनिता खंबीरपणे संसार करत होती. अनिताताई सांगतात, एक दिवस नवरा बिमार पडल्याचं समजलं. त्यांना हळद्या रोग झाला. या काळात नवरा ज्या ढाब्यावर काम करायचा तिथेच राहत होता. त्याची सर्व कमाई दारूतच जात होती. हळद्या म्हणजे कावीळ. अर्थात अतिमद्यपानामुळं यकृत खराब झाल्याने हा नाविलाज आजार झालेला. तरीही अनिताताईंनी नवऱ्याच्या उपचारांसाठी बरेच प्रयत्न केले. पण त्यांची तब्येत खालावतच गेली. कुणी सांगितलं शिवणखेडला उपचार होईल, कुणी म्हटलं नांदेडला न्या. दूरच्या मोठ्या ठिकाणी उपचारांसाठी न्यायचं तर पैशांची गरज होती. एवढा पैसा आणणार कुठून?

विवंचनेतून मार्ग काढण्यासाठी अनिताताईंनी ऊसतोडीवर जायचा निर्णय घेतला. ठेकेदाराकडून २५ हजारांची उचल घेतली. हे कर्ज फेडण्यासाठी त्यांना ठेकेदार नेईल त्या गावी जाऊन काबाडकष्ट करावं लागणार होतं. त्याप्रमाणे त्या परभणीच्या साखर कारखान्यावर उसतोडीला गेल्या. इकडे नवऱ्याची तब्येत आणखीनच बिघडली. अनिताताई काम अर्धवट सोडून परतल्या. नवऱ्याला नांदेडच्या सरकारी दवाखान्यात नेलं. तेथील डॉक्टरांनी काही काळ ठेवलं. नंतर हात वर केले. अनिताताई निराश होऊन पेशंट घरी घेऊन आल्या. त्यानंतर पंधराच दिवसात नवऱ्याची प्राणज्योत मालवली.

नवऱ्याच्या मृत्यूपूर्वीही अनिताताई एकट्याच मुलींना सांभाळत होत्या. पण आता त्या निराधार विधवा होत्या. आता लोकांची नजर बदलली. जरा कुठं त्या कामाला घराबाहेर पडल्या की लोकांच्या नजरा सतावू लागल्या. टोमणे, शेरेताशेरे सुरू झाले. परिणामी विचित्र एकटेपणानं ही बाई नैराश्यात गेली. या काळात 'उगम' संस्थेच्या छाया पडघन यांनी अनिताताईंना खूप आधार दिला. बचत गटांमध्ये सामील करून घेतलं. बचत गटांमुळे छोट्या गरजांसाठी कर्जही मिळू लागलं. शिवाय इतर महिलांमध्ये मिसळण्याची संधी मिळाल्यानं अनिताताईंचं नैराश्य हळूहळू कमी होऊ लागलं.

२०१८ मध्ये अनिताताईंच्या नवऱ्याचं निधन झालं. २०१९ पासून त्या 'मकाम'च्या संपर्कात आल्या. 'उगम' संस्थेनं एकल महिलांना संघटित करण्यासाठी त्यांची निवड केली. या प्रक्रियेतून त्यांची गावातील विधवांसोबत ओळख वाढली. विधवांच्या मुलांना शिष्यवृत्ती मिळावी यासाठी अनिताताई प्रयत्न करू लागल्या. त्यामुळं अनिताताईंमध्ये आत्मविश्वास येऊ लागला. या कामांसाठी त्या सरकारी

कार्यालयात जाऊ लागल्या. पण 'ही बाई नेहमीच तालुक्याच्या गावी जाते.' हे पाहून आसपासचे लोक चर्चा करू लागले. अशावेळी अनितातार्इंना त्यांच्या भावाची मदत झाली. एरवी अनितातार्इंचे भाऊ यांचं नीट चाललंय का, यांच्या मुलींना काही मदतीची गरज आहे का हे फारसं विचारत नाहीत. बहुधा गरीब कुटुंबांमध्ये विधवा बहिणीच्या संसाराचा ताण घेणं पेलवणारं नसेल, त्यामुळेही असं असू शकते. पण अनितातार्इ आपल्या पायावर उभं राहण्यासाठी प्रयत्न करू लागल्या नि लोक त्यांच्याबाबत काहीबाही बोलू लागले, तेव्हा अनितातार्इंच्या भावानं नातेवाईक व शेजाऱ्यापाजाऱ्यांना खडसावलं, – 'माझी बहीण हवं तिथं जाईल. तिच्यावर कुणीही दबाव टाकायचा नाही.' अनितातार्इंना यामुळं धीर आला. आता कुणी फारच खोचकपणे विचारू लागलं, 'कुठं गेली होतीस?' तर त्याही विचारणाऱ्यांची फिरकी घेत 'गेली होते मित्राला भेटायला!' असं उत्तर मनातल्या मनात घोळवतात.

'मकाम'मार्फत रेशन दुकानातून अंत्योदय कार्ड धारकांची माहिती घेण्याचं कार्य त्यांच्यावर सोपवलं गेलं. पण रेशन दुकानदाराला थेट कसं विचारणार? माहिती विचारण्याचा अधिकार तुला कुणी दिला? असं विचारल्यावर काय बोलणार? हे अनितातार्इंना कळत नव्हतं. त्यामुळे सहज गप्पा करत असल्याचं दाखवत अनितातार्इंनी दुकानदाराला माहिती विचारायचं धाडस केलं. तरीही त्याने 'तुला कशाला पाहिजे ही माहिती?' असं विचारलंच. शिवाय अनितातार्इंनी रोजगार सेवकाचीही भेट घेतली. गावातील दहा एकल महिलांसाठी रोहयोतून कामाची मागणी केली. त्यानंही आधी टाळाटाळ केली. त्या पाठपुरावा करू लागल्या. ही बाई रेशन दुकानदाराकडे माहिती विचारते, ग्रामपंचायतीत येऊन प्रश्न विचारते. जी माहिती आपण लपवतो नेमकी तीच ही विचारते. याचा अंदाज आल्यावर गावातले प्रस्थापित थेट अनितातार्इंच्या घरी आले.

'तू जास्त माहिती कशाला विचारते? तुला कुणी नेमलंय? माहिती घेण्यासाठी तुला पगार मिळतो का?' असे अनेक प्रश्न या मंडळींनी विचारले. या सर्व प्रश्नांची उत्तरं अनितातार्इंनी जराही न बिचकता दिली. मग हे लोक तिला म्हणाले, ''जास्त माहिती विचारत जाऊ नकोस. कुठंबी एक्सिडेंट करून तुला कुणीबी मारतील. कुणाला पत्त्याबी लागणार नाही.'' सहज हसतखेळत दिलेला हा सल्ला. पण तो धमकीवजा इशाराच होता. धमकी ऐकूनही ही बाई जराही बिथरलेली नाही. उलट तिचा आत्मविश्वास बळावलाय. 'मकाम' आपल्या पाठीशी आहे असं अनितातार्इंना मनापासून वाटतं. त्यामुळे अशा प्रसंगांनं त्या खचलेल्या नाहीत. रोजंदारीवर जगणाऱ्या अनितातार्इत आलेलं हे बळ टिकवून ठेवणं ही आता 'मकाम'ची जबाबदारी आहे. ●



# अर्चना केचे

▶ लॉकडाऊन काळात कौटुंबिक हिंसाचारात अचानक वाढ झाली. याच काळात 'मकाम'मार्फत महिला अधिकारांबाबत ऑनलाईन सत्र सुरू झाली. अर्चनाताई केचेंना त्यातून प्रेरणा मिळाली नि त्यांनी गावातील कौटुंबिक हिंसाचारावर आळा बसेल असा एक मार्ग काढला असं म्हणता येईल.

चानपा हे बाराशे लोकवस्तीचं गाव. या गावात तीन दुकानदार अवैधरित्या दारू विक्री करत. परिणामी गावातील पुरुष वेळी-अवेळी कधीही दारू पीत. याचा सर्वाधिक त्रास महिलांना होत होता. लॉकडाऊन काळात हा त्रास अधिकच वाढला. त्यामुळं 'दारू विक्री बंद पाडणं' मारहाण थांबवण्याचं हे एक साधन असू शकतं हे अर्चनाताईंनी ओळखलं. केवळ दहावी शिकलेल्या नि गृहिणी असलेल्या अर्चनाताईंनी पुढाकार घेऊन ही समस्या सोडवली. पीडित महिलांचं नेतृत्त्व केलं. त्या म्हणतात, मी जवळपास अठरा वर्षांपासून प्रकृती

संस्थेचं काम करते. गावपातळीवर विविध विकास उपक्रम राबवण्यासाठी 'प्रकृती' संस्थेमार्फत अर्चनाताई कार्यरत आहेत. 'मकाम'मार्फत विधवा–परित्यक्ता–एकट्या महिलांची संघठन बांधणी प्रक्रिया महाराष्ट्रभर विविध संस्थांच्या सहकार्यानं सुरू झाली. संस्थेनं या प्रक्रियेत अर्चनाताईंना सामील करून घेतलं. अर्चनाताई सांगतात, 'मकाम'मुळं मला महिलांचे हक्क कळायला लागले. या प्रक्रियेमुळं अर्चनाताईंची समज तर वाढलीच, त्यांनी गावपातळीवर विविध आघाड्यांवर महिलांचे विविध प्रश्न पटलावर आणले नि सोडवलेही.

अर्चनाताईंच्या माहेरी व सासरीही शेती हाच मुख्य व्यवसाय. आई–वडील अशिक्षित असले तरी हे चांगलं शेतकरी कुटुंबं होतं. गावातच शाळा असल्याने अर्चना दहावीपर्यंत शिकल्या. त्या सांगतात, मला खेळायला आवडायचं. शाळेत खो खो खेळून दमून यायचे. तरी घरी आले की दप्तर टाकून मी पुन्हा खेळायला पळायचे. गावातली पोरं विटीदांडू खेळायची. आम्ही मुलीही त्यांच्यात मिसळून विटीदांडू खेळायचो. आमच्या घरात मुलींना वेगळं वागवलं जायचं नाही. कुटुंबात असं खुलं वातावरण होतं. पण शेजारीच नात्यातली एक जयाबाई राहायची. ती विधवा होती. अर्चनाताई बालपणीची आठवण सांगतात, मला प्रश्न पडायचे जयाबाई कुंकू का लावत नाही? बायकांमध्ये का मिसळत नाही? हिला हळदी–कुंकवाच्या कार्यक्रमात का बोलवत नाहीत? महिलांना होणारी मारहाण पाहून एकदा छोट्या अर्चनानं तिच्या आजीला विचारलं, माणूस बाईला मारतो, मग बाईनंही माणसाला मारलं तर? आजीनं तिला सांगितलं, तू मारून बघ काय घडतंय ते! पण असा प्रयोग करायची वेळ अर्चनावर आली नाही.

दहावीत इंग्रजी विषयात ही मुलगी नापास झाली. मग तिनं शिवणकामाचा डिप्लोमा केला. नंतर तिचं लग्न शिवाजी केचेंशी झालं. शिवाजीरावांचं शिक्षण नववी. पण शेतकरी असल्याने या सोयरिकीत शिक्षणाचा फारसा विचार गैरलागूच होता. लग्नानंतर अर्चना घरकामात रमल्या. त्यांना दोन मुली नि एक मुलगा झाला. २००० सालच्या आसपास 'प्रकृती संस्थे'चे विकास उपक्रम चानपा गावात सुरू झाले. ही बाई बोलकी असल्याने सुवर्णा दामलेंनी त्यांना संस्थेच्या कार्यात जोडून घेतलं. त्यानंतर अर्चना घराचा उंबरा ओलांडून गावच्या विकासकामातही रस घेऊ लागल्या. बचत गट स्थापन करण्यात पुढाकार घेऊ लागल्या. मुळात गप्पिष्ट असल्यानं गावातल्या महिलाही अर्चनाताईंना सुखदुःखं सांगू लागल्या.

आरती अशीच एक बचत गटातली सदस्य. ती पाच–सहा वर्षांपासून अर्चनाताईंना तिचं एक दुःख सांगायची. आरतीचा नवरा रोज दारू प्यायचा. रोज

तिला मारायचा. जेवणाचं ताट भिरकावून द्यायचा. आरतीची कहाणी अर्चनाताईंच्या मनात 'मकाम'ची ऑनलाईन सत्रं ऐकताना घोळत होती. याच काळात गावातील नलू ही महिला अर्चनाताईंकडे आली. ती म्हणाली, मला प्रकृती संस्थेचा नंबर दे. मला पोलिसांकडं तक्रार करायचीय! अर्चनाताई संस्थेत जातात. संस्थेकडून नलूताईंना मदत मिळू शकेल म्हणून त्या अर्चनाताईंकडे आलेल्या. अर्चनाताईंनी त्यांचं म्हणणं ऐकून घेतलं. नलूताईंचा नवरा रोज जुगार खेळायचा. अडवल्यावर तो दारू पिऊन मारहाण करायचा. पोलिसात तक्रार केल्याशिवाय तो वठणीवर येणार नाही असं नलूताईंचं मत होतं. अर्चनाताईंना आरतीची कहाणी माहीत होतीच. नलूची दुसरी. शिवाय तिसरी एक कहाणी याच दरम्यान पुढे आली. समस्या तीच फक्त त्रास डबल. ही कहाणी कल्पनाबाईची. हिचा नवरा नि मुलगा दोघंही दारूच्या आहारी गेलेले. दारूमुळं कुटुंबाची वाताहत सुरू झालेली. कुटुंब सावरण्यासाठी कल्पनाबाईनं आपली हाय-वे लगतची जमीन विकली. आलेल्या रकमेतून दुसरीकडे एक जमीन खरेदी केली. नवरा व मुलगा दारूसाठी ही जमिनही विकतील अशी कल्पनाबाईंना भीती होती. कल्पनाबाईंनी ही नवी जमीन आपल्याच नावे ठेवावी यासाठी अर्चनाताईंचा सल्ला मोलाचा ठरलेला. पण बापलेकाच्या दारूमुळे घरात रोज भांडणं होत होती. दारूमुळे त्रासलेल्या अशा महिलांशी अर्चनाताई बोलू लागल्या. त्यांना एकत्र केलं. त्या म्हणतात, आमच्या गावात तीन ठिकाणी दारू विकली जायची. या दुकानदारांना दारू विकायची परवानगी नाही. पण त्यांना थांबवणार कोण? रात्रंदिवस त्यांच्या दुकानात दारू मिळायची. पिणारे रात्री-पहाटे कधीही उठून पिऊन यायचे. त्यामुळं घराघरात महिला वैतागलेल्या. लॉकडाऊन काळातही ही अवैध दारूविक्री नि त्यामुळं घराघरात भांडणं, बायकांना मारहाण सुरुच होती. किंबहुना ती जरा वाढलेलीच. त्यामुळं महिलांना या समस्येच्या मुळाशी हात घालायला अर्चनाताईंनी प्रवृत्त केलं.

अर्चनाताईंनी एक निवेदन तयार केलं. त्यासाठी प्रकृती संस्थेच्या मोनिका व प्रज्ञा यांची मदत घेतली. या निवेदनावर गावातील जवळपास १०० महिलांच्या सह्यांची मोहीम उघडण्यात आली. या निवेदनासह पाच पीडित महिलांना सोबत घेऊन अर्चनाताई पोलीस चौकीत गेल्या. मी यापूर्वी कधीच पोलीस चौकीत गेले नव्हते. अर्चनाताई सांगतात, पण यावेळी मी धीर केला ही घडामोड सुरू असताना गावातील पुरुष मंडळी अर्चनाताईंविरोधात बोलू लागली होती. 'ह्यांना घरच्यांनी गावची पंचाईत करायला सोडलंय!', 'ह्यांच्यानी कसली होतीय गावातली दारू बंद!' अशी हेटाळणी गावगप्पात सुरू झाली. दारू विक्रेते अर्वाच्य शिव्या देत अर्चनाताईंबद्दल आल्यागेल्यांकडे बोलू लागले. हा काळ अर्चनाताईंसाठीही

**रोजगार हमी योजनेची कामं निघताना सहसा महिलांचा वेगळा विचार होत नाही. महिलांचा स्वतंत्र विचार करून रोहयोतून ग्रामीण महिलांना रोजगार मिळायला हवा. यासाठी 'मकाम' प्रयत्नशील आहे. अर्चनाताई म्हणतात, आमच्या गावात शेतीचं काम बारमाही असतं. रोजगार हमीच्या कामाची गरजच गावात जाणवत नाही. पण आम्ही महिलांना एकत्र करून शिवार फेरी काढली. तेव्हा गावातल्या काही महिलांना रोजगार हमीचं काम मिळायलाच पाहिजे हे लक्षात आलं....**

तणावाचा होता. पण त्यांनी वाट पाहिली. असा आठवडा उलटला.

एके दिवशी रात्री ११ वाजता पोलीस गावात आले. त्यांनी दारू विक्रेत्यांची चौकशी केली. पण पोलिसांना त्यांच्याकडे दारूचा साठा सापडला नाही. 'तुम्ही विनाकारण तक्रार करून पोलिसांचं काम वाढवता!' असं पोलिसांनी अर्चनाताईंनाच सुनावलं. पण गावातल्या महिलांनी पोलिसांसमोर पुन्हा आपल्या तक्रारी मांडल्या. मग मात्र पोलिसांनी दारू विक्रेत्यांना चौकीवर बोलवून कडक समज दिली. अर्चनाताईंनीही तिघांपैकी एका दारू विक्रेत्याकडे जाऊन विक्री बंद करायला सांगितलं. गावातल्या महिलांचं हे एकत्र येणं व ठाम राहणं परिणामकारक ठरलं. नि चानपा गावातील दारू विक्री बंद झाली.

'मकाम'च्या माहिती सत्रांचं बळ मिळाल्याने अर्चनाताईंनी महिलांचे इतरही प्रश्न हाती घेतले. त्यांनी गावातील विधवा व एकट्या महिलांच्या भेटीगाठी सुरू केल्या. या भेटींमध्ये त्यांना एकट्या महिलांचे विविध प्रश्न समजू लागले. गावातल्या मनीषाला एकविसाव्या वर्षीच वैधव्य आलं. दोन छोट्या मुलांचा सांभाळ करण्याची जबाबदारी ही एकटी कशी निभावणार? तिच्या नावे घरकूल मंजूर झालंय. पण सासरचे लोक जमीन नावे करून द्यायला तयार नाहीत. अलकाच्या नवऱ्याला बैलानं मारलं. या अपघातात तो वारला. आता शेतीत हिस्सा द्यायला सासरचे तयार नाहीत. 'मला कुणाचाही आधार नाही!' म्हणत अलका आसवं गाळते. सीमाचं लग्न झालं नाही. ती आईवडलांच्याच घरात राहते. तिचं वेगळं रेशनकार्ड असलं, तरच तिला एकट्या महिलांसाठीची पेन्शन मिळू शकते. मनीषा, अलका नि सीमा सारख्या १३ महिलांच्या समस्या अर्चनाताईंनी जाणून घेतल्या. कुणाला गावातील शाळेत मध्यान्ह भोजनाचं काम मिळवून दिलं. तर कुणाला ग्रामपंचायतीकडून शिलाई मशिनची योजना मिळवून दिली. या तेराही महिलांचे पेन्शनसाठीचे अर्ज तयार केले. पैकी

अकराजणींना पेन्शन सुरू झाली. दोघींचं आधार कार्डावरील वय चुकीचं लागलेलं. वयाच्या पुराव्यासाठी शाळेचे दाखले काढणं, आधार कार्डावरील वयात दुरुस्ती करणं अशा कामात अर्चनाताईंची मदत या महिलांना मिळू लागली. अर्चनाताईंमुळे गावातील एकल महिलांच्या जीवनात नव्या घडामोडी सुरू झाल्या. कागदपत्रांची जुळवाजुळव करणं, सरकारी योजना व मालमत्तेतील हिश्शाची जाणीव या महिलांना पहिल्यांदाच झाली.

रोजगार हमी योजनेची कामं निघताना सहसा महिलांचा वेगळा विचार होत नाही. महिलांचा स्वतंत्र विचार करून रोहयोतून ग्रामीण महिलांना रोजगार मिळायला हवा. यासाठी 'मकाम' प्रयत्नशील आहे. अर्चनाताई म्हणतात, आमच्या गावात शेतीचं काम बारमाही असतं. रोजगार हमीच्या कामाची गरजच गावात जाणवत नाही. पण आम्ही महिलांना एकत्र करून शिवार फेरी काढली. तेव्हा गावातल्या काही महिलांना रोजगार हमीचं काम मिळायलाच पाहिजे हे लक्षात आलं....

चित्रा ही गावातील आदिवासी कुटुंबातली बाई. भूमिहीन. तिला रोजंदारीशिवाय पर्यायच नाही. वनिताचीही तीच गत. बिजाबाई या म्हातारीला मुलांचा आधार नाही. अशा महिलांना रोहयोतून काम मिळायला हवं. ही मागणी गावातल्या महिलांनी केली. शिवार फेरी करताना पाणंद वाटेवर वाढलेल्या वेली–झाडं–झुडपं साफ करणं, ग्रामपंचायतीनं केलेल्या वृक्षलागवडीचं जतन व्हावं यासाठी झाडांना कुंपण घालणं, या झाडांना पाणी घालणं ही कामं या महिला करू शकतात. ही मागणी शिवार फेरीतून पुढे आली. त्यानुसार चानपा गावात पहिल्यांदाच खास महिलांचा विचार करून रोहयो अंतर्गत कामं निघाली.

अर्चनाताईंनी अलीकडील काळात गावात घेतलेल्या पुढाकाराचा सकारात्मक परिणाम होऊ लागलाय. यापूर्वी अर्चनाताई शाळेतील शिक्षण समितीच्या सदस्य होत्या. आता ग्रामपंचायतीने त्यांना रेशन दक्षता समितीवरही सदस्यत्त्व दिलंय. अर्चनाताई सांगतात, 'मकाम'मध्ये काम करू लागल्यापासून मी झेड. पी.त जायला लागले. ग्रामपंचायतीत महिलांसाठीच्या राखीव फंडातून कोणत्या योजना सुरू करता येतील याबद्दल ग्रामपंचायतीच्या सदस्यांशी बोलू लागले. दारूची दुकानं बंद केल्यापासून पोलिस चौकीशीही माझा परिचय झाला... चानपा गावात अर्चनाताईंच्या भोवती विविध घडामोडी घडताहेत. विशेष म्हणजे पूर्वी कधी नव्हे ते या घडामोडींचं केंद्र महिला आहेत. अर्चनाताईंची ऊर्जा पाहिल्यावर वाटतं – ही तर केवळ सुरुवात आहे! अजून बराच पल्ला गाठायला अर्चनाताई सज्ज आहेत! ●



# सुनीता अलोने

▶ उदरनिर्वाहासाठी सुनीताताई रोजमजुरी करतात, पण त्यांचा जास्त वेळ जातो गोरगरिबांची मदत करण्यात. सकाळी आठपासून दुपारी एकपर्यंत शेतात मजुरी करायची. नंतर कुणाचं रेशनकार्ड, कुणाला कुठल्या योजनेचा लाभ मिळावा यासाठी तालुक्याला जायचं. असा सुनीताताईंचा गेली आठ-दहा वर्षे दिनक्रम आहे. त्या सांगतात, २०१२ साली नूतन माळवी मॅडमनी 'ऊर्जा फाउंडेशन'ची स्थापना केली. त्यांनीच मला हिंमत दिली. मग मी संस्थेमार्फत लोकांना मदत करू लागले. सुनीताताईंचं शिक्षण दहावी नापास. कुटुंबाची आर्थिक स्थिती अत्यंत बेताची. पण 'आपल्यामुळं गरीबांना मदत मिळते.' या प्रेरणेनं त्या कार्यरत आहेत.

२०१४ पासून 'मकाम'चं काम सुरू झालं. 'ऊर्जा फाउंडेशन' ही संस्थाही या कार्यात सक्रिय झाली. सुनीताताई फाउंडेशनमार्फत चार-पाच गावात आरोग्य,

शिक्षण, रेशन, पेन्शन व रोजगार हमीच्या प्रश्नांवर कार्यरत होत्या. 'मकाम'शी संपर्क आल्यानंतर त्यांच्या कामांना विधवा–परित्यक्तांच्या प्रश्नांचाही आयाम मिळाला.

सुनीताईंच्या प्रयत्नांमुळं पाचशेहून अधिक व्यक्तींचं जॉब कार्ड काढलं गेलं. यात ८० टक्के महिला आहेत. रोहयोतून विधवा महिलांसाठी काम मंजूर करून घेण्यातही सुनीताताईंनी पुढाकार घेतला. त्या सांगतात, २०१९ पासून गेल्या दोनच वर्षात त्यांनी जवळपास १०० व्यक्तींचं रेशनकार्ड काढून दिलंय. विधवा महिलांचे बचत गट स्थापन करण्यातही त्या महत्त्वाची भूमिका निभावत आहेत. विधवा महिलांना जमिनीचा हक्क मिळवून देण्यासाठी सुनीताताईंनी प्रभावी हस्तक्षेप केलाय. शेकडो लोकांना मदत करणाऱ्या सुनीताताई स्वत: मात्र भूमिहीन आहेत. कसायला जमीन व उत्पन्नाचं अन्य साधन नसल्यानंच त्या सामाजिक कार्यात सक्रिय झाल्या.

सुनीताईंचं माहेर व सासर दोन्ही भूमिहीन. रोजमजुरी हेच उदरनिर्वाहाचं साधन. पण १९९८ मध्ये त्यांना सिलिंग कायद्यानं जमीन मिळाली. त्यांच्या गावातील २८ कुळांना ही जमीन मिळाली होती. सुनीताताईंच्या मते मूळ मालकानं पैसे चारून पटवाऱ्याला आपल्या बाजूला वळवलं. आमची केस लढण्यासाठी वकील दोन लाख मागत होता. आमच्याकडं ऐवढे पैशे नव्हते. त्यामुळं आम्ही केस हरलो... या भूमिहीन कास्तकारांचा प्रश्न 'किसान अधिकार अभियान' या संघटनेमार्फत लढवला जात होता, आहे. या प्रक्रियेत सुनीताताई संघटनेच्या संपर्कात आल्या. त्यानंतर त्या 'ऊर्जा फाउंडेशन'सह कार्यरत राहिल्या. गरिबांचे रेशन कार्डाशी निगडित प्रश्नं सोडवणं, आरोग्य विमा कार्ड काढून देणं, निराधार व विधवा पेन्शन योजनेचा लाभ मिळवून देणं असं सुनीताताईंचं काम. त्यासाठी तालुक्यात जाणं, संबंधित कार्यालयात कागदपत्रं जमा करणं हे त्यांचं रोजचच काम. अनेकदा गरिबांना या योजनांची माहिती नसते, पैसे चारल्याशिवाय अशा योजनांचा लाभ मिळत नाही, अशीही लोकांची समजूत असते. पण सुनीताताईंमुळं शेकडो लोकांना विनामूल्य या योजनांचा लाभ मिळू शकलाय.

अनेकदा गरिबांची अशी समजूत असते, की सरकारकडून एखाद्या योजनेचा लाभ मिळतो म्हणजे सरकार आपल्यावर दया किंवा उपकार करतंय. उदरनिर्वाहाचं साधन मिळणं, सरकारचं पाठबळ मिळणं हा आपला हक्क आहे याची जाणीवच गरिबांमध्ये नसते. सुनीताताईंच्या मनात मात्र जनतेच्या हक्कांची जाणीव रुजलीय. त्यांच्या प्रयत्नांमुळे विधवा महिलांना रोहयो अंतर्गत

मिळालेलं काम हे याचंच एक उदाहरण. सुनीतातार्ईंनी चार गावातील महिलांची रोहयोअंतर्गत जॉब कार्ड काढली. नंतर त्या बीडीओ कार्यालयात गेल्या. या महिलांच्या घरात कमावते पुरुष नाहीत. रोहयोतून महिलांसाठी खास कामं काढली तर यांना रोजगार मिळेल असं त्यांनी बीडीओंना सांगितलं. रोहयोत सहसा खड्डे खणणं इत्यादी कष्टाची कामं काढली जातात. पण सुनीतातार्ईंनी गावालगत वृक्षारोपण झालेली झाडं जगवणं, रोपं तयार करणं अशा कामांची मागणी केली. या कामांना मंजुरीही मिळाली. देवळी तालुक्यात 'मकाम'मार्फत महिलांचा रोजगार हक्क प्रस्थापित करण्यात अशा प्रकारे सुनीतातार्ईंनी हस्तक्षेप केलाय.

संध्या वीरकडे या महिलेच्या नवऱ्यानं २००८ मध्ये आत्महत्या केली. त्यानंतर या बाईला तिच्या सासरकडून बेदखल करण्यात आलं. सासरे या बाईला शेतजमिनीत हिस्सा द्यायला तयार नव्हते. मालकीची जमीन असूनही ती रोज मजुरी करून जगत होती. तिला शेती करण्याची इच्छा होती. पण सासऱ्यांशी भांडून जमीन मिळवणं, कोर्ट-कचेरी करणं तिच्या कुवतीबाहेरचं होतं. सुनीतातार्ईंनी तिच्या सासऱ्यांची भेट घेतली. सासऱ्यांचं मत होतं, आम्ही हिच्या नावे जमीन केली नि हिनं आमच्या नातवांना टाकून दिलं तर? विधवा बाईच्या चारित्र्यावर प्रश्न उपस्थित करून हक्क नाकारला जाणं, मालमत्तेतून बेदखल करणं अशा घटना गावोगाव दिसतात. तसाच काहीसा हा प्रकार होता. सुनीतातार्ईंनी सासऱ्यांची समजूत काढली. 'ही बाई मुलांना सांभाळेल' असं स्टँप पेपरवर लिहून देण्याची तयारी दाखवली. पोलिस पाटील व सासऱ्यांदेखत बाईनं तसं सांगितलंही. सुनीतातार्ईंनी स्टँप पेपर मागवून बाईकडून तसं सासऱ्यांना लिहूनही दिलं. त्यानंतर संध्या वीरकडेंना सहा एकर जमिनीचा ताबा मिळाला. सहसा अशा तंट्यात सामंजस्याचा मार्ग लवकर निघत नाही. गावातील पुरुष पंच महिलांना झुकतं माप देत नाहीत. पण सुनीतातार्ईंनी संध्या वीरकडेंना जमिनीचा हक्क मिळवून देऊन हे शक्य केलं.

इंदूबाई चहांदेचीही अशीच समस्या होती. या बाईंना दोन मुली. नवऱ्यानं आत्महत्या केल्यानंतर दिरानं यांचा जमिनीवरील हक्क नाकारला. हिला मुलीच असल्यानं ते तिला वारसाहक्क देऊ इच्छित नव्हते. जमिनीऐवजी पैसे देण्याची त्यांची तयारी होती. पण इंदूबाईंना शेतजमीनच हवी होती. सुनीतातार्ईंनी या तंट्यातही वरीलप्रकारेच मध्यस्थीचा मार्ग काढला. 'कायद्यानं तुम्हाला या बाईचा हक्क मान्य करावाच लागेल' हे ठामपणे पण समजावणीच्या सुरात पटवून दिलं. त्यामुळं इंदूबाईंच्या नावे आठ एकर शेती झाली. महिलांना

मालमत्तेत वाटा मिळवून देणं ही सोपी बाब नाही. पण सुनीताताईंच्या संयमित हस्तक्षेपामुळं हे घडू शकलंय.

आगरगावमध्ये एका बाईच्या पतीचं कोविडनं निधन झालं. तिचा दीरही या बाईला आता शेतीचा हक्क देऊ इच्छित नाही. सुनीताताईंनी या तंट्यातही लक्ष घातलं. पण हक्क नाकारणारा माणूस ब्लडप्रेशर व मधुमेहाचा रुग्ण आहे. 'या तंट्यात त्याचा आजार बळावू शकतो.' असं सुनीताताईंना वाटतं. त्यामुळे त्या या बाईला हक्क मिळवून देण्यासाठी आस्तेकदम प्रयत्नशील आहेत.

नांदोरा गावातील मालाबाईंची समस्याही सुनीताताईंनी सामंजस्यानं सोडवलीय. मालाबाईचे सासू-सासरे वृद्ध आहेत. नवऱ्याच्या मृत्यूपूर्वीच हे कुटुंब विभक्त झालेलं. पण रेशन कार्डावर हे कुटुंब संयुक्तच होतं. हे कुटुंब दारिद्र्य रेषेखालील असल्यानं मोफत धान्याचं लाभार्थी आहे. मालाबाईच्या नवऱ्याच्या मृत्यूनंतर ती मोलमजुरी करून जगू लागली. रेशनिंग योजनेतील मोफत धान्याची तिला नितांत गरज होती, आहे. पण सासू-सासरे हे धान्य तिला द्यायला तयार नव्हते. शासकीय नियमांमुळं या कार्डातून मालाबाईंचं नाव वगळणंही शक्य होत नव्हतं. सुनीताताईंनी या गुंतागुंतीच्या समस्येतून मार्ग काढण्यासाठी रेशन दुकानदार व संबंधित सरकारी कार्यालयात भेटी दिल्या. पण ही समस्या नियमांच्या अडसरामुळे सुटण्यासारखी नव्हती. अखेर सुनीताताईंनी मालाबाईच्या सासऱ्यांचं मन वळवलं. 'या बाईलाही जगण्यासाठी रेशन मिळायला हवं. एका महिन्यात तुम्ही रेशन घ्या, दुसऱ्या महिन्यात तिला घेऊद्या!' अशी तडजोड सुचवली. ही सूचना त्यांना पटली. सुनीताताईंनी रेशन दुकानदाराची भेट घेऊन मालाबाईला एक महिन्याआड रेशन दिलं जाईल याची तजवीज करून घेतली. महिलांना खंबीर पाठिंबा देणं, त्यांचे प्रश्न ठामपणे मांडणं नि युक्ती करून ते सोडवणं हे सुनीताताईंचं वैशिष्ट्य म्हणता येईल.

सुनीताताईंचे यजमान गजाननराव सायकलवर गावोगाव फिरून भंगारचा व्यवसाय करत. लोकांकडून प्लास्टिक-लोखंडाच्या निरुपयोगी वस्तू घेऊन त्या बदल्यात ते रांगोळी देत. मात्र गेल्या काही वर्षांपासून त्यांना ब्लडप्रेशरचा आजार जडला. अतिशय अशक्तपणा जाणवू लागला. त्यांना पॅरालिसिसचा सौम्य झटकाही येऊन गेला. त्यामुळं त्यांना आता कमावण्यासाठी बाहेर पडता येत नाही. कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी सुनीताताईंनी दोन मुलांच्या मदतीनं पेललीय. त्यांचा थोरला मुलगा अक्षयनं दहावीनंतर हॉटेल मॅनेजमेंटचा कोर्स केला. तर धाकटा मुलगा अविनाशनं बारावीनंतर शिक्षण थांबवलं. तो एका फायनान्स कंपनीत नोकरी करतो. ही मुलं कमावती झाली तरी

**सुनीतातार्इंच्या गावापासून तालुक्याला जायला एस.टी. नेहमीच मिळत नाही. ऑटोरिक्षाही मिळतीलच याची खात्री नसते. त्यामुळं त्यांना अनेकदा कुणा मोटरसायकलस्वाराला विनंती करून जावं लागतं. खेड्यातील ही बाई सातत्यानं तालुक्याला जाते, त्यामुळे सुरुवातीला आसपासचे लोक त्यांच्याबाबत वाईट बोलत. बाईनं असं बाहेर पडणं त्यांच्या दृष्टीनं अयोग्य होतं. पण सुनीतातार्इंनी लोकांच्या टोमण्यांची पर्वा केली नाही.**

सुनीतातार्इंनाही काम करावंच लागतं.

सुनीतातार्इंच्या गावापासून तालुक्याला जायला एस.टी. नेहमीच मिळत नाही. ऑटोरिक्षाही मिळतीलच याची खात्री नसते. त्यामुळं त्यांना अनेकदा कुणा मोटरसायकलस्वाराला विनंती करून जावं लागतं. खेड्यातील ही बाई सातत्यानं तालुक्याला जाते, त्यामुळे सुरुवातीला आसपासचे लोक त्यांच्याबाबत वाईट बोलत. बाईनं असं बाहेर पडणं त्यांच्या दृष्टीनं अयोग्य होतं. पण सुनीतातार्इंनी लोकांच्या टोमण्यांची पर्वा केली नाही.

एकदा त्यांच्यावर बेकीचा प्रसंगही आला. संस्थेची मीटिंग संपवून त्या गावी निघाल्या होत्या. रात्रीची वेळ होती. स्टँडवरील रिक्षा प्रवाशांची वाट पाहत उभी होती. सुनीताताई त्या रिक्षात जाऊन बसल्या. तितक्यात दोन दारू पिलेले पुरुषही रिक्षात येऊन बसले. त्या रिक्षात बसून नूतन माळवींशी बोलत होत्या. चर्चेत मीटिंगचाच विषय होता. तो ऐकून त्या दोघांपैकी एकानं यांना विचारलं, कुठल्या हॉटेलमध्ये मीटिंग होती? त्याच्या प्रश्नातली खोच यांनी ओळखली. सुनीताताई त्याला खडसावू लागल्या. तर त्याने यांचा हात धरला. सुनीता खवळल्या. वाद वाढला. मग रिक्षाचालकाने त्या दोघांना रिक्षातून उतरवलं. छोट्या गावात काम करणाऱ्या महिला कार्यकर्त्यांवर असेही अवघड प्रसंग येऊ शकतात. पण सुनीतातार्इंनी अशा वेळी प्रसंगावधान राखण्याचं बळ मिळवलंय. पण कधी कधी त्यांना वाटतं, 'पतीला जडलेल्या ब्लडप्रेशरचं कारण आपणच तर नाही?' आपल्याविषयी लोक मागे काहीबाही चर्चा करत असतील. ती ऐकून नवऱ्याला टेन्शन तर येत नसेल? एकदा त्यांनी तसं गजाननरावांना स्पष्ट विचारलंही, माझ्या कामाबद्दल तुमची काही हरकत आहे का? माझ्याशी स्पष्ट बोला, तसं गैरसोईचं वाटत असेल तर मुलांशी बोला. त्यांच्याशी बोलणंही जमत नसेल तर इतर कोणाशी बोला. पण टेन्शन घेऊ नका! सुनीतातार्इंच्या कामामुळं कसंलंही टेन्शन नाही असं नवऱ्यानं त्यांना सांगितलंही. कदाचित

त्यांना आर्थिक परिस्थितीमुळे व सततच्या कष्टामुळेच आजार जडला असावा. पण सुनीताताईंच्या मनात ही रुखरुख असते. तरीही केवळ 'गरिबांना आपली मदत होते.' या भावनेनं त्या कार्यरत आहेत. कौटुंबिक ताण, बेताची आर्थिक परिस्थिती असूनही सुनीताताईंसारख्या कार्यकर्त्या एकल महिलांचे प्रश्न पटलावर आणत आहेत. अशा खंबीर कार्यकर्त्यांचं मोल समाजाला कदाचित आत्ता जाणवणारही नाही. पण शेतकरी-गरीब-विधवा-परित्यक्ता महिलांचा भरवसा कमावणं ही सोपी गोष्ट नाही. कारण या महिला आधीच परिस्थितीनं गांजलेल्या नि असुरक्षिता अनुभवणाऱ्या असतात.

सुनीताताईंनी विधवा महिलांच्या बचत गटाचा प्रस्ताव मांडला तेव्हा त्यांना फार उत्साहवर्धक प्रतिसाद मिळाला नाही. त्याचं कारण त्या सांगतात, हल्ली गावोगाव बचत गट झालेत. काही महिला कर्ज बुडवतात. त्याचा भुर्दंड इतर महिलांना सोसावा लागतो. त्यामुळं महिला बचत गटात यायला नको म्हणतात. शिवाय खेड्यात विधवा बायांचं स्वतंत्र बँक खातंही नसतं. आपलं बँकेत खातं असावं, असंही महिलांना वाटत नाही. खेड्यातील अनेक विधवा महिलांकडे बचत करण्याइतपत रक्कमही नसावी. तरीही सुनीताताईंनी दोन बचत गट स्थापन करण्याइतपत तयारी केली आहे. त्यांनी विधवा महिलांचा भरवसा मिळवलाय. यथावकाश हा भरवसा सार्थ ठरेलही. सुनीताताई म्हणतात, पूर्वी जे लोक माझ्या कामाला नावं ठेवायचे तेच आता कामं करून घेण्यासाठी मला फोन करतात. असाच विश्वास सुनीताताई एकल महिलातही निर्माण करतील यात शंका नाही. ●



# निलिमा रेंघे

▶ ‘मकाम’शी जोडलं गेल्यानंतर तुमच्यात काय बदल झाला?’ असं विचारल्यावर निलिमाताई म्हणतात, हिंमत आली! आपल्या भरोशावर आपणच पुढं जाऊ शकतो, असं वाटायला लागलं. खरंतर निलिमाताईंचा आत्मविश्वास आधीपासूनच दांडगा आहे. ‘मकाम’ची सोबत मिळाल्यानं त्या अधिक खंबीर झाल्या असं मात्र म्हणता येईल. निलिमाताई यवतमाळमधील राळेगाव तालुक्यातील धाडगावच्या. शिक्षण फक्त आठव्या इयत्तेपर्यंत झालेलं. पण केवळ आत्मविश्वासाच्या बळावर निलिमाताई खंबीरपणे परिस्थितीशी दोन हात करत आहेत.

निलिमाताईंच्या पतीनं २०१४ मध्ये कर्जाला कंटाळून आत्महत्या केली. ही घटना घडली तेव्हा निलिमाताई गर्भवती होत्या. ही ‘शेतकरी आत्महत्या’ असल्यानं निलिमाताईंना सरकारकडून मदत मिळाली. पण या मदतीतली रोख

रक्कम त्यांच्या बाळंतपणात दवाखान्याचं बिल भरण्यातच खर्च झाली. त्यानंतर या बाईनं बाळाला वाढवण्यासाठी कंबर कसली. नवऱ्याचं कर्ज फेडलं. सासरचे लोक त्यांना शेतीतील उत्पन्नाचा वाटा देत नव्हते. यांनी भीड सोडून जमिनीचा ताबा मिळवला. शेती व मोलमजुरी करताना नवऱ्याला नैराश्यानं ग्रासलं. निलिमाताई मात्र त्याच शेतीत पाय रोवून उभ्या आहेत. त्याही शेती व मोलमजुरीच करताहेत, पण खचलेल्या अजिबात नाहीत.

'आपण स्वत:च्या पायावर उभं राहिलं पाहिजे!' असं निलिमाला लहापणापासूनच वाटत होतं. दहावीत त्या नापास झाल्या. त्यांना पुन्हा परीक्षा द्यायची होती. शिकायचं होतं. पण त्यांचे वडील म्हणाले, शिक्षणावर खर्च करण्याची माझी ऐपत नाही. तू आता घरीच बस. मग निलिमानं किमान शिवणक्लासला तरी जाते. असं म्हणून एक रोजगारक्षम कला शिकून घेतली. ब्लाऊज शिवून त्या घरखर्चाला हातभार लावू लागल्या. भविष्यात ही कला आपल्याला मदतकारक ठरू शकते असं त्यांना वाटत होतं. झालंही तसंच.

२०११ मध्ये त्यांचा विवाह झाला. सासरकडे दहा एकर शेती होती. पण ही कोरडवाहू जमीन ते कुटुंब कसत नसे. शेती मक्तयानं दिली जायची. त्यातनं वर्षाकाठी काही उत्पन्न मिळायचं. बाकी रोजखर्चाची भिस्त मिळेल त्या मजुरीवर होती. नवरा व सासऱ्याला दारूचं व्यसन होतं. त्यांचा भासरा (मोठा दीर) निर्व्यसनी. धाकट्या भावाच्या व्यसनामुळं या भावंडांचं एकमेकांशी पटत नव्हतं. कुटुंबातील चार लग्नात या घरावर कर्जाचा बोजा झालेला. दरवर्षी हे कर्ज वाढतच होतं. अशा खातेऱ्यात अडकलेल्या कुटुंबात निलिमानं शिलाईकाम करून घराला हातभार लावायला सुरुवात केली. कसंबसं भागत होतं. लग्नानंतर त्यांच्या पतीनं आपल्या हिश्शाची जमीन कसायचा प्रयत्न केला. पण त्यांना तोटा झाला. कर्जही झालं. त्यांनी पुन्हा काही काळ रोजमजुरी केली. मग मक्तयानं शेत कसण्याचा प्रयत्न केला. पण काही केल्या कर्ज फिटेना. दुसरीकडे व्यसनही वाढलं होतं. अशात एक दिवस त्यांनी विषारी औषध घेतलं. त्यातच त्यांचा अंत झाला.

नवऱ्याचे अंत्यसंस्कार करून निलिमाताई माहेरी बाळंतपणासाठी आल्या. त्यांना आता केवळ माहेरचाच आधार होता. पण त्यांचे वडील व एक भाऊ कास्तकारीतून कसेबसे निभावत होते. तरीही त्यांनी निलिमा व तिच्या बाळाची जबाबदारी घेतली. निलिमाताईंनी नवऱ्याच्या मृत्यूनंतर सासरी जाण्याचा प्रयत्न केला. पण सासरच्या लोकांनी ही बाळंतीण व तिच्या बाळाला सांभाळायला आपण असमर्थ असल्याचं कळवलं. सरकारकडून मिळालेली

**‘आपण स्वतःच्या पायावर उभं राहिलं पाहिजे!’ असं निलिमाला लहापणापासूनच वाटत होतं. दहावीत त्या नापास झाल्या. त्यांना पुन्हा परीक्षा द्यायची होती. शिकायचं होतं. पण त्यांचे वडील म्हणाले, शिक्षणावर खर्च करण्याची माझी ऐपत नाही. तू आता घरीच बस. मग निलिमानं किमान शिवणक्लासला तरी जाते. असं म्हणून एक रोजगारक्षम कला शिकून घेतली. ब्लाऊज शिवून त्या घरखर्चाला हातभार लावू लागल्या. भविष्यात ही कला आपल्याला मदतकारक ठरू शकते असं त्यांना वाटत होतं. झालंही तसंच.**

मदत निलिमाताईंच्या खात्यावर जमा झाली. ‘आमचा मुलगा वारला नि मदत हिला का मिळाली?’ असा आडमुठा राग सासरच्या मंडळींनी मनात धरलेला. त्यामुळे माहेरीच राहण्याशिवाय निलिमाताईंकडे पर्याय नव्हता.

निलिमाताईंनी शिलाई काम करत आपल्या बाळाला सांभाळलं. त्यांचा मुलगा सोहम दोन वर्षांचा झाल्यावर त्या सासरी आल्या. हा तुमच्या वंशाचा दिवा आहे. याला याचा हिस्सा मिळायला हवा. असं त्यांनी सासरच्या लोकांना सांगितलं. पण त्यांचं म्हणणं ऐकलं गेलं नाही. सोहमचा तिसरा वाढदिवस झाल्यावर त्या पुन्हा सासरी आल्या. पुन्हा मुलाच्या हिश्शाबाबत आग्रह धरला. पुन्हा त्यांना नकार मिळाला. पण यावेळी निलिमाताई अधिक ठाम होत्या. त्यांनी सासरच्या लोकांना सांगितलं, तुम्ही तुमच्याकडून चार लोक बोलवा. मी माझ्याकडची चार लोकं बोलवते. तुमच्या मुलाचा पोरगा मी सांभाळतेय. सगळ्यांच्या विचारानं त्याचा हक्क त्याला द्या! दोन दिवस सासरी राहून निलिमाताई माहेरी आल्या. घरच्या बाबीला निस्तरण्यासाठी गावातली लोकं बोलावल्यावर नामुष्की होईल, असं सासऱ्यांना वाटलं असावं. त्यामुळं त्यांनी ‘लोक बोलवू नको, तुला पैशे पाठवतो’ असं कळवलं. मक्तयानं दिलेल्या शेतीतून काही रक्कम दोनदा त्यांनी पाठवलीही. अनेकदा विधवांना हिस्सा नाकारला जातो. निलिमाताईंनी मात्र हुशारीनं आपला हक्क कबूल करून घेतला.

पण अजूनही केवळ निलिमाताईंचा त्यांच्या पतीच्या जमिनीवरील वारसा हक्क सासरच्या मंडळींना मान्य नाही. पण नातवाचा हक्क ते मान्य करतात. निलिमाताईंचा हक्क त्यांना मान्य नाही. निलिमाताईंच्या माहेरच्या लोकांनाही हिनं जमिनीसाठी धरलेला हट्ट अनाठाई वाटत होता. त्यांना वाटत होतं, मुलगा मोठा झाल्यावर आज ना उद्या त्याच्या हिश्शाची जमीन मिळेलच. मग ही

एवढा हट्ट का धरतेय? बाईचा काही हक्क असतो हे कुणाच्या अजून मनातही आलं नव्हतं. निलिमाताईही मुलाच्या भविष्याचा विचार करूनच धडपडत होत्या.

२०१८च्या दरम्यान निलिमाताई 'प्रेरणा' संस्थेच्या माधुरी खडसे यांच्या संपर्कात आल्या. ही संस्था आत्महत्याग्रस्त कुटुंबातील विधवांच्या पुनर्वसनासाठी कार्यरत आहे. माधुरीताईंनी दिलेल्या हिंमतीमुळं निलिमाताई पुन्हा सासरी आल्या. तोवर माधुरीताईंनी त्यांना 'मकाम'सोबत कार्यरत होण्याचीही सूचना केली होती. २०२० मध्ये निलिमाताईंनी 'मकाम'च्या ऑनलाईन सत्रांना हजेरी लावायला सुरुवात केली. त्यांच्याकडे मोबाईल नव्हता. त्यामुळे त्या आपल्या गावाहून माधुरीताईंच्या घरी तालुक्याच्या ठिकाणी ही सत्र ऐकण्यासाठी येऊ लागल्या. एकट्या बाईला असं बाहेर जाऊ देण्यास निलिमाताईंच्या घरचे तयार नव्हते. पण माधुरीताईंनी जबाबदारी घेतल्यामुळे त्यांना घराबाहेर पडणं शक्य होऊ लागलं.

या सत्रांसाठी अन्य तीन विधवा महिलाही येत. या महिलादेखील निलिमाताईंप्रमाणेच आपल्या हक्कांपासून वंचित आहेत. त्यामुळं समदु:खी महिलांशी संवाद वाढल्यावर निलिमाताईंची हिंमत आणखी वाढली. त्यांनी माझ्या हिश्शाची जमीन मक्त्यानं देऊ नये. मी ती कसायला तयार आहे! असं सासरच्या लोकांना सांगितलं. त्यांना वाटलं ही एकटी बाई कशी जमीन कसणार? पण निलिमाताईंनी आपलं म्हणणं सोडलं नाही. कदाचित हिची फजिती बघावी अशा हेतूनंही असू शकेल. निलिमाताईंना तीन एकर जमिनीचा ताबा सासरच्या लोकांनी दिला. सातबारावर मात्र अजून त्यांचं नाव लागलेलं नाही.

पहिल्या वर्षी निलिमाताईंनी कापूस, तूर व सोयाबीन पेरलं. त्यासाठी कृषी केंद्राकडून कर्जाऊ खत-बियाणं घेतलं. त्यांच्या शेतात १५ क्विंटल कापूस नि तीन क्विंटल तूर झाली. त्यातून साधारणत: बारा हजाराचं उत्पन्न मिळालं. इथवर निलिमाताई माहेरहून एस.टी.नं येऊन शेती पाहत होत्या. आता त्यांनी सासरच्या घराजवळच कुडाचं घर करून राहण्याचा निर्णय घेतला. माहेरी राहणं सोडलं. आता त्या स्वतंत्र राहू लागल्या. शेतीसोबतच शिवणकाम व रोजमजुरी या गावीही सुरू केली. 'मकाम'मध्ये सहभागी झाल्यानंतर त्यांच्यात ही हिंमत आली असं म्हणता येईल.

पण आता त्यांचे सासरेबुवा निलिमाताईंवर देखरेख ठेवू लागले. 'मकाम'च्या मीटिंगांसाठी निलिमाताई आपल्या मुलाला माहेरी ठेवत. ही बाई मुलाला

दुसरीकडे ठेवून कुठे मुक्कामाला जाते? शेतीसाठी मजुरांची तजवीज करणं, खतं-बियाणांसाठी तालुक्याला जाणंही निलिमाताईंचं वाढलं. एकदा माहेरकडील नात्यातला एक मावसभाऊ निलिमाताईंच्या घरी आला. तर 'आता हिच्या घरात पुरुषही यायला लागले!' अशी शंका सासरचे लोक घेऊ लागले. मग निलिमाताईंच्या भावानं येऊन सासऱ्यांना तिची चिंता करू नका असं सांगितलं, ती तिचं जगतेय. तुम्ही आडकाठी आणू नका अशी तंबीही दिली.

मुलगा अगदीच छोटा होता तोवर निलिमाताईंना घराबाहेर पडता येत नव्हतं. आता त्यांचा मुलगा आठ वर्षांचा झालाय. त्यामुळे निलिमाताई अन्य विधवा महिलांच्या भेटीगाठींसाठी बाहेर पडू लागल्यात. इंटरनेटवरून सातबारावरील नोंदी कशा पाहायच्या, नोंदी करण्यासाठी कोणकोणती कागदपत्रं लागतात, रेशन कार्ड, विधवा पेन्शन योजना इत्यादींचा लाभ मिळवण्यासाठी कुठे अर्ज करायचा याची माहिती त्यांनी मिळवलीय. ही माहिती देऊन त्या इतर महिलांना आपल्या पायांवर उभं राहण्यासाठी प्रोत्साहन देऊ लागल्या आहेत.

दिल्लीत सुरू असलेलं शेतकरी आंदोलन गाजत होतं. वर्ध्यात या आंदोलनाची निदर्शनं होती. या निदर्शनात निलिमाताई सहभागी झाल्या. 'या आंदोलनाच्या मागण्या काय होत्या?' असं विचारल्यावर निलिमाताई म्हणाल्या, विधवा महिलांच्या नावावर शेती नसती. त्यामुळं त्यांना कर्ज मिळत नाही. शेती नावावर करून देण्यासाठी ५०-६० हजार रुपये मागत्यात. एवढे पैसे विधवा बाई कुठून आणणार? आपण कष्ट करत आहो, मजा करणारे मजा करतात, म्हणून ते आंदोलन होतं. शेतकरी आंदोलनाच्या मागण्या स्वतंत्र आहेत. त्याची निलिमाताईंना माहिती असेलही. पण त्यांनी आपल्या मनात शेतकरी आंदोलनाच्या काय मागण्या असाव्यात याचे काही आडाखे बांधलेत. महिलांचे प्रश्न त्यांना शेतकरी आंदोलनात अग्रस्थानी आहेत, असावेत असं जाणवतंय. त्यातून त्या व्यापक आंदोलनाचा भाग होऊ इच्छिताहेत. अल्पशिक्षित महिलेत स्वत:च्या हक्कांबाबत अशी जागृती येणं, तिनं व्यापक आंदोलनात आपल्या अपेक्षांचं प्रतिबिंब पाहणं हेच 'मकाम'चं यश आहे. ●



# मनीषा उईके

▶ मी माझ्या मुलींना लग्नासाठी फोर्स करणार नाही. त्यांनी फक्त शिकावं. आपल्या पायांवर उभं राहावं. असं अमरावतीमधील अशोकनगरच्या मनीषा उईकेंचं ठाम मत आहे. मनीषांचं वय एकतीस, शिक्षण केवळ सहाव्या इयत्तेपर्यंत. त्यांची सर्वात मोठी मुलगी तेरा वर्षांची व बाकी दोघींची वयं आहेत दहा व आठ. या मुलींनी स्वतंत्र जगावं असं मनीषांना वाटतं. त्यांचं हे मत कठोर अनुभवातून बनलंय. सासर व माहेरची साथ नसलेल्या मनीषांनी स्वत:च्या हिंमतीवर पत्र्याचं घर बांधलंय. त्यासाठी गावाचा विरोध पत्करलाय. एकल महिलेनं रडत-कुढत जगू नये. लढावं. याचा एक आदर्श म्हणजे मनीषा उईके ही आदिवासी महिला. २०१७ मध्ये त्या आरती बैस यांच्या संपर्कात आल्या. त्यानंतर मनीषा 'मकाम'मध्ये सक्रिय झाल्या. त्या म्हणतात, आरतीताई व मकामने मला हिंमत दिली. पण या बाईनं गाव, नातलग व

समाजाशी केलेला संघर्ष पाहिला तर आपलीच हिंमत वाढते.

मनीषाताईंना लागोपाठ तीन मुली झाल्या. थोरली मुलगी तेजस्विनी सात वर्षांची, मधली ज्ञानेश्वरी तीन व धाकटी जान्हवी केवळ एक वर्षाची होती, तेव्हा त्यांच्या पतीनं आत्महत्या केली. या आत्महत्येचं एक कारण मनीषाताई सांगतात, मला तिसरीही मुलगी झाल्यापासून ते जास्त दारू प्यायला लागले. सगळे म्हणायचे ह्याला मुलीच झाल्या. हा कमनशिबी. त्यामुळं ते खचले.

नवऱ्याच्या मृत्यूनंतर सासरच्यांनी मनीषाताईंना जमिनीचा हिस्सा नाकारला. मनीषा सांगतात, माझी सासू म्हणली, माझं नाक गेलं. शेंबडाचं मी काय करू? सासू व दिराकडून त्यांना रेशनचं धान्यही मिळत नव्हतं. पण मनीषाताईंनी भांडून स्वतंत्र रेशनकार्ड, जमीन व घर मिळवलंय. सासू, दीर, भाऊ, गावकरी, रेशन दुकानदार, तहसील कचेरीतले अधिकारी अशा विविध लोकांशी ही बाई भांडलीय. केवळ खमक्या स्वभावामुळं तिनं हक्क मिळवलेत. लोक त्यांना भांडकुदळही म्हणत असतील, पण लढल्याशिवाय काहीच मिळत नाही हाच मनीषाताईंचा अनुभव आहे. 'मकाम'मध्ये सामील झाल्यापासून त्या इतर महिलांना आपल्या भांडणाच्या कथाच सांगून प्रेरणा देताहेत.

बालपणापासून मनीषाताईनं भांडण व संघर्षच पाहिलाय. त्यांचे आई-वडील दोघं अशिक्षित. रोजमजुरीवर गुजराण करणारे. त्यामुळं मुलांचं शिक्षण झालं नाही. वडलांना दारूचं व्यसन होतं. ते नशेत मनीषाच्या आईला अर्वाच्य शिव्या देत, मारहाण करत. ते पाहून या मुलीला वाटायचं 'आपल्याला शिकलेला नवरा मिळावा.' या आशेनं ती उपवासही करत असे. मनोज उईकेंचं स्थळ आलं नि तिचं स्वप्नं पूर्ण झालं. ग्रॅज्युएट मुलाशी लग्न झाल्यानं मनीषा खूश होती. पण मनोजरावांचा एक पाय पोलिओमुळं कमजोर आहे हे मनीषाला लग्नानंतर समजलं. ही माहिती लपवून लग्न झाल्याने ती नाराजही झाली. पण नवरा शांत स्वभावाचा आहे, हे लक्षात आल्यावर अपेक्षाभंगाचं दु:ख तिनं फार काळ बाळगलं नाही. सासरी अडीच एकर जमीन होती. त्यातली थोडी जमीन या जोडप्यानं काही काळ कसली. चांगला संसार सुरू होता. पण एके दिवशी मनोज शेतात पाय घसरून पडले. पोलिओग्रस्त पायालाच इजा झाली. या अपघातानंतर त्यांना शेतीचं काम जमेना. त्यानंतर मनोजना नैराश्यानं घेरलं.

मनोज उदास राहू लागले. कदाचित तीन मुलींच्या जबाबदारीचं ओझं त्यांना वाटू लागलं असावं. त्यामुळं कदाचित ते झटपट पैसा कमावण्याचा मार्ग शोधू लागले असावेत. मनोज मटका-जुगार खेळू लागले. त्यांनी बेकायदेशीरपणे दारू विक्रीही सुरू केली. हा धंदा मनोजनं मनीषापासून लपवला होता.

पण एक दिवस मनीषाला ते समजलंच. मग हा धंदा बंद करण्यासाठी त्या नवऱ्याशी भांडू लागल्या. दारू विक्री करता करता मनोजही व्यसनात गुरफटले. भांडणं विकोपाला जाऊ लागली. मनोजचं नैराश्य-राग मुलींवरही व्यक्त होऊ लागला. त्यामुळं मनीषा माहेरी आल्या. मोलमजुरी करून जगू लागल्या.

काही दिवसांनी मनोजही मनीषांकडे आले. 'मला जगायची इच्छा नाही.' असं मनोज वारंवार म्हणत होते. मनीषांनी त्यांना धीर दिला. आपलं मंगळसूत्रं गहाण ठेवायला दिलं. या पैशातून मनोजनं पुन्हा उभारी घ्यावी. असं मनीषांना वाटत होतं. पण ते घडलं नाही. मनोजनं ते पैसे व्यसनात घालवले. त्यातून पुन्हा त्यांना नैराश्यानं घेरलं नि गावी जाऊन त्यांनी गळफास घेतला.

मुलींची जबाबदारी एकट्या मनीषांवर आली. मनोज होते तेव्हा, सासू-दीर व यांचं कुटुंब यांची नोंद एकाच रेशनकार्डावर होती. रेशनचं धान्य हे वाटून घेत. पण मनोजच्या मृत्यूनंतर दिरानं यांना धान्य द्यायला नकार दिला. मनीषांनी रेशन दुकानदाराची भेट घेतली. तर त्यानं रेशनच्या बदल्यात शरीरसंबंधांची मागणी केली. बहुतेक विधवा-एकल महिलांना ही समस्या येते. पण मनीषा गप्प बसल्या नाहीत. त्या रेशन दुकानदाराशी भांडल्या. आपली समस्या घेऊन मनीषा थेट तहसील कार्यालयात गेल्या. त्यावेळी तिथे आमदार आलेले. त्यांची बैठक सुरू होती. चपराशानं मनीषांना अडवलं. पण या भांडून कार्यालयात घुसल्या. अधिकारी चिडले. वातावरण तंग झालं. पण आमदारांनी यांना बसायला सांगितलं. मनीषांनी आपली व्यथा सांगितली. आमदारांनी लगेचच संबंधित अधिकाऱ्यांना फोन करून यांना केशरी रेशनकार्ड काढून द्यायला सांगितलं. रेशनकार्ड मिळालं. पण या कार्डावर कमी धान्य मिळतं हे लवकरच मनीषांना लक्षात आलं. आपल्याला अंत्योदयचं कार्ड मिळावं यासाठी त्यांनी पुन्हा झगडा केला नि ते मिळवलंही.

दरम्यान मनीषा माहेरीच राहत होत्या. माहेरच्या घराजवळच त्यांनी तुराट्याचं खोपटं बांधून आसरा केलेला. रोजमजुरी करून त्या मुलींचा सांभाळ करत होत्या. खरंतर भावांनी तरी विधवा बहिणीच्या पाठीशी उभं राहायला हवं, पण असं घडताना दिसत नाही. मनीषाताईंनाही भावांची साथ मिळाली नाही. भाऊ दारू पिऊन यांना शिवीगाळ करू लागले. एकदा भांडणात एका भावानं छोट्या जान्हवीला लाथ मारून घराबाहेर फेकलं. मग मनीषांनी घर सोडलं. त्यांनी भाड्याची खोली घेऊन राहायचा निश्चय केला. दोन वर्षे त्या भाड्याच्या खोलीत राहिल्याही. मनीषा सांगतात, लोकांमध्ये एक गैरसमज आहे. आदिवासींना घर भाड्यानं दिलं व ते सहा महिने राहिले तर घर

**‘मला जगायची इच्छा नाही.’ असं मनोज वारंवार म्हणत होते. मनीषांनी त्यांना धीर दिला. आपलं मंगळसूत्रं गहाण ठेवायला दिलं. या पैशातून मनोजनं पुन्हा उभारी घ्यावी. असं मनीषांना वाटत होतं. पण ते घडलं नाही. मनोजनं ते पैसे व्यसनात घालवले. त्यातून पुन्हा त्यांना नैराश्यानं घेरलं नि गावी जाऊन त्यांनी गळफास घेतला.**

भाडेकरूच्या मालकीचं होतं. लोकांना वाटायचं मी त्यांच्या घरावर कब्जा करेल. त्यामुळं एका घरमालकानं लाईटचं कनेक्शनच तोडलं. मी सहा महिने अंधारात राहिले. मला काय करावं सूचेना. असं वाटू लागलं आपणही मरावं.

गावात मनीषांचा एक बालमित्र आहे. त्यानं यांची अवस्था पाहिली. मग त्यानं गावाजवळच्या रस्त्यालगतची एक जागा दाखवली. ‘या जागेवर पत्रे ठोकून तू राहा!’ असा सल्ला या मित्रानं दिला. मनीषानं जुने पत्रे मिळवून खोली बांधली. पण थोड्याच दिवसात या जागेवरून महामार्ग जाणार असल्यानं घर पाडावं असं गावातील पुढारी म्हणू लागले. मनीषा या पुढाऱ्यांशीही भांडल्या. ‘‘मला राहायला जागा द्या, मग घर पाडा!’’ असं मनीषांनी म्हटल्यावर पुढारी म्हणाला, तू या गावची नाहीस, ना तुझं या गावात मतदान आहे, मग तुला इथं घर कसं मिळणार? तू तुझ्या सासरच्या गावात जाऊन घर बांध. पण मनीषा मागे हटल्या नाहीत. त्या आपल्या घराच्या हक्कासाठी ठाम राहिल्यात. सासरी त्यांचे नातेसंबंध बिघडलेले. त्या गावात रोजमजुरीचे पर्यायही कमी आहेत. त्यामुळे त्यांना याच गावात राहणं सोईस्कर होतं. त्यामुळं त्यांनी जागा सोडली नाही. घराची ही जागा अजूनही मनीषांच्या नावे झालेली नाही. पण मनीषांना तिथून हटवण्याची हिंमतही त्या कुणाला करू देत नाहीत. पर्यायी जागा मिळाल्याशिवाय हलणार नाही, असा निर्धार करून त्या घराच्या हक्कासाठी गावाशी भांडताहेत.

सासरच्या मंडळींनी एकदा शेतजमीन दिराच्या मुलांच्या नावे करण्याचा घाट घातला. सर्वच नातलग जमून मनीषा व त्यांच्या मुलींना जमिनीच्या हक्कातून बेदखल करण्याची खलबतं करत होते. पण मनीषांनी सर्वांना सुनावलं. सासू व दिराशी जोरदार भांडण केलं. यांचा अवतार पाहून सासू एक एकर जमीन द्यायला राजी झाली. पण हक्कानं सव्वा एकर जमीन मिळायला हवी असं मनीषांना वाटतं. त्यामुळं त्यांनी या जमिनीचा ताबा घेतलेला नाही. पण हक्कही सोडलेला नाही. सातबारावर आपलं व मुलींची नावं नोंदवून घेतल्यानं

त्यांचा हक्क अबाधित आहे. ही कायदेशीर बाब मनीषांना सुचली कारण त्या 'मकाम'शी जोडल्या गेल्या आहेत.

'मकाम'शी संपर्क झाल्यानंतर मनीषांनी ३० विधवा महिलांचे पेन्शन योजनेसाठी अर्ज केलेत. सात विधवा महिलांना रेशनकार्ड मिळावं यासाठी प्रयत्न केलेत. मनीषांच्या संपर्कात येईपर्यंत आपल्याला अंत्योदयचं रेशनकार्ड मिळू शकतं, याची माहितीही त्या महिलांना नव्हती. मनीषांनी रोहयो योजनेतून आपलं जॉब कार्डही काढलं. इतर महिलांनाही त्यासाठी प्रवृत्त केलं. पण या गावातील महिला रोहयो अंतर्गत कामांना फारशा राजी नाहीत. पण मनीषा विधवा-एकल महिलांना सरकारी मदत मिळवून देऊ शकतात ही माहिती आता परिसरातील महिलांपर्यंत पोहोचू लागलीय. 'या बाईचा दरारा आहे. ही आपल्याला मदत करू शकते.' असा विश्वास पंचक्रोशीतील एकल महिलांना जाणवू लागलाय. 'मला मकामनं हिंमत दिली' असं मनीषा म्हणत असल्या तरी खरंतर त्याच अनेक महिलांसाठी हिंमत ठरत आहेत. मनीषा उईकेंच्या मुलीही आपल्या आईकडे एक आदर्श हिंमतबाज स्त्री म्हणूनच पाहताहेत. ●



# लक्ष्मी गजभीये

▶ नागपूर जिल्ह्यातील लक्ष्मीताईंच्या सिल्लोरी गावात साधं वर्तमानपत्रंही येत नाही. महिलांपर्यंत नवी माहिती पोहोचणं तर फारच दूर. अशा गावात २०१२ साली त्या सरपंच झाल्या. सरपंच पदाची त्यांची कारकिर्द वाखाणण्यासारखी होती. त्यांच्या गावात ग्रामपंचायतीला स्वतंत्र इमारत नव्हती, अंगणवाडीचं छत गळत होतं, ही इमारत पडझडीला आलेली. लक्ष्मीताईंनी जिल्हा परिषदेत सातत्याने पाठपुरावा केला. ग्रामपंचायत व अंगणवाडीच्या इमारतींना मंजुरी मिळवली. गावातील काही घरात पावसाचं पाणी शिरायचं, लक्ष्मीताईंनी क्राँक्रिटीकरण करून ही समस्या निकालात काढली. पिण्याच्या पाण्याची योजना यशस्वीपणे राबवली. गावात शेळीपालनासारख्या व्यवसायांना चालना मिळावी यासाठी लक्ष्मीताईंनी पशू संवर्धन विभागात पाठपुरावा केला. शेतकऱ्यांना शेळी व गायीपालनासाठी प्रवृत्त केलं. महिलांना भाजीविक्रीचा व्यवसाय करायला

मदत केली.

लक्ष्मीताई एक 'महिला सरपंच' म्हणून कार्यक्षमच होत्या, किंबहुना त्यांनी पुरुषांपेक्षाही चांगली कामगिरी केली. तरीही २०१७ साली त्यांना पुन्हा निवडून येता आलं नाही. लक्ष्मीताई म्हणतात, गावातल्या पुरुषांचा इगो आडवा आला. बाईनं केलेला विकास त्यांना बघवला नाही. सगळे पुरुष एकत्र झाले. 'ही गावची सून नाही.' असा माझ्या विरोधात प्रचार करून मला पाडलं गेलं. असं असलं तरी लक्ष्मीबाई गावातील राजकारणातून बाहेर पडलेल्या नाहीत. विशेषत: गावातील महिलांना आधार देत त्या गावातील राजकीय प्रक्रियेत सक्रिय आहेत.

अलीकडचीच घटना, जयश्री या बाईला विधवा पेन्शन योजनेसाठी कुणाकडूनच मदत मिळत नव्हती. कोविडची पहिली लाट होती त्या काळात जयश्रीच्या नवऱ्याचं निधन झालं. तिच्या नवऱ्याला रेबिज होता. पण जयश्रीच्या सासरच्या लोकांना वाटलं, त्याला कोविड झालाय. या काळात सरकारी दवाखान्यात रुग्णसंख्येचा ताण होता. त्यामुळं या माणसाला दवाखान्यात दाखलच करून घेत नव्हते. लक्ष्मीताईंनी डॉक्टरांना फोन केला. मग जयश्रीच्या नवऱ्यावर उपचार सुरू झाले. पण या आजाराचा अंत रुग्णाच्या मृत्यूनेच होतो. डॉक्टरांनी निर्वाणीचा इशारा दिलेला. त्यानंतर जयश्रीने नवऱ्याला घरी नेलं, त्याच दिवशी तो वारला. 'हिनं नवऱ्याला घरी नेलं म्हणूनच तो मेला' असा दोष सासरकडचे लोक जयश्रीला देऊ लागले. जयश्रीवर दोन छोट्या मुलांची जबाबदारी आली. पण सासरच्या मंडळींनी मनात राग धरून तिच्याशी संबंध तोडले. जयश्रीनं विधवा पेन्शनसाठी प्रयत्न सुरू केल्यावरही तिला दूषणं दिली गेली. 'नवरा आत्ताच मेलाय नि हिला पेन्शनचं पडलंय!' असं म्हटलं गेलं. सासरच्या लोकांनी मदत नाकारलेली. त्यामुळे जयश्रीला सरकारी मदतीचीच आशा होती. तिने पटवाऱ्याकडे पेन्शनसाठी अर्ज व कागदपत्रंही दिलेली. पण हा अर्ज पुढे सरकतच नव्हता. या बाईच्या समस्येची तीव्रताच पटवाऱ्याला जाणवत नसावी. जयश्री हतबल होऊन लक्ष्मीताईंकडे आली. मग लक्ष्मीताईंनी पटवाऱ्याची भेट घेतली. त्याला सुनावलं. त्यानंतर जयश्रीची पेन्शन मंजूर झाली. लक्ष्मीताईंच्या अशा हस्तक्षेपामुळे परिसरातील १४० विधवांना पेन्शन मिळू लागलीय. विधवांच्या अशा प्रश्नांकडे लक्ष्मीताई 'मकाम'च्या संपर्कात आल्यानंतर वळल्या.

२०१९ मध्ये 'मकाम'नं आयोजित केलेल्या 'शेतकरी व हवामान बदल' या कार्यशाळेच्या निमित्तानं लक्ष्मीताईंना 'मकाम'ची ओळख झाली. या कार्यशाळेमुळं त्यांना विधवा शेतकरी महिलांच्या प्रश्नांची अधिक जाणीव

झाली. त्यापूर्वी त्या 'प्रकृती' संस्थेमार्फत २००५ पासून कौटुंबिक हिसांचाराच्या प्रश्नांवर कार्यरत होत्या. गावातील महिला कुटुंबातील हिंसेचे प्रश्न घेऊन नेहमीच लक्ष्मीताईंकडे येत असतात. लक्ष्मीताई हे प्रश्न आपल्या स्वतंत्र धाटणीने सोडवतात. पीडितांना धीर देणं, अत्याचार करणाऱ्या पुरुषांना भेटणं, त्यांना समज देणं व वेळप्रसंगी पोलिस नि न्यायालयाची मदत मिळवणं हे लक्ष्मीताईंचं नेहमीचं काम. ते करताना त्यांनी ग्रामीण महिलांचे प्रश्न जवळून पाहिलेत, हाताळलेत.

२००८ सालची एक घटना लक्ष्मीताई सांगतात, एका साठ वर्षाच्या बाईला तिच्या नवऱ्यानं घरातून हाकललेलं. मी म्हातारीला पंधरा दिवस माझ्या घरी आसरा दिला. मग म्हाताऱ्याला जाऊन भेटले. तर तो म्हणाला ''ही वेळेवर सैपाक करत नाय. माझं ऐकत नाय'' म्हाताऱ्याला वाटत होतं, म्हातारीनं तो उठ म्हटलं की उठावं, बस म्हटलं की बसावं, त्याच्या मर्जीनंच जगावं. मी त्याला दोन तास समजावलं, तेव्हा कुठं त्यानं म्हातारीला घरात घेतलं. बाई तरुण असो की वृद्ध तिला कुठल्याही वयात त्रास सोसावा लागतोच. हे लक्ष्मीताईंना अशा अनुभवांमधून लक्षात येत गेलं. त्यामुळे लक्ष्मीताई महिलांची मदत करताना त्या बाईचा प्रश्न तिचा वैयक्तिक मानत नाहीत, चारजणींनी एकत्र येऊनच हे प्रश्न सोडवावेत असं त्यांना वाटतं. लक्ष्मीताई म्हणतात, गावातून माझ्यासारख्या बाईनं पाठिंबा दिला, चार बायांना त्या महिलेच्या पाठीशी उभं केलं तर ती खचत नाही.

कल्पना नावाच्या महिलेला तिचा नवरा मारहाण करायचा. ती माहेरी येऊन राहिलेली. कल्पनाची मुलं नवऱ्याकडेच होती. त्यामुळं ती मुलांच्या आठवणीनं खंगत चाललेली. लक्ष्मीताई तिला घेऊन नवऱ्याकडे गेल्या. त्यानं यांनाही दमदाटी सुरू केली. पण लक्ष्मीताईंनी खंबीरपणे मुलांचा ताबा घेतला. ही मुलं मोठी झाल्यावर तुला मिळतील. अशी कल्पनाच्या नवऱ्याला तंबी देऊन त्या तिथून निघाल्या. वाटेत पोलिस चौकीत घटनेची नोंद केली. दोन महिन्यांनी कल्पनाचा नवरा माफी मागायला आला. लक्ष्मीताईंनी या प्रकरणात खंबीर साथ दिली नसती तर कल्पना नैराश्यातच जगत-खंगत राहिली असती.

आरती नावाच्या महिलेच्या मुलांना तिच्या नवऱ्यानंच पळवलेलं. आरतीच्या नवऱ्याचे विवाहबाह्य संबंध होते. तो तिला माहेरी सोडून दुसऱ्या महिलेसोबत राहत होता. दोन छोटी मुलं मात्र आरतीकडे होती. एक दिवस गावात येऊन नवऱ्यानं ही दोन्ही मुलं मोटरसायकलवर बसवून पळवली. आरतीला हे नंतर समजलं. ती पोलिस चौकीत मदत मागायला गेली. पण पोलिस म्हणाले,

''बापानंच पोरं नेलीत, आम्ही काय करणार?'' आरतीला काय करावं कळेना. मग ती लक्ष्मीताईंकडे आली. लक्ष्मीताई स्वत: तिच्यासोबत पोलिस चौकीत गेल्या. सोबत आणखी चार महिलांना घेतलं. पोलिसांवर या काळात कोविडमधील बंदोबस्ताचा ताण होता. त्यामुळे आरतीला मदत करण्यास ते टाळाटाळ करत होते. पण लक्ष्मीताईंच्या हस्तक्षेपामुळं चौकीतून दोन हवालदार सोबतीला देण्याचं फौजदारांना कबूल करावं लागलं. हवालदारांना घेऊन लक्ष्मीताई आरतीच्या नवऱ्याकडे गेल्या. त्यामुळं आरतीला पुन्हा आपल्या मुलांचा ताबा मिळाला.

सुगंधा नावाच्या महिलेलाही लक्ष्मीताईंमुळेच न्याय मिळू शकला. सुगंधाचा नवरा मिलिट्रीत होता. तो सैन्यातील सेवेत होता, तेव्हा सुगंधा नणंदेच्या घराजवळ राहत असे. सेवानिवृत्तीनंतर नवरा घरी आला नि त्यानं सुगंधाला घराबाहेर हाकललं. सुगंधाच्या मते नणंदेनं तिच्या नवऱ्याचे कान भरले. सुगंधाला छोटी मुलगी आहे. उत्पन्नाचं साधन नाही. त्यामुळं ती हवालदिल झाली. लक्ष्मीताईंनी तिला आधार व पाठिंबा दिला. त्या स्वत: सुगंधाला घेऊन तिच्या नवऱ्याला भेटायला गेल्या. पण त्याने पुन्हा दमदाटी व शिवीगाळ केली. केवळ लक्ष्मीताई तिथे होत्या म्हणून सुगंधाला मारहाण झाली नाही. मग लक्ष्मीताईंनी सुगंधाला कायदेशीर मदत मिळवून दिली. आर्मी कोर्टात अर्ज करून निर्वाह भत्ता मिळवून दिला. तिच्या मुलीला केंद्रीय विद्यालयात प्रवेश मिळावा यासाठी प्रयत्न सुरू केले.

लक्ष्मीताईंमुळे माधुरी नावाच्या महिलेलाही धैर्य व उमेद मिळाली. माधुरीचा नवरा संशयी वृत्तीचा होता. 'हिचे भावाशी अनैतिक संबंध आहेत', असा आरोप करून तो मारझोड व छळ करायचा. माधुरीला दोन छोट्या जुळ्या मुली आहेत. या मुलींसाठी तिने कित्येक दिवस जाच सहन केला. कधीतरी असह्य झाल्यावर ती लक्ष्मीताईंकडे मदत मागायला आली. लक्ष्मीताईंनी नवऱ्याला दोनदा समजावून पाहिलं. पण त्याचे गलिच्छ आरोप व मारहाण थांबली नाही. मग माधुरीने घटस्फोटाचा निर्णय घेतला. लक्ष्मीताईंचा आधार होता, म्हणूनच ती खंबीरपणे उभी राहू शकली.

लक्ष्मीताई म्हणतात, मकाममुळं मला महिलांच्या हक्कांची जास्त जाणीव झाली. महिलांचे मालमत्तेवरील अधिकार समजले. त्यामुळं मी महिलांना आता योग्य सल्ला देऊ शकते. त्यांचा निर्णय त्यांना घेऊ देते. पण खचू देत नाही. मला कळालेला कायदा महिलांना सांगते. बारावी नापास असलेल्या लक्ष्मीताई केवळ महिलांच्या प्रश्नांची जाण असल्याने अशा किचकट प्रश्नांना पद्धतीशीरपणे सोडवू शकताहेत. 'प्रकृती' संस्थेची मदत व 'मकाम'नं वेळोवेळी दिलेली

**लक्ष्मीताईंमुळे माधुरी नावाच्या महिलेलाही धैर्य व उमेद मिळाली. माधुरीचा नवरा संशयी वृत्तीचा होता. 'हिचे भावाशी अनैतिक संबंध आहेत', असा आरोप करून तो मारझोड व छळ करायचा. माधुरीला दोन छोट्या जुळ्या मुली आहेत. या मुलींसाठी तिने कित्येक दिवस जाच सहन केला. कधीतरी असह्य झाल्यावर ती लक्ष्मीताईंकडे मदत मागायला आली. लक्ष्मीताईंनी नवऱ्याला दोनदा समजावून पाहिलं. पण त्याचे गलिच्छ आरोप व मारहाण थांबली नाही. मग माधुरीने घटस्फोटाचा निर्णय घेतला. लक्ष्मीताईंचा आधार होता, म्हणूनच ती खंबीरपणे उभी राहू शकली.**

माहिती लक्ष्मीताईंसारख्या महिलांपर्यंत पोचतेय त्यामुळेच ग्रामीण महिलांचे प्रश्न पटलावर येताहेत नि ते सोडवलेही जाताहेत.

लक्ष्मीताईंचं कुटुंब स्थानिक राजकारणात सक्रिय आहे. त्या म्हणतात, मला मतदानाचा अधिकारही नव्हता, तेव्हापासून मी निवडणुकांच्या प्रचारात सामील व्हायचे. मतदारांना भेटायचे. मतदानाच्या दिवशी मला उत्साही वाटायचं. मला लहानपणापासूनच राजकारणाचा छंद आहे. गरीब-असाहाय्यांच्या पाठीशी उभं राहणं या अर्थाने लक्ष्मीताई आपल्याला राजकारणाचा छंद आहे असं सांगतात.

लक्ष्मीताईंचं राजकारण म्हणजे गरजूंना मदत करणं. एका आदिवासी मुलीला झालेल्या मदतीचा किस्सा याचंच उदाहरण म्हणून नोंदवता येईल. किरण नावाची ही मुलगी गावाजवळच्या डोंगरात गुरं चारायला जायची. डोंगरात पडून तिच्या डोक्याला गंभीर जखम झाली. पण उपचारांसाठी पैसेच नसल्याने किरणची तब्येत बिघडत गेली. उपचारांअभावी किरणची हालत गंभीर झाली. तिला अर्धांगवायूसारखा आजार झाला. किरणची अवस्था समजल्यावर लक्ष्मीताईंनी पुढाकार घेतला. त्यांनी गावातून वर्गणी जमा केली. किरणला दवाखान्यात दाखल केलं. तिची सोनोग्राफी व अन्य उपाचार झाले. मग ही मुलगी बरी झाली. लक्ष्मीताई केवळ महिलांनाच अशी मदत करत नाहीत, त्या सर्वच गरिबांच्या मदतीला पुढे असतात. एक गरीब मेंढपाळ उपचारांअभावी दगावला असता. गोठ्यात अचानक आग लागली, या अपघातात हा माणूस भाजला. तो सरकारी दवाखान्यात उपचारांसाठी गेलाही होता. पण तेथील 'बर्न वॉर्ड'ची अवस्था पाहून तो घाबरून घरी आला. त्यानंतर त्याच्या जखमा चिघळल्या. या जखमांमध्ये किडे झाले. दुर्गंधी येऊ लागली. कुणी त्याच्या जवळही जात नव्हतं. लक्ष्मीताईंनी या माणसाला स्वत: दवाखान्यात नेलं. आठ दिवस त्या रोज दवाखान्यात जाऊन

त्याची काळजी घेत होत्या. तो माणूस बरा झाल्यावरच लक्ष्मीताईंची बेचैनी गेली. लक्ष्मीताईंचा राजकारणाचा छंद हा असा मानवीय आहे.

महिलांना मदत करताना मात्र त्यांची मानवीयता अधिक टोकदार होते. संजूबाई या विधवेला घरात नळ हवा होता. लक्ष्मीबाई सांगतात, शासनाची 'घर घर जल' ही योजना होती. संजूबाई ग्रामपंचायतीत गेली तर तिला सांगितलं गेलं 'योजना संपली आता नळ मिळू शकत नाही.' मग मी ग्रामसचिवाला भेटले. त्याला विचारलं, 'योजनेची तारीख गेली का?' तो म्हणाला, 'नाही ताई, कोणाला पायजे नळ सांगा की, करू आपण मंजूर', मग मी संजूबाईला बोलावलं. ही बाई घराचा टॅक्स भरते. मग हिला का योजनेतून नळ देत नाही? मी असं विचारल्यावर ग्रामसचिवाला त्याची चूक समजली. संजूबाईच्या घरात नळ आला.

अलीकडे 'मकाम'नं सुचवलेले उपक्रम गावात राबवताना लक्ष्मीताईंनी महिलांच्या मालमत्तेवरील अधिकारांच्या प्रश्नातही लक्ष घालायला सुरुवात केली. गीताताई या विधवा महिलेला तिचे भासरे (मोठा दीर) शेतजमिनीचा हक्क द्यायला तयार नव्हते. लक्ष्मीताईंनी त्यांची भेट घेतली. कायदा समजावून सांगितला. मग गीताताईंचीही सातबारावर वारस म्हणून नोंद झाली. एक एकर जमिनीचा ताबा गीताताईंकडे आला. सुरेखा या विधवेला तिची सासू जमीन द्यायला तयार नव्हती. 'मी जिवंत आहे, तोवर सुनेचं नाव जमिनीवर लागू देणार नाही' असा या सासुबाईंचा हेका होता. पण या प्रकरणात हस्तक्षेप करून लक्ष्मीताईंनी सुरेखाला जमिनीचा ताबा मिळवून दिला.

शिवार फेरीसाठी लक्ष्मीताईंनी गावातील महिलांची बैठक बोलावली. या बैठकीला ३०-३५ महिला जमल्या. त्यांनी गावाची पाहणी केली. त्यातून रोजगार हमी योजनेतून पाणंद रस्ता बांधणीचा प्रस्ताव दिला गेला. तो मंजूरही झाला. त्याचप्रमाणे बचत गटातील महिलांना रोहयो अंतर्गत नर्सरी सुरू करण्याचा प्रस्तावही लक्ष्मीताईंनीच ग्रामपंचायतीकडे दिलाय. 'मकाम'च्या संपर्कात आल्यानंतर लक्ष्मीताईंनी विधवा पेन्शन योजनेसाठी ४२ महिलांचे ऑनलाईन अर्ज दाखल केलेत. त्याचप्रमाणे 'श्रावणबाळ' योजनेसाठी दहा पुरुषांचेही अर्ज केले आहेत.

लक्ष्मीताई म्हणतात, संविधानात मुलगा-मुलगी समान हायेत म्हणून सांगितलंय. पण गावात तसं नाहीय. संविधानात लिहलंय, ते गावात आणायला आपल्यालाच पुढाकार घ्यावा लागतो. तेच मी करत आहे. अशा प्रकारे संवैधानिक हक्क मिळवून देण्यासाठी 'मकाम' सिल्लोरी गावात महिलाकेंद्रित राजकारण करत आहे. ●



# द्वारका वाघमारे

▶ द्वारकाताईंना गावात व पंचक्रोशीत लोक ‘ताई’ म्हणून ओळखतात. हे संबोधन त्यांनी नेतृत्वगुणातून कमावलंय. अन्यथा ही अशिक्षित दलित समाजातील बाई. साधी शेतमजूर. पण अन्यायाची चीड व गरिबांबद्दल कणव या गुणांमुळं द्वारकाताईंनी अनेकांना आधार दिला. त्यामुळे त्यांच्यातील नेतृत्वाला मान्यता देत लोकांनीच त्यांना ‘ताई’ म्हणत आदर द्यायला सुरुवात केली. दलित महिलांना सवर्णांकडून असा मान क्वचितच मिळतो.

द्वारकाताई मागासवर्गीय. पण त्यांचा दबदबा असा आहे की सवर्ण समाजातील मुलींची आयुष्य सावरण्यासाठीही त्यांची मदत घेतली जाते. एका सवर्ण मुलीचं विजोड माणसाशी लग्न झालेलं. या संसारात त्या मुलीच्या आयुष्याची धुळधाण झालेली. द्वारकाताईंनी त्या नात्यातून तिची सुटका केली. नंतर समंजस पुढाकार घेऊन तिचं दुसरं लग्नंही लावलं. ती आता

पुन्हा नव्या संसारात रमली आहे. एका दलित महिलेला सवर्णांच्या अशा घरगुती अडचणीत क्वचितच स्थान मिळतं. ते द्वारकाताईंनी मिळवलं आहेच, पण गावातील कुणीही त्यांच्यासमोर दारू पिऊन येत नाही. ग्रामपंचायत असो की लोकसभा-विधानसभेची निवडणूक पुढारी मंडळी द्वारकाताईंचा पाठिंबा मागायला येतात. गावातील आंबेडकर जयंती, अण्णाभाऊ साठेंची जयंती अशा सार्वजनिक उपक्रमातही द्वारकाताई निर्णयप्रक्रियेत असतात. असे कार्यक्रम सहसा पुरुषच पार पाडतात. पण द्वारकाताई या अशिक्षित बाईनं आपल्या नेतृत्त्वगुणातून गावातील महत्त्वाच्या उपक्रमात वैशिष्ट्यपूर्ण स्थान मिळवलंय. लोक मोठ्या बहिणीलाही 'ताई' म्हणतात. द्वारकाताईंचं नेतृत्त्व जाणत्या कनवाळू बहिणीसारखंच आहे. त्यामुळंच दलित असो की सवर्ण सर्वच त्यांना सन्मान देतात.

'मकाम' मार्फत लॉकडाऊन काळात एकल महिलांना धान्य पुरवठा केला गेला. तेव्हा द्वारकाताईंनी अनेक महिलांना या धान्यातून आधार दिला. खरंतर 'मकाम' मार्फत धान्य येण्याआधीच द्वारकाताईंनी गरिबांना मदत करणं सुरू केलेलं. त्या सांगतात, आमच्या गावातल्या वंदनाबायची परिस्थिती लय वाईट झालेली. तिला काम केल्याबगर भाकरी मिळत नाही. लॉकडाऊनमधी सगळी कामं बंद पडली. वंदनाबायच्या घरातली चूल थंड पडल्याली. तिची उपासमार मला बघवली नाय... कोरोना व लॉकडाऊनमुळं सर्वच गरिबांपुढे जगण्याचा प्रश्न निर्माण झालेला. ही परिस्थिती कधी निवळेल याचा काहीही अंदाज येत नव्हता, अशा काळात स्वत:चा विचार न करता द्वारकाताईंनी गरीब वंदनाबाईला आपल्या घरची बाजरी नेऊन दिली. द्वारकाताईंमधील नेतृत्त्वगुणात एक खासियत आहे, गरीब महिलांना मदत करताना त्या आपल्या फायद्या-तोट्याचा, अन्यायी वागणाऱ्यांचा रोष पत्करावा लागेल याचा विचार करत नाहीत.

लॉकडाऊन काळातलीच एक किस्सा आहे, गावातील एका कुटुंबानं या प्रसंगामुळं द्वारकाताईंशी अबोला धरलाय. कारण या कुटुंबातील सुनबाईला द्वारकाताईंनी मदत केली. झालं असं, हे कुटुंब पुण्यात मोलमजुरी करून जगायचं. पण लॉकडाऊन सुरू झाल्यानंतर या कुटुंबातील गर्भवती सुनबाईला पुण्यातच सोडून तिची सासू मुलाला घेऊन गावी निघून आली. या दोघांना कसंबसं गावी पोचता आलं. पण तिकडे पुण्यातील खोलीत ती मुलगी एकटीच अडकलेली. तिची उपासमार सुरू झाली. मदतीला जवळ कुणीच नव्हतं. तिला काय करावं सुचेना. ही मुलगी रस्त्यानं गावाकडे पायी परतणाऱ्या

मजुरांच्या जथ्यासोबत चालू लागली. गर्भार अवस्थेत पायी मजल-दरमजल करत ती कशीबशी पुण्याहून बीडला गावात पोहोचली. तर सासूने तिला घरात घेतलं नाही. तिला वेगळ्या खोपटात राहायला सांगितलं. ही मुलगी पुण्यातून आलीय, तिला कोरोनाचा संसर्ग असू शकतो, वगैरेचा विचारही न करता द्वारकाताई तिच्यापर्यंत पोहोचल्या. तिला आधार दिला. धान्य दिलं. हवं-नको पाहिलं. सहसा रोष पत्करून कुणी दुसऱ्यांच्या कौटुंबिक समस्येत लक्ष घालत नाहीत. द्वारकाताईंनी सुनेला मदत केली म्हणून ती सासुबाई राग धरून बसली. गावातील आणखी एका प्रकरणातही द्वारकाताईंनी लोकांची नाराजी पत्करलीय. त्यांच्या वस्तीतील एकानं पहिली पत्नी असताना दुसरं लग्न केलं. त्यामुळं द्वारकाताईंनी गावातला-ओळखीचा विचार न करता त्या पुरुषाविरोधात पोलिस केस केली. या प्रकरणात लोक द्वारकाताईंवर नाराज झाले. पण द्वारकाताईंना अशा रागलोभांची तमा नाही.

लॉकडाऊन काळातच 'मकाम'ची ऑनलाईन सत्रं सुरू झाली. ही सत्रं झूम ॲप वरून ऑनलाईन होत असत. द्वारकाताईंना हे तंत्रज्ञान नवं होतं. पण त्यांनी ते शिकून घेतलं. अशाच एका सत्रात सरकारकडून गरिबांना मोफत धान्य मिळत आहे, याची त्यांना माहिती झाली. पण काठोडा गावात हे धान्य मिळालेलं नव्हतं. मग द्वारकाताईंनी गावातील १०-१५ महिलांना सोबत घेतलं. त्या रेशन दुकानदाराकडे गेल्या. मोफत धान्य का वाटप झालं नाही, म्हणून जाब विचारला. जमाव पाहून दुकानदाराने लगेचच धान्य द्यायची तयारी दाखवली. पुढील सात दिवसात गावातील गरीब कुटुंबांना धान्य मिळालंही. 'मकाम'च्या सत्रातून माहिती मिळाली नसती, नि द्वारकाताईंनी दुकानात जाऊन प्रश्न विचारले नसते, तर कदाचित ही मदत गरजूंपर्यंत पोचलीच नसती. धाडस करणं, बदल घडवण्यासाठी पहिलं पाऊल उचलणं हे द्वारकाताईंच्या नेतृत्त्वातील मुख्य गुणवैशिष्ट्य.

कोविडविरोधी लसीकरण सुरू झालं, तेव्हा गावातील अनेक महिला लस घ्यायला घाबरत होत्या. तेव्हा द्वारकाताईंनी प्रथम लस घेतली. मग त्या गावातील महिलांना घरोघर जाऊन लसीकरणासाठी प्रवृत्त करू लागल्या. महिलांना घरातून काढून त्यांनी लसीकरण केंद्रांवर नेलं. गावातील सार्वजनिक कार्यात हिरिरीनं पुढाकार घेणं हा जणू द्वारकाताईंना जडलेला छंद असावा. पूर्वी मात्र त्या खूप सोशिक होत्या.

द्वारकाताईंचं निवृत्तीरावांशी लग्न झालं, तेव्हा त्यांचं वय होतं अवघं बारा वर्षे. निवृत्तीरावांचं आधीच एक लग्न झालं होतं. हा माणूस मारझोड करतो,

म्हणून कंटाळून पहिली पत्नी एक तान्हं बाळ सोडून निघून गेली होती. बारा वर्षाच्या द्वारकानं लग्न होताच सवतीच्या बाळाचं आईपण निभावायला सुरुवात केली. बीड जिल्ह्यातून अनेक मजूर ऊसतोडीला जातात. ऊसतोडीला मजुरांच्या जोडप्यांनाच घेतलं जातं. त्यामुळं केवळ ऊसतोडीला जाता यावं यासाठी ऊसतोड मजुरात अल्पवयात लग्न लावली जातात. निवृत्तीरावही ऊसतोड मजूर होते, त्यांची बायको निघून गेलेली. त्यामुळे असेल कदाचित केवळ बाळ सांभाळण्यासाठी नि मजुरीसाठी या मुलीशी त्यांनी लग्न केलं असावं. द्वारकाताई नवऱ्यासोबत ऊसतोडीला जाऊ लागल्या. वयाच्या बाराव्या वर्षी या मुलींनं संसाराचा भार पेलायला सुरुवात केली. वयाची अठरा वर्षे पूर्ण होत नाहीत, तोवरच द्वारकानं तीन मुलांना जन्मही दिला. त्यांची ही बाळंतपणंही ऊसाच्या फडात कुठेतरी परक्या गावात झालीत. ऊसतोडीवर गेलेल्या महिलांची अवस्था अत्यंत कठीण असते. नवऱ्यासोबत ऊसतोड तर करायचीच, सोबत सैपाक-पाणी-धुणी नि अशी अकाली बाळंतपणंही या महिला सोसतात. हे सर्व द्वारकाताईंनीही सोसलंय. शिवाय नवऱ्याची मारझोडही सहन केलीय. त्या सांगतात, माझा नवरा घरात लेकरांदेखत मारायचाच, पण त्याच्या मनात आलं, तर मला शेतात नेऊन हातपाय बांधूनही मारायचा. अशा मारझोडीची नेमकी कारणंही द्वारकाताईंना आता आठवत नाहीत, 'नवऱ्यानं बायकांना मारूनच मुठीत ठेवायचं असतं', अशी काहीतरी निवृत्तीरावांची धारणा असावी. पण द्वारकाताईंनी हळूहळू या माणसाला बदलवलं. त्यासाठी त्या चार लोकांत वावरू लागल्या. द्वारकाताईंचा गावात मान वाढू लागला, तसतसा निवृत्तीरावांमध्येही बदल घडू लागला.

द्वारकाताई २०१०-११ च्या दरम्यान 'मानवी हक्क अभियान' व मनीषा तोकले यांच्या संपर्कात आल्या. मानवी हक्क अभियान मार्फत दलितांचे प्रश्न लावून धरले जात. मनीषा तोकले या संघटनेच्या लढावू कार्यकर्त्या. मनीषाताईंसारख्या कार्यकर्त्यांकडे पाहून द्वारकाताईंनाही आपल्या मुक्तीचा मार्ग गवसला असावा. काठोडा गावात एका सावकाराने केवळ सावकारकी चालत राहावी यासाठी बचत गट स्थापन केलेले. संघटनेने गावात बचत गट स्थापन करण्याची कल्पना मांडल्यावर, त्या सावकाराच्या बचत गटापासून वेगळं होऊन स्वतंत्र गट स्थापन करणाऱ्या महिलांपैकी द्वारकाताई एक होत्या. गावात बचत गट सुरू झाला. त्यानंतर बचत गटाकडून सावित्रीबाई फुलेंची जयंती साजरी होऊ लागली. या घडामोडींमुळे द्वारकाताईंना नवं काहीतरी उमगू लागलं. अशातच त्यांच्या गावात दलित अत्याचाराची घटना घडली. दलित सरपंचाने

**संघटनेनं दलित मजुरांना विविध प्रकारचं पाठबळ दिलं. संघटनेमुळंच द्वारकाताईंनी शेळीपालनाला सुरुवात केली. त्यामुळं त्यांनी ऊसतोडीवर जाणं थांबवलं. संघटना आयुष्यात येण्यापूर्वी त्यांच्या तीन मुलांची अल्पवयात लग्नं झाली होती. पण अखेरच्या मुलीचं लग्नं मात्र द्वारकाताईंनी अठरावं वर्षं पूर्ण होईपर्यंत होऊ दिलं नाही. द्वारकाताईंमधील नेतृत्त्व असं गावात व कुटुंबात घडणाऱ्या घडामोडीतून आकार घेत आलंय.**

गावकऱ्यांच्या सल्ल्याशिवाय घरकुलांचं वाटप केलं, याचा राग धरून सवर्णांनी या सरपंचावर चाकूहल्ला केला. या घटनेत संघटनेनं गावातील दलितांना पाठिंबा दिला. पोलिस केस झाली. दलित वस्तीत एकजूट झाली. दलित अत्याचार विरोधी कायदा, एफआयआर नोंदवणे इत्यादी माहितीही संघटनेकडून दिली गेली. बचत गटात सामील झाल्यानंतर अशिक्षित द्वारकाताईंनी सही करणं शिकून घेतलं होतं. आता त्यांना कायदाही समजून घ्यावा वाटू लागला. संघटनेत सामील झाल्यापासून अशा विविध विषयांची माहिती द्वारकाताई करून घेऊ लागल्या.

संघटनेनं दलित मजुरांना विविध प्रकारचं पाठबळ दिलं. संघटनेमुळंच द्वारकाताईंनी शेळीपालनाला सुरुवात केली. त्यामुळं त्यांनी ऊसतोडीवर जाणं थांबवलं. संघटना आयुष्यात येण्यापूर्वी त्यांच्या तीन मुलांची अल्पवयात लग्नं झाली होती. पण अखेरच्या मुलीचं लग्नं मात्र द्वारकाताईंनी अठरावं वर्षं पूर्ण होईपर्यंत होऊ दिलं नाही. द्वारकाताईंमधील नेतृत्त्व असं गावात व कुटुंबात घडणाऱ्या घडामोडीतून आकार घेत आलंय.

द्वारकाताईंनी मदत केलीय अशा अनेक घटना आहेत, यातल्या दोन घटनांमधून द्वारकाताई कोणत्या स्वरूपाच्या प्रकरणात कसा हस्तक्षेप करताहेत याचा पोत लक्षात येऊ शकेल. त्यातली एक घटना अशी – मराठा समाजातील एक मुलगी नवऱ्याला सोडून घरी निघून आली. या मुलीला न्याय मिळवून देण्यासाठी मुलीचे वडील द्वारकाताईंकडे आले, कारण त्यांनाही हा प्रश्न सोडवणं कठीण जात होतं. मुलगी नांदायला जायला तयार नव्हती. तिला घटस्फोट हवा होता, नि तिचा नवरा तो द्यायला तयार नव्हता. मुलीचं मत होतं, नवऱ्याचे दुसऱ्या महिलेशी शारीरिक संबंध आहेत, शिवाय तो मारझोड करतो, छळ करतो, त्यामुळे ती नांदायला तयार नव्हती. या मुलीच्या सासरकडचे लोक एका वकिलाला घेऊन मुलीला न्यायला आलेले. तो वकील बैठकीत बोलू

लागला, तेव्हा द्वारकाताई त्याला गप्प करताना म्हणाल्या, 'तू वकील हैस तर कोर्टात बोल, हितं कशाला वकिली कराय लागलाय. तू पाव्हणा म्हणून आलायस तर पाव्हण्यासारखा गप बस...' हा माणूस आपल्या पेशाचा दबाव आणून त्या मुलीला जबरदस्तीने नवऱ्यासोबत राहायची बळजबरी करू पाहत होता. द्वारकाताईंनी त्या मुलीच्या सासरकडच्यांना कौटुंबिक छळाचा कायदा सांगितला. द्वारकाताईंच्या हस्तक्षेपामुळे आधीच 'महिला तक्रार निवारण केंद्रा'कडेही ही केस नोंदवली गेली होती. त्यामुळं वकिलाची बोलती बंद झालीच, पण कायद्याच्या भयानं त्या मंडळींनी समोपचारानं घटस्फोटाला मंजुरी दिली. मुलीच्या पुनर्वसनासाठी रक्कम ठरवण्यातही द्वारकाताईंचा हस्तक्षेप महत्त्वाचा ठरला.

दुसऱ्या घटनेत द्वारकाताईंना मनीषा तोकलेंची मदत अनिवार्य वाटली. कारण पोलिस त्यांना दाद देत नव्हते. एका मुलीला वेश्यावृत्तीसाठी विकलं गेल्याची ही घटना गुंतागुंतीची होती. या मुलीच्या शेजारच्यांनी तिला सहज हवापालट म्हणून त्यांच्या गावी नेलेलं. मुलीच्या कुटुंबानंही विश्वासानं मुलीला पाठवलेलं. पण मुलगी ठरलेल्या तारखेला परतली नाही, तेव्हा त्यांनी चौकशी केली, तर मुलगी तिथे आलीच नाही, असं सांगितलं गेलं. मुलगी बेपत्ता झाल्याचा बनाव रचला गेला. पण मुलगी त्या घरी गेल्याचे पुरावे होते. द्वारकाताईंकडे हे प्रकरण आलं. त्या पोलिस चौकीत गेल्या. तर पोलिस म्हणाले, 'गेली असंल पळून पोरगी, नातलगात शोध घ्या सापडेल', पोलिस हे प्रकरण गांभीर्याने घेत नाहीत हे लक्षात आल्यावर द्वारकाताईंनी मनीषा तोकलेंना मदत मागितली. मग पोलिसांनी तक्रार नोंदवली नि शोध सुरू केला. तेव्हा हे प्रकरण वेश्यावृत्तीसाठी अपहरण केल्याचं उघड झालं. द्वारकाताईंच्या समयसूचकतेमुळं नि पाठपुराव्यामुळं त्या मुलीचा वेळीच शोध लागला.

'मकाम'मध्ये सक्रिय झाल्यापासून द्वारकाताईंनी चार विधवांना घरकूल योजनेचा लाभ मिळवून दिलाय. विधवा पेन्शन मिळवण्यासाठीही त्यांनी महिलांचे अर्ज पाठवलेत. त्याशिवाय त्या स्वावलंबी शेतीचा प्रयोगही करत आहेत. पाच महिलांचा गट करून त्या सेंद्रिय शेतीचा हा प्रयोग 'मकाम'च्या मार्गदर्शनात करत आहेत. रोहयो अंतर्गत महिलांना लाभ मिळावा यासाठी त्यांनी अनेक महिलांना जॉब कार्ड मिळवून दिले. शिवार फेरी काढून द्वारकाताईंनी ग्रामपंचायतीत रोहयोसाठी खास महिलांसाठी कामांची मागणीही केली आहे.

विधवा महिलांचा मालमत्तेवरील हक्क प्रस्थापित करणं मात्र द्वारकाताईंना जिकिरीचं वाटतंय. त्या म्हणतात, विधवा बाया त्यांच्या लेकरा-सुनेबरबर

घरातच ऱ्हात्यात. अशा बायांचं नाव जमिनीवर लावायचं तर पोरगा नाराज होता. त्याला वाटतं, आयचा आपल्यावर इश्वास न्हाय... द्वारकाताईंचं गाव दुष्काळी पट्ट्यातलं. या भागात जमीनधारणाही कमी आहे. लोक शेतमजुरी नि शेती दोन्हीवर अवलंबून असतात. त्यामुळे असेल कदाचित या भागात महिलांना वारसा हक्कातून बेदखल केलं जाण्याची समस्या या भागात तीव्र नसावी, असं द्वारकाताईंना वाटत असेल. त्यामुळे वारसा हक्कांच्या प्रश्नांपेक्षा त्या महिलांना होणारी मारहाण, छळ अशा प्रश्नात अधिक लक्ष केंद्रित करत आहेत. मकाममध्ये द्वारकाताईंसारखं ग्रासरूट नेतृत्त्व आपल्या भागातील गरजा व प्रश्नांची तीव्रता लक्षात घेऊन हस्तक्षेप करत आहे, हे द्वारकाताईंच्या उदाहरणावरून लक्षात येतं. ●



# जिजा दरवडा

▶ 'ही आली मोठी आमदारीन, ही काय मदत करणार आम्हाला?' जिजाताईंनी ही वाक्य अनेकांकडून ऐकलीत. जिजाताई आदिवासी पाड्यांवर काम करतात. आदिवासी व गरिबांमध्ये एक भावना खोलवर रुजलेली जाणवते. 'गरिबांना सरकारकडून कुठलीही मदत मिळत नाही. मदत मिळवायची असेल, तर पैसे चारल्याशिवाय कामं होत नाहीत.' जिजाताई म्हणतात, लोकं बोलतात, 'आमचे वाडवडील गेले मरून, पण आम्हाला कुठलीच योजना मिळाली नाय. तुझ्याकडूनही काहीच मदत मिळणार नाय' पण लोकं असं म्हणतात, म्हणूनच मी जिद्दीनं काम करते.

'विधवा पेन्शन' किंवा वृद्धांसाठी 'श्रावण बाळ' योजनेचा अर्ज भरणं, रेशन कार्ड काढणं यासारख्या साध्या कामांसाठी ग्रामपंचायतीचे सदस्य हजार-पाचशे व सरकारी कार्यालयातील कर्मचारी पन्नास-शंभर रुपये मागतात. असा जिजाताईंचा अनुभव आहे. एकदा त्यांनी तहसील कार्यालयातील माणसाला विचारलंही,

'तुम्ही कशाचे पैसे घेता?' तर उत्तर मिळालं, 'आम्हाला पावती फाडावी लागते.' अर्थातच ही एक खोटी सबब आहे. लाचारीचा फायदा घेण्याची ही एक निलाजरी पद्धत शासकीय कार्यालयात रुजलीय. जिजाताई अर्ज दाखल करतात, तेव्हा मात्र अशी पावती फाडली जात नाही. जिजाताई गरजूंना मोफत मदत करतात. 'मकाम'मुळे कोणत्या योजनेसाठी कुठे अर्ज करायचा, कोणती कागदपत्र आवश्यक असतात, याची त्यांना माहिती झाली. 'मकाम'कडून मिळालेल्या या माहितीच्या आधारे जिजाताई परिसरातील गरिबांमध्ये विश्वास निर्माण करण्याचं काम करताहेत. पण हे एक कठीण आव्हान आहे. विशेषत: एका आदिवासी एकल महिलेनं हे आव्हान पेलणं ही सोपी गोष्ट नाही.

गरिबांना इतके वाईट अनुभव आलेले असतात, की 'बदल घडू शकतो, पेन्शन, रेशन, रस्ते-पाणी हा आपला हक्क आहे' असा विश्वास बसायला वेळ लागतो. जिजाताई एक अनुभव सांगतात, मी 'मकाम'चं काम सुरू केलं. गरजूंकडं जाऊ लागले. त्यांचे अर्ज भरू लागले. आमच्या धामणी गावात एक म्हातारं जोडपं आहे, त्यांना मूलबाळ नाही. त्यांचा 'श्रावणबाळ' योजनेसाठी अर्ज करायचं मी ठरवलं. मी त्यांची माहिती घेऊ लागले. तर पाड्यावरचे लोक म्हणायला लागले, 'ह्या म्हाताऱ्यांचं आता काय ऱ्हायलंय. ते मरायच्या वाटंला लागलेत. त्यांना कसली मदत मिळतीय? कुणीच यांना मदत मिळवून दिली नाही. तुझ्याकडूनही काही होणार नाही.' मी त्या लोकांचं ऐकून घेतलं. त्या जोडप्याचा अर्ज भरला. त्यांना 'श्रावणबाळ' योजना मिळवून दिली... जिजाताईंसारख्या कार्यकर्त्यांचं काम गरिबांमधील नैराश्य दूर होण्यासाठी असं महत्त्वाचं आहे. पण समाजात दुबळ्यांना हक्क नाकारण्याची मानसिकता घट्ट असते, या मानसिकतेला गावपातळीवर आव्हान देताना कार्यकर्त्यांमध्येही निराशा येऊ शकते. काही वेळा गरजूंना मदत मिळवून देणं कठीण होतं. जिजाताईंसारख्या कार्यकर्त्या गरजूंसाठी वेळ खर्च करतात, पण ही गरीब गरजू मंडळी मात्र स्वत: पुढाकार घ्यायला कमी पडतात. याबाबतचा एक अनुभव जिजाताई सांगतात, एक सुमन नावाची बाई आहे, तिच्या नवऱ्यानं औषध पिऊन आत्महत्या केली. मी तिचा विधवा पेन्शनसाठी अर्ज करायचं ठरवलं. पण तिच्या सासऱ्याने अर्ज भरायला नकार दिला. ती बाई तरुण आहे. सासरा तिला म्हणाला, ''पेन्शनसाठी अर्ज करायचं तुझं वय आहे का?'' मग सुमननंही पेन्शन मिळवायचा विचार सोडून दिला. खरं कारण वेगळंच होतं. सासऱ्याला भीती होती, हिला पेन्शन सुरू झाली, की सरकारी दप्तरात तिची विधवा म्हणून नोंद होईल. मग ती अजून हक्क मागेल. पण सुमनला ही गोष्ट समजली नाही... विधवा-एकल महिलांना आपल्या हक्कांसाठी लढायला तयार करणं कठीण असतं. जिजाताई स्वत:देखील वैयक्तिक

आयुष्यात असेच अडसर दूर करत कार्यकर्ता म्हणून घडत आहेत.

२०१२ मध्ये जिजाताईंचे पती संजय यांचं अपघाती निधन झालं. चार छोट्या मुलांची जबाबदारी जिजाताईंवर आली. संजयसोबत जिजानं प्रेमविवाह केलेला. संजयच्या आईला हे लग्नं पसंत नव्हतं. त्यामुळे ही सासू जिजाचा दुस्वास करायची. संजय मात्र पत्नीला पाठिंबा देणारा नवरा होता. ते एका फार्महाऊसवर वॉचमनचं काम करत. संसाराला हातभार लागावा म्हणून संजयनं जिजाताईंना नोकरीसाठी प्रोत्साहनही दिलेलं. लग्नानंतर जिजाताईंनी एका स्वयंसेवी संस्थेत काम सुरू केलं. टुकीनं संसार सुरू होता. पण संजयच्या अपघाती मृत्यूनंतर चित्रं पालटलं. सासूनं जिजाला वेगळं राहायला सांगितलं. पोरं आमच्याकडं असू दे, तू तुझ्या भावाकडं जाऊन राहा, असं सासूनं सांगितलं. जिजाताईंनी आपल्या मुलांसह वेगळं राहायचा निर्णय घेतला. सासरकडून त्यांना फारच थोडी जमीन मिळाली. त्यावर त्या भातशेती करू लागल्या. जगण्यासाठी मोलमजुरीही करू लागल्या. संजयला एका खासगी टेम्पोनं धडक दिलेली. त्यामुळं या मृत्यूची नुकसानभरपाई मिळवण्यासाठी जिजाताईंनी कोर्टात केस दाखल केली. चार वर्षे ही केस चालली. जिजाताईंनी कुणाच्याही पाठबळाशिवाय ही केस लढवली. अखेर कोर्टानं अपघात विमा म्हणून एक मोठी रक्कम जिजाताईंना मंजूर केली. जिजाताईंनी या रकमेतला एक हिस्सा सासरलाही दिला. जिजाताई म्हणतात, ते माझ्याशी वाईट वागले, म्हणून मीही वाईट वागायची गरज नाही! या घडामोडींनंतर सासरशी जिजाताईंचे संबंध सुधारले. पण अजूनही जमिनीत जिजाताईंना कायदेशीर हक्क मात्र मिळालेला नाही. संजय वडिलोपार्जित जमिनीचे एकुलते वारस होते. पण या जमिनीची खातेफोड झालेली नाही. त्यामुळे चुलत सासऱ्यांकडून जिजाताईंचं नाव सातबारावर लावलं जाऊ नये यासाठी अप्रत्यक्षरित्या प्रयत्न केले जात आहेत. जिजाताईंनीही ही लढाई फार अटीतटीनं लावून धरलेली नाही. त्यांना वाटतं मुलं मोठी झाली, की ते आपल्या वडलांचा वारसा हक्क मिळवतील. महिलांनी आपल्या हक्कांसाठी उभं राहणं समाजाला कबूल नाही. त्यामुळे जिजाताईंसारखे कार्यकर्तेही या बाबतीत आस्ते कदम पावलं उचलताना दिसतात. अर्थात हा संघर्ष लांब पल्ल्याचा आहे. जिजाताईंनी काही पावलंच या दिशेनं उचललीत. तीही समाजाला मानवणारी नाहीत.

जिजाताई जवळपास रोजच तालुक्याला जातात. त्यामुळे आसपासचे लोक, अगदी शेजारच्या महिलाही त्यांच्याबाबत कुजबुजतात. अलीकडे जिजाताई मुलांचा जातीचा दाखला काढण्यासाठी कर्जतला गेल्या होत्या. गावातील एकानं त्यांना तिथे पाहिलं. गावात येऊन त्यानं 'ही बाई कर्जतमध्ये फिरत होती' असा गवगवा केला. अशा गोष्टी जिजाताईंपर्यंत हस्ते-परहस्ते पोहोचतातच, त्यांना

**जिजाताई जवळपास रोजच तालुक्याला जातात. त्यामुळे आसपासचे लोक, अगदी शेजारच्या महिलाही त्यांच्याबाबत कुजबुजतात. अलीकडे जिजाताई मुलांचा जातीचा दाखला काढण्यासाठी कर्जतला गेल्या होत्या. गावातील एकानं त्यांना तिथे पाहिलं. गावात येऊन त्यानं ‘ही बाई कर्जतमध्ये फिरत होती’ असा गवगवा केला. अशा गोष्टी जिजाताईंपर्यंत हस्ते-परहस्ते पोहोचतातच, त्यांना याचं वाईटही वाटतं. पण असल्या चर्चांना भीक घालणं जिजाताईंनी सोडून दिलंय. पूर्वी मात्र अशा गोष्टींचा त्यांना त्रास होत असे.**

याचं वाईटही वाटतं. पण असल्या चर्चांना भीक घालणं जिजाताईंनी सोडून दिलंय. पूर्वी मात्र अशा गोष्टींचा त्यांना त्रास होत असे.

नवऱ्याच्या मृत्यूनंतर दोन वर्षे जिजाताई फारशा घराबाहेर पडल्या नाहीत. या काळात वैधव्यामुळं समाजाकडून मिळणाऱ्या वागणुकीचा सल त्यांना बोचत होता. त्या सांगतात, माझ्या भावाचं लग्नं होतं. त्यावेळी मी नवी साडी नेसले. बांगड्या भरल्या. तर लोक बोलायला लागले, ‘हिचा नवरा मेलाय आन् ही लग्नात मिरवतीय.’ माझ्या मनाला हे फार लागलं. एकदा आमच्या जवळच्या नात्यातल्या घरात बारसं होतं. सगळ्यांना त्यासाठी बोलंवलेलं, पण मला आमंत्रण दिलं नाही. आमच्याकडं गणपतीच्या सणाला बायकांना हळदी–कुंकाला बोलावतात. मला अशावेळी साईडला केलं जायचं. अशा अनुभवांनी जिजाताई खचत चालल्या होत्या.

या दरम्यान ‘मानस फाउंडेशन’तर्फे जिजाताईंच्या जांभुळपाड्यावर मीटिंगा सुरू झाल्या. या बैठकांमधून स्थानिक लोकांचे प्रश्न फाउंडेशनचे कार्यकर्ते समजावून घेत. या बैठकात उपस्थित राहायला जिजाताईंना मज्जाव नव्हता. त्यामुळे त्या तिथे जाऊ लागल्या. आपल्या समस्या सांगू लागल्या, प्रश्न विचारू लागल्या. फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी जिजाताईंमधील नेतृत्त्वगुण हेरले. त्यांना कार्यकर्ता म्हणून काम करण्यासाठी प्रोत्साहन दिलं. जिजाताईंना नवं क्षितिज दिसू लागलं.

‘मानस फाउंडेशन’च्या अमिता जाधव यांनी कर्जतमध्ये ‘क्रांतिज्योती आदिवासी संघटना’ स्थापन केली. या संघटनेच्या सचिव पदावर जिजाताईंना नेमलं गेलं. जिजाताई सांगतात, सावित्रीबाई फुलेंना लोकांनी खूप त्रास दिला. तसाच त्रास आम्हालाही सहन करावा लागणार आहे. क्रांतिज्योती संघटनेला सावित्रीबाईंचं नाव आहे. त्यामुळं कितीही त्रास झाला तरी मी संघटनेचं काम करते. अमिता जाधव यांनी जिजाताईंना ‘मकाम’चा परिचय करून दिला. त्यामुळं त्या आवर्जून

लॉकडाऊन काळातही कर्जतला येऊन अमितातार्इंच्या घरून 'मकाम'च्या ऑनलाईन मीटिंगांना हजर राहू लागल्या. 'मकाम'कडून मिळालेल्या माहितीच्या आधारे गावपातळीवर काम करू लागल्या. संघटनेच्या कामाच्या निमित्तानं जिजातार्इंना विविध शिबिरांसाठी वेगवेगळ्या शहरांमध्ये जायची संधी मिळू लागली. 'मानस फाउंडेशन'मार्फत त्यांची 'कोरो' या संस्थेच्या फेलोशिपसाठीही निवड झाली. जिजाताई सांगतात, आता मला खूप वेगवेगळी माहिती मिळू लागलीय. मला लहानपणी शिकायची खूप हौस होती. पण गरिबीमुळं मी शाळा शिकू शकले नाही. आता खूप शिकायला मिळतंय. समाजात मान मिळू लागलाय. मी घराबाहेर पडायला लागले, त्यामुळं माझ्या मुलांनाही शिक्षणाचं महत्त्व कळायला लागलंय. माझ्या मुलींनी शिकावं, आपल्या पायांवर उभं राहावं, नोकरी करावी असं मला व मुलांनाही वाटू लागलं.

नवऱ्याच्या मृत्यूनंतर जिजातार्इंना घराबाहेर पडावं लागलं, तेव्हा त्या निराश होत्या. सासूनं त्यांना वेगळं काढताना साधा घरातला चमचाही दिला नव्हता. त्यांच्या लग्नात अहेर म्हणून आलेले फक्त दोन हंडे घेऊन जिजातार्इंनी नव्या जीवनाला सुरुवात केलेली. जिजाताई त्याच वळणावर थांबल्या नाहीत. चारही मुलांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिलं. मुलं कळती झाली. जिजातार्इंनाही उसंत मिळाली. नि त्या परिसरातील एकल महिलांच्या प्रश्नांकडे वळल्या. 'मकाम'चं कार्य म्हणून त्यांनी अलीकडे गावात शिवार फेरी काढली. तेव्हा महिलांची पाण्याची समस्या प्रकर्षाने पुढे आली. जिजातार्इंनी ही समस्या सोडवण्यासाठी ग्रामसभेत तो प्रश्न मांडला. जिल्हा परिषद सदस्यांकडे पाठपुरावा केला. त्यामुळं गावात नळयोजनेचं पाणी आलं. गावातल्या रस्त्यांवर चिखल होत असे, त्या ठिकाणी पेवर ब्लॉक जिजातार्इंच्या पाठपुराव्यामुळं बसवले गेले. जिजातार्इंनी जॉबकार्ड काढून दिलेल्या लोकांना रोहयोतून रोजगार मिळू लागला. असे प्रश्न सोडवताना त्यांना सर्व गावाची साथ मिळत नाही. अनेकदा नकारात्मक सूर ऐकावा लागतो. कारण 'बदल घडू शकतात' यावरून लोकांचा उडालेला विश्वास. जिजाताई म्हणतात, सावित्रीबाई फुलेंनी त्रास सोसला, म्हणून बदल घडले. मग मी का धीर सोडू? हा आत्मविश्वास जिजातार्इंना 'मकाम'सारख्या व्यासपीठामुळं मिळाला आहे. ●

परिशिष्ट
१

# २०२०–२१ नंतर मकाममध्ये सक्रिय झालेल्या ग्रामीण महिला नेतृत्त्वानं काय मिळवलं?

## ‘मकाम’च्या कार्यक्षेत्राचा विस्तार

- महिलांचे हक्क, त्यांच्या समस्या व त्या सोडवण्यासाठीचे उपाय याबाबत गावपातळीवर संवाद वाढला.

- एकल महिलांच्या प्रश्नांबाबत महिला नेतृत्त्वांची संवेदनशीलता व समज वाढली.

- ग्रामीण महिलांचे प्रश्न सोडवण्यासाठी संगठित कृतीकार्यक्रमांची गरज रुजायला मदत झाली.

- गावपातळीवर महिला नेतृत्त्वाची ओळख निर्माण झाली.

- ‘मकाम’ सोबत आल्यानंतर नेतृत्त्व करण्यासाठी नवनवीन माहिती व कौशल्य मिळवण्याची लालसा कार्यक्षेत्रातील महिलांमध्ये वाढली.

- ‘मकाम’नं सुचवलेल्या कृती–उपक्रमांना गावपातळीवर अधिक पद्धतशीर व नियोजनबद्ध रित्या नेतृत्त्व करणाऱ्या महिलांमार्फत हाताळलं जाऊ लागलं.

गावपातळीवरील नेतृत्त्वाच्या मदतीसाठी ‘मकाम’नं मार्गदर्शकांची फळी उभारली आहे, पण मार्गदर्शकांच्या अत्यल्प मदतीसह अधिकाधिक प्रश्न गावपातळीवरच सोडवले जाऊ लागले.



Pic: Swati Satpute

परिशिष्ट
२

## 'मकाम'नं महिला नेतृत्त्व विकास कार्यक्रमाचं फलित

महाराष्ट्रातील ४८ ग्रामीण महिलांचा लक्षणीय नेतृत्त्व क्षमता विकास.

- सर्व्हेक्षणाच्या माध्यमातून ५१६ एकल महिलांपर्यंत 'मकाम' पोहोचू शकलं.
- ५७० महिलांनी रोहयो अंतर्गत जॉब कार्डची मागणी केली.
- 'मकाम'नं प्रशिक्षित केलेल्या महिला नेतृत्त्वाच्या हस्तक्षेपामुळं ३४४ लोकांना रोहयो अंतर्गत जॉब कार्ड मिळाली.
- महिला नेत्यांच्या माध्यमातून ७४० लोकांना रोहयो अंतर्गत काम मिळाले.
- 'मकाम'च्या मार्गदर्शनामुळे गावपातळीवर महिला नेतृत्त्वाने २१७ महिलांचे वारसा हक्कांशी निगडित प्रश्न पटलावर आणले.
- गावपातळीवरील महिला नेत्यांनी त्यांच्या प्रयत्नांनी १६०० महिलांना ई-श्रम कार्ड मिळवून दिले.

Pic: Datta Gundaji Suraywanshi



## परिशिष्ट – ३


# मकाम अंतर्गत नेतृत्व विकास प्रक्रियेत समाविष्ट संस्थानिहाय महिला नेत्यांची यादी

| जिल्हा | संस्था | संपर्क व्यक्ती | महिला लीडर |
|---|---|---|---|
| अमरावती | स्वराज्य मित्र सामाजिक संस्था | आरती बैस, रंजना नेवारे | मंगला वानखेडे<br>मनीषा उके |
| गडचिरोली | सृष्टी | मंदा केळजदकर | रेखा हाते |
| गडचिरोली, चंद्रपूर | आम्ही आमच्या आरोग्यासाठी | शुभदा देशमुख, प्रतिमा नंदेश्वर | खंजिरा कराडे<br>संगीता सहारे<br>छाया खरकाटे<br>वैशाली शेंडे<br>सीमा चव्हाण<br>आरती मडावी<br>रंजना कुमारे<br>शालू मेश्राम |
| गोंदिया, वाशीम | फाउंडेशन फॉर इकोनॉमिक अंड इकोनॉमिकल डेव्हलपमेंट (फीड) | संरीता मेश्राम, कौस्तुभ पांढरीपांडे | चित्रकला वैदे<br>भूमेश्वरी गावड<br>सुचिता सोलंकी |
| नंदुरबार | जनार्थ आदिवासी विकास संस्था | वनिता पटले | बेबीताई भिल |
| नागपूर | प्रकृती | प्रज्ञा मंडपे | अर्चना केचे<br>लक्ष्मी गजभिये |
| नांदेड | आनंदाश्रय | दयानंद कदम | सावित्रीबाई फिरंगे<br>अर्चना ठोके |
| बीड | जागर प्रतिष्ठाण | मनीषा तोकले | चंद्रकला शिंदे<br>द्वारका वाघमारे |
| बीड, उस्मानाबाद | एकल महिला संघटना | चित्रा पाटील, सुरेखा भोसले | आशा झिंजुर्डे<br>उज्ज्वला मगर |

| | | | |
|---|---|---|---|
| परभणी | राजलक्ष्मी प्रतिष्ठान | राजू केंढे | मीना गोरे |
| | | | सागरबाई झोडपे |
| | विकल्प इंडिया | गजानन सुरवसे | स्वाती सुरवसे |
| | साद सामाजिक संस्था | योगेश कुडमूळे | जयश्री जाधव |
| | | | वैष्णवी सामाले |
| यवतमाळ | प्रेरणा ग्रामीण विकास संस्था | माधुरी खडसे | वनिता शेंडे |
| | | | नीलिमा रेंगे |
| | फाउंडेशन फॉर इकोलोजीकाल सेक्युरिटी (FES) | गोविंद पेडणेकर | सुलोचना डेहानकार |
| | | | ललिता राठोड |
| | सृजन | रणजीत तोडसम | बेबीताई व्यंकटवार |
| | | | शारदा कन्नाके |
| रायगड | अंकुर ट्रस्ट | सुवर्णा पटले | भारती पवार |
| | | | रेखा वाघमारे |
| | | | ललिता वाघमारे |
| | मानस फाउंडेशन | अमिता जाधव | जिजा दरवडा |
| | | | बेबी पारधी |
| वर्धा | ऊर्जा फाउंडेशन | नूतन माळवी | सुनिता अलोने |
| सोलापूर | डॉ. आंबेडकर शेती विकास व संशोधन संस्था, सांगोला | शर्मिला केदारे | शारदा ठोकले |
| | | | सरिता बाबर |
| | | | बेबी पारधी |
| हिंगोली | उगम ग्रामविकास संस्था | छाया पडघम | नर्मदा वाकले |
| | | | अनिता मेश्राम |
| | प्रेरणा महिला विकास संस्था | गौतम मोगले | गीता काळे |
| | | | सावित्री खरवाडे |
| | सह्याद्री बहुउद्देशीय सामाजिक संस्था | बालाजी नरवडे | कलावती सवंडकर |

## परिशिष्ट – ४

# ‘मकाम’ अंतर्गत महिला नेतृत्त्वाचा जिल्हानिहाय विस्तार – नकाशा





# कोरची येथे महिलांना नेतृत्व विकासाचे धडे

कोरची – तालुका प्रतिनिधी

स्थानीक महाग्रामसभा कार्यालयाच्या सभागृहात महिला किसान अधिकार मंच आणि आम्ही आमच्या आरोग्यासाठी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चर्चासत्रात महिलांना नेतृत्व विकासाचे धडे देण्यात आले.

यावेळी साधनव्यक्ती ईजामसाय काटेंगे, प्रतिमा नंदेश्वर, कुमारीबाई जमकातन यांनी महिलांना वन अधिकार आणि महिला या विषयी मार्गदर्शन केले. जल, जंगल, जमीन, महिलांचे अधिकार, वनधन योजना, अनुदान प्राप्त ग्रामसभेत महिलांचा सहभाग तसेच विविध विषयांवर महिलामध्ये नेतृत्व विकसीत करणे आदी विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

# आधी बीज एकले...

'महिला किसान अधिकार मंच (मकाम)'सह
२०२०-२१ पासून कार्यरत झालेल्या
ग्रामीण नेतृत्त्वाची झलक या पुस्तिकेत आहे.
ग्रामीण महिलांचे प्रश्न, ते सोडवण्यासाठी
गावपातळीवर महिलांनी अवलंबलेल्या युक्त्या,
खेड्यातील अल्पशिक्षित महिला संघर्ष करायला उभी ठाकते,
तेव्हा तिच्यासमोर येणारी आव्हानं नि कष्टकरी महिलांच्या
संघटन व नेतृत्त्वाचा पोत या पुस्तिकेतील कथांमधून
वाचायला मिळेल. अभ्यासक, कार्यकर्ते, विद्यार्थी व
स्त्रियांच्या प्रश्नांबाबत आस्था असणाऱ्या सर्वांसाठीच
ही पुस्तिका उपयोगी ठरू शकेल.
'मकाम' ही कष्टकरी महिलांची संघटना समाजाच्या
मनामेंदूवर नेमकं काय पेरू पाहतेय याचा वृत्तांत
ही पुस्तिका सांगते म्हणूनच तिचं शीर्षक आहे -
'आधी बीज एकले!'

ग्रामीण महिलांमधील नेतृत्त्वाची ही बीजं
पुढे वृक्ष होऊन बहरतील असा आम्हाला विश्वास वाटतो.





महिला किसान
अधिकार मंच (मकाम)